सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १३ जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १९५ । पाने १२ । किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com







# पत्नी व मुलांना विष पाजून मुख्याध्यापकांची आत्महत्या



## बार्शी तालुक्यातील हात्तीज येथील घटना

## शेअर बाजारात पावणे दोन कोटींचे नुकसान

### हृदय पिळवटून टाकणारे सुसाईड नोट

योगेश पाटील यांनी आपल्या कुटुंबाला का संपवले, याचे कारण देताना सुसाईड नोटमध्ये लिहिले आहे की, "जग मला वाईट म्हणेल पण मी बायको मुलांना एकटं सोडून जाऊ शकत नव्हतो. त्यांचा सांभाळ कोण करणार, आयुष्यभर दुःख सोसत बसू देऊ शकत नाही म्हणून...,

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग । बार्शी, दि.१२ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील हात्तीज येथे एक अत्यंत हृदयद्रावक आणि हादरवून टाकणारी घटना घडली आहे. शेअर बाजारात तब्बल १ कोटी ८१ लाख रुपयांच्या झालेल्या नुकसानीच्या प्रचंड नैराश्यातून एका मुख्याध्यापकाने पत्नीसह दोन निष्पाप मुलांना विष पाजून स्वतः गळफास घेत जीवनयात्रा संपवली. योगेश बाळासाहेब पाटील (वय-३९) असे आत्महत्या केलेल्या मुख्याध्यापकाचे नाव आहे. पत्नी माधुरी पाटील (वय-३३), मुलगा अथर्व पाटील (वय-११), शिवांश (वय-७) अशी मृत पावलेल्यांची नावे आहेत.

या घटनेची माहिती मिळताच गावचे पोलीस पाटील यांनी वैराग पोलिसांना कळवले. वैराग पोलीस ठाण्याचे पथक तसेच फॉरेन्सिक टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सुसाईड नोट, लॅपटॉप, दोन मोबाईल, विषाची बाटली आदी साहित्य जप्त केले आहे. चारही मृतदेह बार्शी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले असून, योगेश यांचे चुलत भाऊ महेश पाटील यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी पंचनामा करुन चारही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. शेअर बाजाराच्या मोहापायी एका सुशिक्षित आणि हसत्या-खेळत्या कुटुंबाचा दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

**अशी आली घटना उघडकीस**

शुक्रवार, दि.१२ जून २०२६ रोजी सकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास योगेश यांच्या घराचा दरवाजा उघडला नसल्याने त्यांच्या चुलती आणि इतर नातेवाईकांनी तिथे जाऊन पाहिले. आतून कोणताही प्रतिसाद न आल्याने शेवटी नातेवाईकांनी लोखंडी गजाने दरवाजा तोडून आत प्रवेश केला. आत प्रवेश करताच उपस्थितांच्या पायाखालची जमीनच सरकली. घराच्या छताला असलेल्या लोखंडी अँगलला योगेश यांनी गळफास घेतलेला अवस्थेत आढळले. तर पत्नी माधुरी आणि दोन्ही मुले बेडवर आणि खाली गादीवर मृतावस्थेत पडलेली होती. त्यांच्या तोंडातून पांढरा फेस आलेला होता.

**उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आले होते गावी**

योगेश पाटील हे मूळचे हात्तीजचे रहिवासी असून ते नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा येथे जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. पत्नी आणि दोन मुलांसह ते तिथेच वास्तव्याला असायचे. उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त ते कुटुंबासह गावी आले होते. गेल्या काही दिवसांपासून ते अत्यंत शांत आणि तणावात असल्याचे त्यांच्या नातेवाईकांना जाणवत होते. त्यांनी नातेवाईकांपाशी आपण खूप लॉसमध्ये असल्याचे जुजबी बोलून दाखवले होते.

**कोराजन विषाचा वापर**

घराची आणि स्वयंपाकघराची पाहणी केली असता तिथे (कोराजन) नावाच्या विषारी कीटकनाशकाची ६० मि.ली.ची बाटली उघडलेल्या स्थितीत आढळली. जवळच एका प्लास्टिकच्या कपमध्ये गुलाबी रंगाचे औषध आणि चमचा आढळून आला. रात्रीच्या वेळी जेवणातून किंवा अन्य खाद्यपदार्थातून हे विष पत्नी आणि मुलांना पाजण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. याच खोलीत एका लॅपटॉपच्या कीबोर्डवर ठेवलेल्या वहीत तब्बल २४ पानांवर निळ्या रंगाच्या शाईने लिहिलेली सविस्तर सुसाईड नोट पोलिसांना सापडली आहे. या सुसाईड नोटमध्ये शेअर बाजारात ऑनलाइन पैसे लावत असताना १ कोटी ८१ लाख रुपयांचे नुकसान झाले. या कर्जाच्या आणि पैशांच्या टेन्शनमुळे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याने आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे त्यांनी लिहिले आहे.

---

## विचारपुष्प



संघामध्ये आपण आज्ञापालन, सूचनापालन, वेळेचे पालन या गोष्टींचा जो आग्रह धरतो त्याच्या मागे हेच कारण आहे की, अनुशासनाशिवाय कोणत्याही प्रकारचा सद्गुण देशाच्या कामी उपयोगी पडणार नाही.

**स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### गुटखा विक्रेत्यांवर लावणार मकोका

**मुंबई** : राज्यात एफडीए विभागाकडून सातत्याने धाडसत्र सुरू आहे. आतापर्यंत केलेल्या कारवाईमध्ये ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अनेक ठिकाणी अवैध गुटखा, पान मसाल्याची विक्री होत असल्याचे समोर आल्यानंतर गुटखा विक्री करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल असा इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिला. पत्रकार परिषदेत बोलताना मुंडे म्हणाले, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, विक्री करणाऱ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मकोका) लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांना हा नियम लागू असून मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल. मकोका गुन्हा दाखल करण्यासाठी आरोपीचा इतिहास पाहून आवश्यक त्या गुन्ह्यानुसार कारवाई केली जाणार आहे. आरोपींशी संगनमत करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल.

---

# फक्त 200 लिटर डिझेल मिळणार

## केंद्र सरकारचा निर्णय, ९० दिवसांची बंदी
## औद्योगिक, व्यावसायिक आस्थापनांसाठी पेट्रोल पंप बंद

**नवी दिल्ली, १२ जून**

तेलाची वाढती मागणी लक्षात घेता केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. सामान्य ग्राहकांना पेट्रोल पंपवरू केवळ २०० लीटर डिझेल घेता येणार आहे. तसेच औद्योगिक आणि व्यावसायिक आस्थापनांना आता पेट्रोल पंपांवरून पेट्रोल आणि डिझेल खरेदी करता येणार नाही. त्यांना आपले तेल घाऊक दुकानांमधून घ्यावे लागेल. ही बंदी ९० दिवसांसाठी लागू राहील.

नवीन नियमांनुसार पेट्रोल पंपांवर डिझेल फक्त वाहनांच्या टाक्यांमध्ये किंवा मान्यताप्राप्त कंटेनरमध्येच विकले जाईल. एक ग्राहक किंवा वाहन दररोज जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल खरेदी करू शकेल. या तेलाच्या पुनर्विक्रीवर कठोरपणे बंदी आहे. सरकारचा विश्वास आहे की, ग्राहकांच्या मोठ्या गर्दीमुळे सर्वसामान्यांसाठी तेलाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अत्यावश्यक सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. वास्तविक पाहता, पेट्रोल पंपावरील दर आणि घाऊक बाजारातील दरांमध्ये लक्षणीय तफावत आहे. दिल्लीत पेट्रोल पंपावर डिझेल ९५.२० रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध आहे, तर घाऊक ग्राहकांसाठी त्याची किंमत



१३४.५० रुपये आहे. या लक्षणीय फरकामुळे मोठ्या ग्राहकांनी पेट्रोल पंपांवरून तेल खरेदी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे देशाच्या काही भागांमध्ये डिझेलची मागणी असामान्यपणे वाढली.

सर्वसामान्य माणसाला महागाईपासून वाचवण्यासाठी सरकारी तेल कंपन्यांनी पेट्रोल पंपावरील दर स्थिर ठेवले आहे. पश्चिम आशियातील संकटामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या आहेत. दूरसंचार टॉवर आणि वीज निर्मिती कंपन्यांसारख्या घाऊक ग्राहकांना तेलाचा पूर्ण बाजारभाव द्यावा लागतो. त्यामुळे ते स्वस्त तेल मिळवण्यासाठी पेट्रोल पंपांवर गर्दी करत होते. ११ जूनला पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने 'मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश, २०२६' नावाचा एक नवीन आदेश जारी केला. सरकारने म्हटले आहे की, जगाच्या काही भागांतील सध्याच्या तणावामुळे तेल पुरवठा आणि जहाज वाहतुकीवर प्रतिकूल परिणाम झाला असून पेट्रोलियम उत्पादनांच्या उपलब्धतेवर त्याचा परिणाम झाला आहे. (वृत्तसंस्था)

### नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा

तेल कंपन्या आणि राज्य सरकारांना या नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तेलाची साठेबाजी, काळाबाजार आणि अपहार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. ही कारवाई अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत केली जाईल. आवश्यक वाटल्यास सरकार विशिष्ट ग्राहकांना किंवा प्रदेशांना या नियमांमधून सूट देऊ शकते. हा निर्बंध ९० दिवसांनंतर पुन्हा वाढवला जाऊ शकतो. देशभरात तेलाचा सुरक्षित आणि न्याय्य पुरवठा सुनिश्चित करणे, हा याचा मुख्य उद्देश आहे.

---

## भोपाळ एटीएसचा सहारनपूरमध्ये छापा

**सहारनपूर, १२ जून**

भोपाळ एटीएसने शुक्रवारी सायंकाळी एका स्थानिक पथकासह नानौता येथील मोहल्ला अफगाणमधून एका तरुणाला ताब्यात घेतले. भोपाळमधील एका देशद्रोहाच्या प्रकरणात या तरुणाचे नाव समोर आले होते. तो एका पाकिस्तानी सूत्रधाराच्या संपर्कात असल्याचा संशय आहे. भोपाळ एटीएसने या तरुणाला आपल्यासोबत नेले आहे. त्याच्याकडून चार मोबाईल आणि काही धार्मिक साहित्यही जप्त करण्यात आले.

एटीएसच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, भोपाळमध्ये दाखल झालेल्या एका देशद्रोहाच्या प्रकरणाच्या तपासादरम्यान या तरुणाचे नाव समोर आले होते. त्यासंदर्भात या तरुणाला सहआरोपी मानून त्याच्यावर कारवाई करण्यात आली. हा तपास भोपाळमध्ये अटक केलेल्या मोहम्मद फराजच्या प्रकरणाशी जोडला जात आहे.

---

# शेअर बाजाराची दमदार झेप; निफ्टी २३,६०० च्या पार

**मुंबई, १२ जून**

पश्चिम आशियातील तणाव कमी होण्याची चिन्हे आणि खनिज तेलाच्या घसरलेल्या किमतींमुळे भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी जोरदार तेजी पाहायला मिळाली. गुंतवणूकदारांनी केलेल्या चौफेर खरेदीच्या जोरावर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीने २३,६०० अंकांचा टप्पा ओलांडला, तर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स तब्बल १,६०० हून अधिक अंकांनी वधारला. खनिज तेलाचे दर कमी होणे, भारतीय रुपयाचे मजबूत होणे आणि जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतांमुळे बाजारात उत्साहाचे वातावरण होते.



अमेरिका आणि इराण यांच्यात शांतता कराराच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे वृत्त आल्यानंतर पश्चिम आशियातील परिस्थिती सुधारण्याची आशा निर्माण झाली आहे. या घडामोडींमुळे जागतिक बाजारातील जोखीम कमी झाली आणि खनिज तेलाच्या किमती घसरल्या. शुक्रवारी बाजार बंद होताना सेन्सेक्स १,६९५.४० अंकांच्या म्हणजेच २.३० टक्क्यांच्या वाढीसह ७५,५२७.९५ अंकांवर स्थिरावला. तसेच निफ्टी ४६१.३० अंकांच्या म्हणजेच १.९९ टक्क्यांच्या वाढीसह २३,६२२.९० अंकांवर बंद झाला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया ६४ पैशांनी मजबूत होत ९५.११ वर बंद झाला.

या पार्श्वभूमीवर, भारतीय शेअर बाजार सध्या प्रदीर्घ मंदी किंवा चढ-उताराच्या शेवटच्या टप्प्यात असल्याचे दिसून येत आहे. देशांतर्गत बाजारातील मजबूत तरलतेमुळे (लिक्विडिटी) जागतिक पातळीवरील आर्थिक धक्क्यांचा बाजारावर फारसा परिणाम झाला नाही. विदेशी गुंतवणूकदारांनी केलेली विक्री देशांतर्गत गुंतवणूकदारांनी शोषून घेतली असून, यामुळे बाजाराला स्थिरता मिळाली आहे. आता विदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीचा वेग कमी झाल्यास किंवा अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरांबाबत स्पष्टता आल्यास, देशांतर्गत भांडवलाच्या जोरावर बाजारात मोठी तेजी येऊ शकते. (वृत्तसंस्था)

---

# कल्याण बॅनर्जी ज्येष्ठ, विरोधात बोलणार नाही : अभिषेक बॅनर्जी

**कोलकाता, १२ जून**

तृणमूल काँग्रेसमध्ये मोठी फूट पडल्याच्या चर्चादरम्यान पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी शुक्रवारी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली. पक्षाचे ज्येष्ठ नेते कल्याण बॅनर्जी यांच्या वक्तव्यावर ते म्हणाले, ते माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहेत. त्यांना स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार आहे. ते लहानपणापासून पाहत आले आहेत. मी त्यांच्या विरोधात काहीही बोलणार नाही. मला

बनावट सही प्रकरणातील गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) समन्सबाबत अभिषेक बॅनर्जी म्हणाले, मला सीआयडीने बोलावले होते. मी तिथे साडेपाच तास होतो. मला १४ जूनला पुन्हा बोलावण्यात आले आहे. मी चौकशीला हजर राहील. मी तपास यंत्रणांना नेहमीच सहकार्य करतो. मला दुसऱ्या एका प्रकरणातही पुन्हा बोलावले जाईल, असेही त्यांनी सांगितले. दबाव कितीही असला तरी इंचभरही मागे हटणार नाही ते पुढे म्हणाले, माझ्या उपस्थितीबाबत सीआयडीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अनेक लोक चर्चा करीत आहेत. या प्रकरणात माहिती फुटल्याबद्दल आम्ही उच्च न्यायालयात जाऊ, हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. मी स्वतः कोणतीही माहिती देत नाही. या लढ्यात आम्ही इंचभरही मागे हटणार नाही.

---

## पूंछमध्ये ग्रेनेड स्फोट; दोन जवान जखमी

**पूंछ;** जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ प्रशिक्षण सरावादरम्यान झालेल्या अपघाती हँड ग्रेनेड स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान जखमी झाले. हे जवान एका अग्रिम भागात नियमित सराव करत असताना ही घटना घडली. स्फोटानंतर लगेचच दोन्ही जखमी जवानांना जवळच्या लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. लष्कर आणि सुरक्षा यंत्रणांनी या घटनेची दखल घेतली असून स्फोटाचा तपास सुरू केला आहे.

---

# अमेरिका-इराणमध्ये उद्या शांतता करार

## सहा मुद्द्यांवर सहमती

**वॉशिंग्टन, १२ जून**

इराण आणि अमेरिका यांच्यात रविवारी स्वित्झर्लंडमधील जीनेव्हा येथे करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील हा अंतरिम करार या आठवड्याच्या अखेरीस अंतिम होऊ शकतो. यामध्ये युद्ध टाळणे आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे तसेच अणुबॉम्ब न बनवणे यावर चर्चा समाविष्ट असेल अशी माहिती समोर आली.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा करार अंतिम झाल्याची घोषणा केली, परंतु काही मुद्द्यांवरील वाटाघाटी जिनिव्हा करारानंतर होतील अशी माहिती एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. दुसरीकडे इराणने कराराचा दावा फेटाळला आहे. जिनिव्हा बैठकीसाठी करारातील सहा प्रमुख मुद्द्यांवर सहमती झाली आहे. करारावर स्वाक्षरी झाल्यावर लेबनॉनसह सर्व आघाड्यांवर ६० दिवसांची युद्धबंदी सुरू होईल. होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईल आणि त्यातून जाणाऱ्या जहाजांकडून इराण कोणतेही शुल्क आकारणार नाही. करार झाल्यानंतर ३० दिवसांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक युद्धपूर्व पातळीवर परत येईल.

(वृत्तसंस्था)

---

# 'शेगाव' कचोरीचे नमुने जप्त

**शेगाव, १२ जून**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनात राज्यभर भेसळयुक्तव निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांविरोधात सुरू असलेल्या धडक कारवाईची झळ संतनगरी शेगावलाही बसली आहे. शहरातील सर्वांत जुने व प्रसिद्ध असलेल्या तीरथराम शेगाव कचोरी सेंटरवर पथकाने अचानक भेट देत खाद्यपदार्थ निर्मितीसाठी वापरण्यात येणार्या कच्च्या मालाचे नमुने तपासणीसाठी घेतले.

११ जून रोजी दुपारी बुलढाणा अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकातील अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांच्या नेतृत्वात संबंधित कचोरी केंद्रावर तपासणी केली. कचोरी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे खाद्यतेल व मैद्याचे नमुने अधिकृत तपासणीसाठी जप्त करण्यात आले.

शेगावातील प्रसिद्ध कचोरी केंद्रावर झालेल्या कारवाईमुळे शहरात चर्चांना उधाण आले असून, भेसळ करणार्या दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. (तभा वृत्तसेवा)

### नेहमीप्रमाणेच नमुने घेण्यात आले : भूपेश शर्मा

अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी नियमितपणे सहा महिन्यांतून तपासणीसाठी येत असतात. यावेळीही त्यांनी तेल व मैद्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशासन जे निर्देश देईल, त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही व बदल करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया कचोरी सेंटरचे संचालक भूपेश शर्मा यांनी 'तरुण भारत'शी बोलताना दिली.

---

## तीन ठाणेदारांसह चौघांचा मृत्यू

पाटणा : बिहारमधील बेगुसराय येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात तीन ठाणेदारांसह चौघांचा मृत्यू झाला. मृत पोलिस अधिकारी पाटणा येथे एक दिवसाचे सरकारी प्रशिक्षण पूर्ण करून सरकारी वाहनाने परतत होते. धडक इतकी जबर होती की, गाडीचे तुकडे तुकडे झाले. या घटनेमुळे संपूर्ण पोलिस विभागात शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये ठाणेदार नीरज कुमार, ज्ञानेंद्र अमर, साजन पासवान, वाहन चालक नीरज कुमारचा समावेश आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कारची उभ्या ट्रकला धडक; चार जणांचा मृत्यू

**उन्नाव :** भरधाव कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. यात कारस्वार चौघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तसेच कारचाही चक्काचूर झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास उन्नाव जिल्ह्यातील गंगा द्रुतगती मार्गावर गंगाखेड गावाजवळ घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त वाहनाच्या नंबर प्लेटच्या आधारे केलेल्या प्राथमिक तपासात मृत व्यक्ती प्रयागराज जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. सध्या पोलिस मृताच्या ओळखी पटवत आहेत.

### भारत-अफगाणिस्तान पहिला वन-डे सामना आज

**धर्मशाला :** शनिवारी हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या (एचपीसीए) स्टेडियमवर शनिवारपासून भारत आणि अफगाणिस्तानदरम्यानच्या तीन सामन्यांच्या वन-डे आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेला प्रारंभ होणार आहे. विराट कोहलीच्या अनुपस्थितीत संघ फलंदाजीच्या तिसऱ्या क्रमांकावर काही प्रयोग करेल, असे संकेत भारताचे वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केल यांनी दिले आहेत. अहमदाबाद येथे गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या इंडियन प्रीमियर लीगच्या अंतिम सामन्यात नाबाद ७५ धावांची विजयी खेळी करताना दुखापत झाल्यामुळे कोहलीला अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांतून बाहेर राहावे लागले आहे. त्याच्या अनुपस्थितीत, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी ईशान किशन, केएल राहुल आणि यशस्वी जैयल हे दावेदार आहेत. मला वाटते की या मालिकेत आम्ही तिसऱ्या क्रमांकाबाबत काही प्रयोग करू,- मग तो ईशान (किशन) असो, केएल (राहुल) असो किंवा यशस्वी (जयस्वाल). आमच्याकडे काही एकदिवसीय सामने आहेत आणि आम्ही खेळाडूंना वेगवेगळ्या क्रमांकांवर संधी देऊ, जेणेकरून संघाची रचना कशी करता येईल आणि कोणते विविध पर्याय उपलब्ध आहेत, याची आम्हाला चांगली कल्पना येईल, असे मॉर्केल म्हणाले.

# प्रवाशांना वेठीस धरू नका : सरनाईक





**मुंबई, १२ जून**

एसटी ही केवळ एक वाहतूक व्यवस्था नाही, तर ती लाखो गोरगरीब, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेची 'जीवनवाहिनी' आहे. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत राज्य सरकार पूर्णपणे सकारात्मक असून बहुतांश मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपाचे हत्यार उपसून आणि प्रवाशांना वेठीस धरून आंदोलन करू नका, असे भावनिक आवाहन राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

शिव-परिवहन कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'अभिनंदन व सत्कार समारंभात' मंत्री सरनाईक बोलत होते. यावेळी मंचावर संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती देताना सरनाईक यांनी स्पष्ट केले की, महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांना आता राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे ५६ टक्के महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यापुढे जेव्हा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढेल, तेव्हा ती वाढ एसटी कर्मचाऱ्यांनाही आपोआप लागू होईल. त्यामुळे भविष्यात केवळ महागाई भत्त्यासाठी कर्मचाऱ्यांना आंदोलन करण्याची वेळच येणार नाही. यासोबतच, कर्मचाऱ्यांच्या घरभाडे भत्त्यात वाढ करण्यासाठी १०० कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्याच्या सूचना एसटी प्रशासनाला देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. कर्मचाऱ्यांच्या ज्या आर्थिक किंवा इतर मागण्या प्रलंबित आहेत, त्याबाबतही सरकार संवेदनशील आहे. उर्वरित मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत लवकरच सर्व कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत एक विशेष बैठक आयोजित केली जाईल. या बैठकीत निश्चितच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही मंत्री सरनाईक यांनी दिली.

(तभा वृत्तसेवा)

### शाळा सुरू होत आहेत, विद्यार्थ्यांचे नुकसान नको

१५ जूनपासून राज्यभरात शाळा सुरू होत आहेत. या पार्श्वभूमीवर संवादातून मार्ग काढण्याचे आवाहन करत सरनाईक म्हणाले, "ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी शिक्षणासाठी पूर्णपणे एसटीवर अवलंबून असतात. अशा अत्यंत महत्त्वाच्या वेळी जर आंदोलन झाले, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आणि सर्वसामान्यांच्या जगण्याची घडी विस्कटेल. आम्हाला कर्मचाऱ्यांच्या भावना समजतात, पण जनतेची गैरसोय होणार नाही याची काळजी घेणे हे आपले सर्वांचे सामूहिक कर्तव्य आहे.संघर्षाऐवजी समन्वयातूनच सर्वांचे हित साधले जाईल आणि सरकारकडून संवादाचा मार्ग नेहमीच खुला राहील, असा ठाम विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी व्यक्त केला.

# लेफ्टनंट जनरल घई राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सल्लागार

## ऑपरेशन सिंदूरमध्ये बजावली मोठी भूमिका



**नवी दिल्ली, १२ जून**

भारतीय लष्करातील वरिष्ठ अधिकारी लेफ्टनंट जनरल राजीव घई यांची राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाचे (एनएससीएस) नवीन लष्करी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी पाकिस्तानविरोधात राबविण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदूरवेळी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

या पदावर नियुक्त होणारे ते पहिले कार्यरत अधिकारी आहेत. ऑपरेशन सिंदूर दरम्यान लेफ्टनंट जनरल राजीव घई हे लष्करी कारवायांचे महासंचालक होते. एनएससीएसच्या नवीन लष्करी सल्लागारपदी लेफ्टनंट घई यांची नियुक्ती झाल्याची माहिती संरक्षण विभागाने प्रसिद्धीपत्रकातून दिली.

घई हे डिसेंबर १९८९ मध्ये डेहराडून येथील भारतीय लष्करी अकादमीमधून कुमाऊँ रेजिमेंटमध्ये अधिकारी म्हणून दाखल झाले.

त्यांनी उप-लष्करप्रमुख (रणनीती) आणि श्रीनगरस्थित १५ व्या कॉर्प्सचे (चिनार कॉर्प्स) जनरल ऑफिसर कमांडिंग म्हणून काम पाहिले. त्यांना उत्तम युद्ध सेवा पदक, अति विशिष्ट सेवा पदक आणि आर्मी मेडलने सन्मानित करण्यात आले. घई हे ते भारतीय लष्करी अधिकारी आहेत, ज्यांच्याकडे पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी विनंती केली होती. पाकिस्तानने त्यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतरच भारताने शस्त्रसंधी लागू केली. (वृत्तसंस्था)

# किरकोळ महागाईचा दर ३.९३ टक्क्यांवर

## सर्वसामान्यांच्या खिशावर पडणार बोजा

**नवी दिल्ली, १२ जून**

वाढत्या अन्न आणि इंधनाच्या किमतींमुळे भारतातील किरकोळ महागाईचा दर मे महिन्यात ३.९३ टक्क्यांवर पोहोचला आहे. ही वाढ होऊनही महागाई सलग १६ व्या महिन्यात आरबीआयच्या ४ टक्क्यांच्या मर्यादेखाली राहिली आहे. या महागाईने पुन्हा एकदा सर्वसामान्यांच्या खिशावर बोजा पडणार आहे.

किरकोळ महागाई एप्रिलमधील ३.४८ टक्क्यांवरून मे महिन्यात ३.९३ टक्केपर्यंत वाढली आहे. ही वाढ प्रामुख्याने वाढत्या अन्नधान्याच्या किमतींमुळे झाली आहे. ही माहिती राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने शुक्रवारी प्रसिद्ध केलेल्या सरकारी आकडेवारीतून समोर आली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित अन्नधान्याची महागाई एप्रिलमधील ४.२ टक्क्यांवरून मे महिन्यात ४.७८ टक्क्यांवर पोहोचली आहे. या वाढीचा थेट परिणाम खर्चावर होणार आहे.

### कोणत्या वस्तूंच्या किमतीत सर्वाधिक वाढ?

महागलेल्या पाच वस्तूंच्या यादीत मौल्यवान धातूंचे दागिने, टोमॅटो, आले, मनुका आणि सुकी द्राक्षे यांचा समावेश आहे. या वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्याचा थेट परिणाम ग्राहक खर्चावर होत आहे. टोमॅटो आणि आल्यासारख्या रोजच्या वापरातील भाज्यांच्या किमतीतील वाढ विशेषतः चिंताजनक आहे. त्यामुळे दैनंदिन खर्च वाढला आहे. दुसरीकडे काही वस्तूंच्या किमतीत कमी वाढ झाली. जिरे, बटाटे, वाटाणे, दुचाकी, चारचाकी यांच्या किमतीत तुलनेत फारशी वाढ झालेली नाही. ही आकडेवारी अखिल भारतीय स्तरावर एकत्रितपणे नोंदविली गेली. यावरून असे दिसून येते की, काही क्षेत्रांतील किमती तुलनेने स्थिर राहिल्या आहेत.

### इंधनाच्या किमतींवर काय परिणाम होईल?

मे महिन्यापासून किरकोळ पेट्रोलच्या किमती ७.४ टक्क्यांनी तर डिझेलच्या किमती ८.४ टक्क्यांनी वाढल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने या महिन्याच्या सुरुवातीला, १ ते १२ जून या कालावधीसाठीच्या आपल्या पतधोरण निवेदनात हे नमूद केले आहे. या वाढीचा मुख्य चलनवाढीवर अंदाजे ३६ बेसिस पॉइंट्सचा थेट परिणाम होईल. याव्यतिरिक्त दुय्यम परिणामही दिसून येतील. हे सर्व परिणाम येत्या काही महिन्यांत ग्राहक किंमत निर्देशांकातील चलनवाढीमध्ये प्रतिबिंबित होतील. यामुळे भविष्यात चलनवाढ आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**महागाईचा आर्थिक विकासावर होणार नकारात्मक परिणाम**

वाढत्या महागाईमुळे शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांतील ग्राहकांना जास्त खर्च करावा लागत आहे. याचा विशेषतः गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांवर परिणाम होत आहे. महागाईचा हा आकडा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या लक्ष्याच्या जवळ पोहोचत आहे. सरकारने रिझर्व्ह बँकेला महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे लक्ष्य दिले आहे; ज्यात दोन टक्क्यांची सवलत समाविष्ट आहे. आर्थिक स्थिरता राखण्यासाठी हे लक्ष्य महत्त्वाचे आहे. वाढत्या महागाईचा आर्थिक विकासावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, असे बोलले जात आहे.

**महागाईबाबत रिझर्व्ह बँकेची भूमिका काय?**

भारतीय रिझर्व्ह बँक आपले चलनविषयक धोरण ठरवताना प्रामुख्याने ग्राहक किंमत निर्देशांकाचा विचार करते. गत आठवड्यात ५ जूनला रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठीचा आपला महागाईचा अंदाज वाढविला आहे. हा अंदाज सुरुवातीला ४.६ टक्के होता, जो आता ५.१ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे. ही वाढ प्रामुख्याने वाढत्या उत्पादन खर्चांमुळे झाली आहे. जागतिक ऊर्जा किमतींमधील वाढीचा परिणाम किरकोळ पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींवर झाला आहे, जे महागाई वाढवणारे एक प्रमुख घटक आहे. मे महिन्यापासून किरकोळ इंधनाच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेने या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

(वृत्तसंस्था)

# सरसंघचालक प्रवास करीत असलेल्या 'शताब्दी'वर दगडफेक

## उत्तरप्रदेशच्या फिरोजाबाद येथील घटना; दोन अल्पवयीन ताब्यात



**फिरोजाबाद, १२ जून**

उत्तरप्रदेशातील फिरोजाबाद येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत प्रवास करीत असलेल्या शताब्दी एक्सप्रेसवर दगडफेक झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी समोर आली. कानपूरमध्ये एका कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर डॉ. मोहनजी भागवत लखनौ-नवी दिल्ली शताब्दी एक्सप्रेसने दिल्लीकडे जात होते. याचदरम्यान फिरोजाबादजवळ त्यांच्या बोगीवर दगडफेक करण्यात आली. रेल्वे पोलिस सुरक्षा पथकाने याप्रकरणी दोन अल्पवयीनांना ताब्यात घेतले.

लखनौहून दिल्लीकडे जाणाऱ्या शताब्दी एक्सप्रेसवर मख्खनपूर आणि फिरोजाबाद रेल्वे स्थानकांदरम्यान दगडफेक करण्यात आली, अशी माहिती उत्तर-मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शशिकांत त्रिपाठी यांनी दिली. डॉ. मोहनजी भागवत ई-१ डब्यातील ३९ आणि ४० क्रमांकाच्या आसनांवर प्रवास करीत होते. फेकलेला दगड ५० क्रमांकाच्या आसनाजवळील खिडकीवर आदळला. मात्र, सुदैवाने कुणालाही इजा झाली नाही. त्यानंतर सुरक्षा व्यवस्था वाढवून गाडी दिल्लीकडे रवाना करण्यात आली. सुरक्षेच्या दृष्टीने गाडी कुठेही थांबविण्यात आली नाही. घटनेची माहिती तत्काळ टूंडला जंक्शनला देण्यात आली. त्यानंतर शताब्दी एक्सप्रेसची सुरक्षा वाढविण्यात आली. याप्रकरणी रेल्वे सुरक्षा पथकाने दोन अल्पवयीनांना ताब्यात घेतली असून त्यांची चौकशी सुरू आहे. (वृत्तसंस्था)

### यापूर्वीही झाली होती दगडफेक

१९ फेब्रुवारी २०२६ मध्ये उत्तरप्रदेशातील हरदोई येथे लखनौहून मेरठला जाणाऱ्या 'वंदे भारत' एक्सप्रेसवर कौढा गावाजवळ दगडफेक झाली. या ट्रेनमध्ये डॉ. मोहनजी भागवत प्रवास करीत होते. दगडफेकीत खिडकीचा काच फुटला. परंतु, सुदैवाने डॉ. मोहनजी भागवत यांना कोणतीही इजा झाली नाही. याप्रकरणातही दोन अल्पवयीनांना ताब्यात घेतले होते.

# वैमानिकाची चूक की तांत्रिक बिघाड

## एअर इंडिया विमान अपघाताचा तपास अंतिम टप्प्यात




**नवी दिल्ली, १२ जून**

एअर इंडियाच्या एआय-१७१ विमान अपघाताचा तपास आता अंतिम टप्प्यात आहे. विमानचालन सुरक्षा मंडळाने (एएआयबी) या प्रकरणी एक अंतरिम निवेदन जारी केले आहे. मंडळाने स्पष्ट केले की, तपास पथक गतवर्षभरापासून रात्रंदिवस काम करत आहे. अपघाताच्या लहान-मोठ्या प्रत्येक पैलूची बारकाईने तपासणी केली जात आहे. या कामात भारत आणि परदेशातील आघाडीचे तांत्रिक तज्ञ आणि सल्लागार सामील करून घेतले जात आहेत.

तपास यंत्रणेने प्रसारमाध्यमे, जनता आणि सर्व संबंधितांना विशेष आवाहन केले आहे. तपास सुरू असताना कोणत्याही अटकळी किंवा घाईच्या निष्कर्षांपासून दूर राहावे, असे एएआयबीने आवाहन केले आहे. दरम्यान, अंतिम अहवाल प्रसिद्ध करण्यासाठी यंत्रणेने अद्याप कोणतीही विशिष्ट अंतिम मुदत निश्चित केलेली नाही.

तपास पथकाने आतापर्यंत महत्त्वपूर्ण माहिती गोळा केली आहे. विमानाची मुख्य प्रणाली आणि ब्लॅक बॉक्स (फ्लाइट रेकॉर्डर) मधील माहितीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. इंजिनचे घटक आणि मागील देखभालीच्या नोंदींचीही तपासणी करण्यात आली आहे. आतापर्यंत गोळा केलेले सर्व पुरावे आणि कागदपत्रे एकत्रित करून एक सर्वसमावेशक अहवाल तयार केला जात आहे. सुरक्षा मंडळाने आश्वासन दिले की, तपास पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक असेल. नागरी विमान वाहतूक सुरक्षेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. जिथे आवश्यक असेल तिथे वैज्ञानिक आणि तांत्रिक तपासणी पुन्हा केली जाईल. विमान वाहतूक क्षेत्रातील प्रत्येकाचा विश्वास सुनिश्चित करून अंतिम निर्णय केवळ ठोस आणि पडताळण्यायोग्य पुराव्यांच्या आधारावर घेतला जाईल.

**सुरक्षितता वाढवणे हा खरा उद्देश**

एएआयबीनुसार, या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश दोषारोप करणे किंवा कायदेशीर जबाबदारी निश्चित करणे नाही. अपघात तपासाचा एकमेव उद्देश विमान वाहतूक सुरक्षा वाढवणे हा आहे. या तपासामुळे त्रुटी ओळखल्या जातात, जेणेकरून भविष्यासाठी सुरक्षिततेच्या शिफारसी जारी केल्या जाऊ शकतील. एएआयबीने स्वतंत्र, निष्पक्ष आणि पुराव्यावर आधारित तपासासाठी आपली पूर्ण वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

### तपासाला विलंब का झाला?

अपघाताला एक वर्ष लोटूनही तपास पूर्ण न होण्याची अनेक प्रमुख कारणे आहेत. एएआयबीच्या मते, विमानाचा ढिगारा आणि इंजिनच्या भागांची केवळ बाह्य तपासणी करणे पुरेसे नव्हते. अनेक गुंतागुंतीच्या प्रयोगशाळा चाचण्या आणि वैज्ञानिक विश्लेषणे केली जात आहेत. त्यासाठी बराच वेळ लागतो. शिवाय, विमानांच्या ब्लॅक बॉक्समधील प्रचंड माहिती उलगडणे आणि मानवी चुका व संघटनात्मक घटकांमधील दुवे जोडणे ही एक खूप दीर्घ प्रक्रिया आहे.



इस्त्रायल आणि लेबनॉन यांच्यातील संघर्ष सध्यातरी थांबला असला तरी इस्त्रायलचे पॅलेस्टाईनवरील हल्ले सुरूच आहेत. शुक्रवारी इस्त्रायली लढाऊ विमानांनी गाझा पट्टीतील मघाझई येथे हल्ला केला

# अमरनाथ यात्रेसाठी अभेद्य सुरक्षा कवच तयार करा

## गृहमंत्री अमित शाह यांचे सुरक्षा यंत्रणेला निर्देश

**नवी दिल्ली, १२ जून**

३ जुलैपासून सुरु होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या सुरक्षितेसंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी उच्चस्तरीय सुरक्षा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सर्व सुरक्षा यंत्रणांच्या समन्वित प्रयत्नांतून यात्रेसाठी एक अभेद्य सुरक्षा कवच तयार करा, असे निर्देश दिले. तसेच निगराणीसाठी ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर निगराणी प्रणालींचा वापर करावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षा अधिक मजबूत करावी, असेही ते म्हणाले.

शाह पुढे म्हणाले, यात्रेदरम्यान कोणत्याही उपद्रवी घटकांना यात्रेत घुसखोरी करण्यापासून रोखण्यासाठी जम्मू आणि काश्मीर पोलिस, सीआरपीएफ, बीएसएफ आणि आयटीबीपी यांच्यासह इतर सुरक्षा यंत्रणांमार्फत यात्रा मार्गावर बहुस्तरीय सुरक्षा जाळे स्थापन करावे. शिबिरांमध्ये राहणाऱ्या भाविकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सीएपीएफ आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांना शिबिरांच्या आत आणि बाहेर सतत उपस्थिती ठेवावी, असे निर्देशही त्यांनी दिले. या बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, लष्करप्रमुख, केंद्रीय गृहसचिव, गुप्तचर विभाअगाचे प्रमुख, जम्मू-काश्मीरचे पोलिस महासंचालक, सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ आणि सीएपीएफचे सर्व पोलिस महासंचालकांसह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**हवामानानुसार भाविकांच्या प्रवासाची व्यवस्था करावी**

शाह म्हणााले, पावसाळा सुरू असल्यामुळे हवामानाची स्थिती आणि अंदाजाच्या आधारे यात्रेकरूंच्या गटांच्या प्रवासाची व्यवस्था करावी. तसेच यात्रेशी संबंधित स्थानिक लोकांची आणि प्राण्यांची नोंदणी करण्याची व्यवस्था करून त्यांना क्यूआर कोड असलेली ओळखपत्रे देण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी केली. (वृत्तसंस्था)

# सरकारी इमारतीला आग; ईव्हीएम यंत्रे जळून खाक

## पश्चिम बंगालमधील घटना, विधानसभा निवडणुकीत झाला वापर

**कोलकाता, १२ जून**

पश्चिम बंगालच्या दक्षिण कोलकाता येथील अलीपूर भागातील नऊ मजली शासकीय इमारतीला भीषण आग लागली. यात विधानसभा निवडणुकीत वापरण्यात आलेल्या चार हजार ईव्हीएम मशीन (मतदान यंत्र) जळून खाक झाल्या. आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन पथकाला यश आले आहे.

याप्रकरणी एफआयआर दाखल करून तपास सुरू करण्यात आल्याची माहिती शुवेन्दू सरकारमधील मंत्री कौशिक चौधरी यांनी माध्यमांशी बोलताना दिली. गुरुवारी रात्री लागलेल्या आगीत नऊ मजली इमारतीतील शासकीय दस्तावेज आणि ईव्हीएम यंत्रे जळाली. या इमारतीत इतर विभागांव्यतिरिक्त दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचे कार्यालयही होते. यावर्षी झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीदरम्यान १० मतदारसंघांमध्ये हे ईव्हीएम वापरण्यात आले होते. आगीची घटना सामान्य नसून घातपाताचा संशय आहे.

आग नवव्या आणि दहाव्या मजल्यांपर्यंत कशी पोहोचली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या मजल्यांना कोणताही धोका न पोहोचवता आग सातव्या आणि आठव्या मजल्यांपर्यंत कशी पोहोचली, याचा तपास करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्याचेही ते म्हणाले.

(वृत्तसंस्था)

# थकित देण्यांमुळे बस सेवा विस्कळीत करण्याचा कर्मचाऱ्यांचा इशारा

**हमीरपूर, १२ जून**

हिमाचल रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन कर्मचारी संघटनेने शुक्रवारी हमीरपूर बस स्थानकावर 'गेट मीटिंग' आणि निदर्शने केली. तसेच, आपल्या मागण्या मान्य न झाल्यास २४ जूननंतर बस सेवा विस्कळीत होऊ शकते, असा इशाराही त्यांनी दिला. या निदर्शनांमध्ये राज्य हिमाचल रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मान सिंग ठाकूर उपस्थित होते. यावेळी कर्मचाऱ्यांनी वेतन, भत्ते आणि इतर प्रलंबित देयके मिळण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीदरम्यान कर्मचाऱ्यांनी महामंडळ व्यवस्थापन आणि सरकारला त्यांच्या मागण्यांवर त्वरित कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

आंदोलकांनी राज्य सरकार आणि महामंडळाच्या विरोधात घोषणाबाजीही केली. लवकरच सकारात्मक पावले उचलली न गेल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारासंघटनेच्या नेत्यांनी दिला. वेतन आणि थकबाकी मिळण्यास होणाऱ्या विलंबावरून राज्यभरातील कर्मचारी संघटनांनी अलिकडेच आंदोलनाचा इशारा दिला असून २४ जूनच्या मध्यरात्रीनंतर बस सेवा विस्कळीत होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मागण्यांची त्वरित पूर्तता करण्याच्या मागणीसाठी गेल्या महिन्यात मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांना निवेदन सादर करण्यात आले होते; परंतु मागण्या अद्याप पूर्ण न झाल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे, असे ठाकूर यांनी सांगितले.

थकबाकीचा हप्ता अद्याप जारी करण्यात आलेला नाही, असे त्यांनी नमूद केले. संघटनेने १५ कलमी मागण्यांचे निवेदनतयार केले आहे, ज्यामध्ये गणवेश आणि भोजन भत्त्यांशी संबंधित मुद्यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# व्याप्त काश्मिरात लष्कराचा धुडगूस

## निदर्शकांवर बेछूट गोळीबार; १८ नागरिकांचा मृत्यू, ७० जखमी

**इस्लामाबाद, १२ जून**

पाकिस्तानी सरकार आणि लष्कराच्या अत्याचाराविरोधात जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीच्या (जेएएसी) नेतृत्वात व्याप्त काश्मीरातील रावळकोट येथे आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर सुरक्षा दलाने शुक्रवारी बेछूट गोळीबार केला, यात १८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७० पेक्षा अधिक जखमी झाले.



पाकिस्तानी सैन्य व्याप्त काश्मीरमध्ये क्रूरतेच्या सर्व मर्यादा ओलांडत निदर्शकांवर बळाचा वापर करत आहे. व्याप्त काश्मीरमध्ये स्वस्त पीठ आणि तांदूळ, परवडणारी वीज आणि मूलभूत हक्कांच्या मागणीसाठी जेएएसीच्या नेतृत्वात रस्त्यावर उतरलेल्या सामान्य लोकांवर पाकिस्तानी सुरक्षा दलाकडून सातत्याने बळाचा वापर केला जात आहे. मुज्जफराबाद येथून निघालेले लाखो लोक शुक्रवारी रावळकोट येथे पोहोचले. ईदगाह मैदानावरून विधानसभेकडे जाण्याच्या तयारीत असलेल्या लोकांवर बळाचा वापर करत सुरक्षा दलाने नळकांड्या फोडल्या आणि बेछूट गोळीबार केला. यावेळी चेंगराचेंगरी झाली, जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यात आले. तिथे डॉक्टरांनी १८ लोकांना मृत घोषित केले, तर ७० पेक्षा अधिक जखमींवर उपचार सुरू असल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला दिली. जेएएसीचे नेते शौकत नवाज मीर यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून आरोप केला की, पाकिस्तानी सैनिकांनी कोणताही इशारा न देता निःशस्त्र नागरिकांवर गोळीबार केला. आंदोलनात पुरुष, महिला आणि तरुण आणि वकील संघटनांचा समावेश आहे. व्याप्त काश्मीरमध्ये सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान दडपशाहीच्या कारवायांमध्ये १३५ जणांनी प्राण गमावले आहेत. रक्तपातानंतरही शेकडो आंदोलक मागे हटण्यास तयार नाहीत.

**हजार जणांना अटक, इंटरनेट बंद दहा दिवस बंद**

पाकिस्तान सरकारविरोधात आंदोलन करणाऱ्या हजारपेक्षा अधिक नागरिकांना अटक करण्यात आली. सरकारने संपूर्ण प्रदेशातील इंटरनेट आणि मोबाईल सेवा दहा दिवसांसाठी बंद करण्याची घोषणा शुक्रवारी केली. रस्ते बंद झाल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठाही ठप्प आहे. प्रशासन लोकांना तडजोड करण्यास भाग पाडण्यासाठी वस्तूंच्या पुरवठ्याचा दबावाचे साधन म्हणून वापर करीत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या आंदोलनाची धग विदेशातही पोहोचली असून, काश्मिरी समुदायाच्या गटांनी ब्रिटन आणि अमेरिकेत आंदोलने सुरू केली आहेत. (वृत्तसंस्था)

### नरसंहार करणे थांबवा : बॉब ब्लॅकमन



ब्रिटिश खासदार बॉब ब्लॅकमन यांनी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये व्याप्त काश्मीरमधील आंदोलने आणि कथित लष्करी कारवाईबद्दल चिंता व्यक्त करताना म्हटले की, पाकिस्तानी लष्कराकडून निष्पाप लोकांवर केलेला बेछूट गोळीबार नरसंहार आहे. पाकिस्तानी सरकारने बळाचा वापर करणे तत्काळ थांबवावे. याप्रकरणाची आंतरराष्ट्रीय संस्थेकडून स्वतंत्र चौकशी व्हायला हवी. पाकिस्तानी उच्चायुक्तांना बोलावून कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

### भारताच्या भूभागावर बेकायदेशीर ताबा

ब्लॅकमन यांनी सांगितले की, पाकिस्तानने १९४७ पासून भारताच्या या भागावर बेकायदेशीरपणे ताबा केला. व्याप्त काश्मीर भारत व पाकिस्तान यांच्यातील दीर्घकाळापासूनचा वादाचा विषय आहे. संसदेतील ३० खासदारांनी परराष्ट्र मंत्र्यांना पत्र लिहून व्याप्त काश्मीरातील आंदोलनावर आपली चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्र्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर पुढील आठवड्यात संसदेत या विषयावर तातडीची बैठक बोलवावी.

### 'करा किंवा मरा'च्या मनस्थितीत नागरिक

गोळीबारानंतर जमावाला संबोधित करताना, आंदोलनाचे नेते सरदार अमन खान म्हणाले की, हा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे आणि जीवित व मालमत्तेची हानी होऊनही तो सुरूच ठेवण्याचा निर्धार नागरिकांचा आहे. रस्त्यावर उतरलेल्या लोकांकडे कोणतीही शस्त्रे नाहीत, ते फक्त स्वस्त अन्न, परवडणारी वीज आणि सन्मानजनक जीवनाची मागणी करत आहेत. तरीही, त्यांना प्रत्युत्तरादाखल गोळीबाराचा सामना करावा लागत आहे.

# मोदींच्या काळात 'विकसित भारता'चा पाया

## नागालँडमधील भाजप नेत्यांचे वक्तव्य

**कोहिमा, १२ जून**

नागालँडमधील भाजप नेत्यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातील १२ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी या काळाचे वर्णन 'परिवर्तनकारी प्रशासनाचे युग' असे केले. ज्यामध्ये जनकल्याण, पायाभूत सुविधांचा विकास, आर्थिक प्रगती आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा या गोष्टींचा समावेश आहे.

१० जून रोजी मोदी हे भारतातील सर्वाधिक काळ पदभार सांभाळणारे निवडून आलेले पंतप्रधान बनले आहेत. त्यांनी सलग ४,३९९ दिवस पदभार सांभाळून जवाहरलाल नेहरूंचा विक्रम मोडला आहे, असे येथील पक्षाच्या मुख्य कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना, नागालँड भाजप विधिमंडळ पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री यांथुंगो पॅटन म्हणाले. मोदी सरकारने मागील १२ वर्षांचा काळ विश्वास, विकास आणि जनकल्याण यांसाठी समर्पित केला आहे. त्यांनी पंतप्रधानांच्या 'राष्ट्र प्रथम' या दृष्टिकोनाचे श्रेय दिले, ज्यामुळे युवा, महिला आणि शेतकरी यांचे सक्षमीकरण झाले आहे आणि पायाभूत सुविधा, डिजिटल नवोपक्रम, समाजकल्याण, आर्थिक विकास व राष्ट्रीय सुरक्षा या क्षेत्रांत प्रगती झाली आहे. ८१ कोटींहून अधिक लोकांना दरमहा मोफत अन्नधान्य मिळत आहे, 'पंतप्रधान आवास योजने'अंतर्गत चार कोटींहून अधिक घरे बांधली गेली आहेत आणि 'जल जीवन मिशन'अंतर्गत १०.५ कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा जोडणी देण्यात आली आहे, असे एनडीए सरकारच्या प्रमुख कामगिरीवर प्रकाश टाकताना पॅटन म्हणाले.

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे आणि २०२७ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# १७ वर्षांखालील रँकिंग स्पर्धेत ५०० हून अधिक मल्ल अपात्र

**नवी दिल्ली, १२ जून**

भारतीय कुस्ती महासंघाने (डब्लूएफआय) आधार कार्ड-आधारित वय पडताळणीची कठोर प्रणाली लागू केल्यामुळे वयाबाबतच्या फसवणुकीचे मोठे प्रकरण उघडकीस आले आहे. गोंडा येथे झालेल्या १७ वर्षांखालील राष्ट्रीय खुल्या रँकिंग कुस्ती स्पर्धेत, वय आणि जन्माच्या नोंदींमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळल्याने ५०० हून अधिक मल्लांना अपात्र ठरवण्यात आले. उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात ६ ते ८ जून दरम्यान झालेल्या या स्पर्धेत पुरुष फ्रीस्टाइल, ग्रीको-रोमन आणि महिला अशा विविध गटांमध्ये सुमारे १,२०० मल्लांनी नोंदणी केली होती.




### अरुंधतीसोबत क्रांती, रेणुका अंतिम एकादशमध्ये हवे: अंजुम चोप्रा

**नवी दिल्ली, १२ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या 'अंतिम एकादश'मध्ये अरुंधती रेड्डीसोबतच क्रांती गौड व रेणुका सिंग ठाकूर या दोघींचाही समावेश असायला हवा. इंग्लंडविरुद्धच्या मागील टी-२० मालिकेत झालेले प्रयोग काहीही असले, तरी या तिघी भारताच्या वेगवान गोलंदाजीचा कणा आहेत, असे मत भारताची माजी कर्णधार अंजुम चोप्रा हिने व्यक्त केले. रविवारी एजबॅस्टन येथे पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या पहिल्या सामन्याच्या पार्श्वभूमीवर भारताची गोलंदाजी ही चिंतेची बाब ठरत आहे, विशेषतः खेळाडूंचा फॉर्म आणि संघनिवड अजूनही निश्चिती झालेली नाही. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'काला हिरन'चा पहिला लूक प्रदर्शित



**मुंबई :** सलमान खानच्या बहुचर्चित काळवीट प्रकरणावर आधारित 'काला हिरनः द बॅटल फॉर लेगेसी' या चित्रपटाचा पहिला लुक जारी करण्यात आला आहे. चित्रपटाचा पहिला व्हिडीओ प्रदर्शित झाला. व्हिडीओमध्ये काळवीट शिकार प्रकरण आणि कायदेशीर लढाईशी संबंधित प्रकरण दाखवण्यात आले आहे. अनेक संवाद बिश्नोई समाजाचा त्याग आणि वन्यजीव संरक्षणाप्रती त्यांची बांधिलकी दर्शवत आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन भारत एस. श्रीनाथे यांनी केले आहे. तर अमित जानी याचे लेखक आणि निर्माता आहेत. चित्रपटाचा ग्लोबल टीझर २० जून रोजी प्रदर्शित केला जाईल. आमचा संपूर्ण चित्रपट सलमान खानचा बायोपिक नाही. आमचा चित्रपट सलमान खानच्या दृष्टिकोनातूनही नाही, असे यापूर्वी, अमित जानी यांनी त्यांच्या अधिकृत फेसबुक अकाउंटवर पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये म्हटले होते.

### 'लॉक अप'चा प्रीमियर २७ जूनला

**मुंबई :** एकता कपूर यांच्या बालाजी टेलिफिल्म्सच्या सहकार्याने 'लॉक अप'चा प्रीमियर २७ जून रोजी नेटफ्लिक्सवर होणार असल्याची घोषणा करण्यात आली. यासाठी योग्य वातावरण तयार होत असून, यात भारतातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या काही व्यक्तींना एका छताखाली बंदिस्त केले जाईल. हे गूढ कैदी नेमके कोण होते आणि त्यांना कोणत्या कारणासाठी कैद करण्यात आलं होतं, हे रहस्य आता उलगडले. इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आलेल्या एका व्हिडीओमध्ये फराह खान आणि रितेश देशमुख यांना कैद्यांच्या रूपात दाखवण्यात आले आहे. या क्लिपमध्ये फराह खान 'कैदी क्रमांक ०६' आणि रितेश देशमुख 'कैदी क्रमांक २७' म्हणून दिसत आहेत. दोघेही तुरुंगातील कोठड्यांमध्ये बंदिस्त असून, तिथले वातावरण गूढ आणि तणावपूर्ण आहे.

### तेलगू चित्रपटात दिसणार प्राजक्ता माळी



**मुंबई :** मराठी मनोरंजन क्षेत्रात आपल्या बहुआयामी प्रतिभेच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री प्राजक्ता माळी आता तेलुगू चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवणार आहे. मागील काही वर्षांत प्राजक्ताने मराठी मालिकांपासून मोठ्या पडद्यापर्यंत अनेक लक्षवेधी भूमिका साकारल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, प्राजक्ताचा पहिला तेलुगू चित्रपट सध्या निर्मितीच्या टप्प्यात असून त्याचे चित्रिकरण वेगाने सुरू आहे. हा चित्रपट याच वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे. मात्र कथानक, कलाकारांची निवड आणि प्राजक्ताच्या भूमिकेबाबतची माहिती अद्याप गुप्त ठेवण्यात आली आहे. मराठी मनोरंजन क्षेत्रात यशस्वी ठरलेली प्राजक्ता आता तेलुगू चित्रपटसृष्टीतही आपली छाप पाडते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शून्य सहनशीलता धोरणावर सहमती

## भारत-बांगलादेशची सीमा सुरक्षेवर चर्चा

**नवी दिल्ली, १२ जून**

भारत आणि बांगलादेशच्या सीमा सुरक्षा दलांच्या प्रमुखांनी सीमापार गुन्हे, बंडखोरीच्या कारवाया आणि सीमा सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही कृतीविरोधात 'शून्य सहनशीलता' धोरण स्वीकारण्याचा सामायिक निर्धार पुन्हा एकदा व्यक्त केला.

बीएसएफ आणि बीजीबी यांच्यातील ५७ वी महासंचालक-स्तरीय सीमा समन्वय परिषद नवी दिल्लीतील बीएसएफ मुख्यालयात पार पडली. परिषदेत दोन्ही बाजूंनी सीमापार गुन्हे प्रभावीपणे रोखण्यासाठीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व बीएसएफचे महासंचालक प्रवीण कुमार यांनी तर, बांगलादेशच्या वतीने बीजीबीचे महासंचालक मेजर जनरल मोहम्मद अशरफुलझमान सिद्दिकी उपस्थित होते. बीएसएफने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, दोन्ही सीमा सुरक्षा दलांमधील द्विपक्षीय यंत्रणा म्हणून, सीमा समन्वय परिषद सध्याच्या सीमा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि सीमा सुरक्षा व व्यवस्थापनाशी संबंधित परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आली. दोन्ही बाजूंनी सीमापार गुन्हे प्रभावीपणे रोखण्यासाठीच्या उपायांवर चर्चा झाली. या गुन्ह्यांमध्ये अमली पदार्थ, शस्त्रे, बनावट चलन, सोने आणि इतर प्रतिबंधित वस्तूंची तस्करी, तसेच अवैध सीमापार हालचाल आणि मानवी तस्करी यांचा समावेश आहे. माहितीची देवाणघेवाण करण्यावर यावेळी सहमती झाली. (वृत्तसंस्था)





### शांतता, स्थिरता राखण्यास वचनबद्ध

दोन्ही शिष्टमंडळांनी सीमा ओलांडण्याच्या घटना, सीमावर्ती पायाभूत सुविधांचे बांधकाम आणि समन्वित सीमा व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीवर आणि सीमेवरील उदयोन्मुख सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी वाढीव सहकार्याची गरज यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. दोन्ही बाजूंनी सीमेवर शांतता, स्थिरता आणि सुव्यवस्था राखण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. समन्वित गस्त वाढवणे, निगराणी मजबूत करणे, माहितीची देवाणघेवाण आणि सीमापार गुन्हेगारी नेटवर्कविरुद्ध संयुक्त प्रयत्न तीव्र करण्यास सहमती दर्शवली.

### पुढील परिषद ढाकामध्ये होणार

दोन्ही बाजूंनी परिषदेच्या निकालावर समाधान व्यक्त केले आणि सुरक्षित व शांततापूर्ण सीमांच्या हितासाठी सहकार्य, परस्पर विश्वास आणि व्यावसायिक सहभाग अधिक दृढ करण्याचा निर्धार व्यक्त केला. संयुक्त चर्चा अहवालावर स्वाक्षरी करून अत्यंत सकारात्मक वातावरणात परिषदेचा समारोप झाला. पुढील डीजी-स्तरीय परिषद नोव्हेंबर २०२६ मध्ये ढाका येथे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले.




एअर इंडिया विमान अपघाताला शुक्रवारी एक वर्ष पूर्ण झाले. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू झाला. प्रदेश भाजपा कार्यालयात दिवंगत विजय रुपाणी यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी श्रद्धांजली वाहिली

# ऊर्जा शोध कराराला नागा गटाचा विरोध

**दिमापूर, १२ जून**

नागा प्रश्नांवर राजकीय तोडगा निश्चित होण्यापूर्वीच आंतरराज्य सीमेवर ऊर्जा संसाधनांच्या शोधकार्याबाबत केंद्र सरकार, आसाम आणि नागालँड यांच्यात झालेल्या कराराला सात नागा संघटनांच्या गटाने विरोध केला आहे. नैसर्गिक संसाधनांवरील मालकी आणि नियंत्रण हे २०१७ मध्ये केंद्र सरकारसोबत स्वाक्षरी केलेल्या 'सहमत भूमिकेचा' एक भाग आहेत, असे 'नागा नॅशनल पॉलिटिकल ग्रुप्स' या गटाने एका निवेदनात ठामपणे सांगितले.

२०१७ च्या करारातील तरतुदींचा हवाला देत, या गटाने असा दावा केला की, औपचारिक राजकीय तोडगा निघण्यापूर्वी नागा क्षेत्रांमध्ये नैसर्गिक संसाधनांचा शोध घेण्याचा कोणताही प्रयत्न बेकायदेशीर आणि सहमत तत्त्वांच्या विरोधात असेल. ऊर्जा संसाधनांचा शोध आणि उत्खनन यांबाबत केंद्र सरकार तसेच आसाम आणि नागालँड सरकार यांच्यात गुरुवारी त्रिपक्षीय करार करण्यात आला. 'नागा नॅशनल पॉलिटिकल ग्रुप्स'च्या कार्यकारी समितीने म्हटले आहे की, राजकीय तोडग्यावर अधिकृतपणे स्वाक्षरी होईपर्यंत कोणतीही राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कंपनी नागा भूमीतून कच्च्या तेलाचे उत्खनन करणार नाही, याची ते खात्री करतील. नागा राजकीय तोडगा निघण्यापूर्वी तेल उत्खनन करण्याच्या कृतीचे वर्णन त्यांनी नागांचे हक्क आणि हितसंबंधांशी केलेला "विश्वासघात" असे केले आहे. या गटाने नागालँड आणि आसाम यांच्यातील महसूल-वाटपाच्या कोणत्याही व्यवस्थेलाही विरोध केला आहे; त्यांचा असा युक्तिवाद आहे की, वादग्रस्त क्षेत्र हे ऐतिहासिक आणि कायदेशीरदृष्ट्या नागा मातृभूमीचा अविभाज्य भाग आहे. सात नागा राजकीय गटांचा समावेश असलेल्या 'नागा नॅशनल पॉलिटिकल ग्रुप्स'च्या कार्यकारी समितीने अंतिम नागा राजकीय तोडग्यासाठी केंद्र सरकारशी वाटाघाटी केल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# केंद्राकडे महाराष्ट्राच्या प्रगतीचा रोड मॅप सादर

## शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरणाचे विशेष प्रयत्न


**नवी दिल्ली, १२ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोड मॅप सादर केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र - २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९-३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले आहेत. (वृत्तसंस्था)

### पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत व्यापक सुधारणा



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

### नवसंशोधनाला चालना आणि आरोग्य क्षेत्राचा विस्तार

राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवसंशोधन धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडविणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## अग्रलेख

# गरजूंच्या आलिंगनांचे भविष्य

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसची अक्षरशः धूळधाण झाली आहे. सलग तीन विधानसभा निवडणुकांत विजय मिळाल्यानंतर ममता बॅनर्जी आणि त्यांचा पक्ष उन्मत्त झाला होता. त्या पक्षाच्या नेत्यांना अहंकार चढला होता, गुंडागर्दी मोठ्या प्रमाणात वाढली होती. राज्यातील जनतेने धडा शिकवल्यानंतर पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणाऱ्या ममता बॅनर्जी यांचे डोळे उघडल्यासारखे दिसत आहेत. दिल्लीत येऊन त्या इंडिया आघाडीच्या बैठकीत सहभागी झाल्या; एवढेच नव्हे तर काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांचीही त्यांनी भेट घेतली. या भेटीनंतरच तृणमूल काँग्रेसच्या काँग्रेसमधील विलीनीकरणाची चर्चा सुरू झाली. अजून याबाबत दोन्ही पक्षांकडून अधिकृतपणे काहीही सांगितले जात नसले, तरी या चर्चेत तथ्य नाही, असे म्हणता येत नाही. ममता बॅनर्जी यांचा पक्ष त्यांच्या राज्यात छटाकभर उरला आहे. उरलासुरला पक्ष टिकवण्यासाठी म्हणण्यापेक्षा आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी ममतांसमोर आज नाही तर उद्या काँग्रेसमध्ये विलीन होण्याशिवाय पर्याय नाही. ममता बॅनर्जी या तशा मूळ काँग्रेसीच आहेत. काँग्रेसमधून बाहेर पडत त्यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली होती. काँग्रेसचा हात सोडत हाती घेतलेले 'दोन पत्तीवाले फूल' आता त्यांच्या हातातून निसटू पाहते आहे. त्यामुळे त्यांची अवस्था अतिशय केविलवाणी झाली आहे.

डाव्यांच्या गुंडागर्दीच्या विरोधात सर्वसामान्य जनतेने २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला सत्तेवर आणले होते. पण, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी माकपच्या गुंडांच्या पावलावर पाऊल टाकून चालायला कधी सुरुवात केली, हे त्यांनाही समजले नाही. राज्यातील हिंदू जनतेवरील तृणमूल काँग्रेसच्या नेत्या-कार्यकर्त्यांचा अत्याचार वाढले होते. त्यांच्या पक्षाच्या आमदार आणि खासदारांनाही कुणी मोजत नव्हते. त्यांचा अपमान केला जात होता. त्याचीच परिणती म्हणजे तृणमूल काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत पराभव होऊन एक महिना व्हायच्या आतच त्यांच्या विधिमंडळ पक्षात फूट पडली.

तृणमूल काँग्रेसचा पराभव करीत राज्यातील जनतेने ममता बॅनर्जी यांच्या पक्षाला नाकारले. विधानसभा निवडणुकीत त्या लढत असलेल्या मतदारसंघातील जनतेने त्यांचा पराभव करीत ममतांचे जागा दाखवून दिली. तृणमूल काँग्रेसमध्ये ममता बॅनर्जी यांच्याबद्दल नाराजी आणि असंतोष आहेच; त्यांचे भाचे आणि पक्षातील दुसऱ्या क्रमांकाचे स्वयंघोषित नेते तसेच कोणतीही लायकी आणि कर्तृत्व नसताना स्वतःला ममता बॅनर्जी यांचे राजकीय उत्तराधिकारी समजणारे अभिषेक बॅनर्जी यांच्याबद्दल तर तीव्र असंतोष आणि नाराजी आहे. तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षात जी फूट पडली आणि संसदीय पक्षात जी फूट पडण्याच्या मार्गावर आहे, त्याचे मूळ हे अभिषेक बॅनर्जी आहेत. महाराष्ट्रात शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे पुत्रमोहामुळे जसे आंधळे झाले होते, तसेच पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी भाचामोहाने आंधळ्या झाल्या आहेत. आपल्या भाच्याचा राजकीय महत्त्वाकांक्षेपुढे त्यांना काहीही दिसत नाही. अद्यापही त्या अभिषेक बॅनर्जी यांच्या तालावर नाचत आहेत; त्यांच्या इशाऱ्यावर काम करीत आहेत.

सोनिया गांधींनी ममता बॅनर्जी यांना काँग्रेसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तर अभिषेक बॅनर्जी यांना पक्षात महासचिव करण्याचा प्रस्ताव ठेवला, असे म्हणतात. दुसरीकडे, ममता बॅनर्जी यांचा पुरता राजकीय पाडाव करण्याची शपथच अभिषेक बॅनर्जी यांनी घेतली आहे, असे दिसते. तसे नसते, तर त्यांनी स्वतःसाठी राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची मागणी केली नसती. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेच राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. आत्ता ममता बॅनर्जी यांना आपल्या पक्षात घेण्याची तशी फारशी गरज काँग्रेसला नाही. काँग्रेसमध्ये आपला पक्ष विलीन करण्याची राजकीय गरज ममता बॅनर्जी यांना आहे. त्यामुळे संपलेल्या राजकीय पक्षातील, त्याहून संपलेल्या त्या पक्षाच्या नेत्यासाठी काँग्रेस राज्यसभेतील आपले विरोधी पक्षनेतेपद सोडेल, असे वाटत नाही. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष सशक्त असलाच पाहिजे. लोकशाहीच्या अस्तित्वासाठी ते आवश्यक आहे. आज प्रमुख विरोधी पक्ष असलेला काँग्रेस पक्षाला घरघर लागलेली आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले, तरी त्यावर अंकुश ठेवायला सतर्क आणि जागरूक विरोधी पक्षाची गरज असते. काँग्रेस पक्ष जेव्हा सत्तेवर होता, तेव्हा भाजपाने प्रमुख आणि जबाबदार विरोधी पक्षाची भूमिका अतिशय परिणामकारकपणे बजावली होती. आज मात्र दुर्दैवाने देशात विरोधी पक्षच दिसत नाही. केंद्रातील मोदी सरकारसमोर विरोधी पक्षांचे कोणतेच आव्हान नाही. सरकारसाठी हे चांगले असले तरी लोकशाहीसाठी हे योग्य नाही. सरकार लोककल्याणाचे आणि विकासाचे कितीही काम करीत असले, तरीही व्यापक कल्याणकारी भूमिकांसाठी विरोधी पक्षाचे महत्त्व आणि गरज नाकारता येणार नाही. त्यामुळे विरोधी पक्ष टिकला पाहिजे आणि जगलाही पाहिजे. परंतु, विरोधी पक्ष टिकवण्याची जबाबदारी सरकारची नसते. ती विरोधी पक्षाचीच आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाची स्थिती अत्यवस्थ रुग्णासारखी झाली आहे. त्यामुळे तृणमूल काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन झाली तर दोन्ही पक्षांना पश्चिम बंगालपुरता थोडाफार फायदा होऊ शकतो. आज पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस औषधालाही उरलेली नाही आणि विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसही आचके देत आहे. त्यामुळे या चर्चित विलीनीकरणाचा फायदा पश्चिम बंगालमध्ये काही प्रमाणात या दोन्ही पक्षांना मिळू शकतो. एकदुसऱ्याच्या गुणदोषांचा विचार न करता या दोघांना एकदुसऱ्याला स्वीकारावे लागेल आणि पुढे जावे लागेल. ममता बॅनर्जींचा स्वभाव बघता खाष्ट सासूबाईसारखा आहे. त्या अशा प्रयोगात स्वतःशी कितपत तडजोडी करू शकतील, हा प्रश्नच आहे.

देशात १९७७ मध्ये जनता पक्षाचा प्रयोग झाला होता, त्यावेळी देशात काँग्रेस पक्ष सत्तेवर होता आणि मजबूत होता. याच्या उलट विरोधी पक्ष अतिशय कमजोर आणि विखुरलेला होता. बलाढ्य अशा काँग्रेसचा मुकाबला करण्यासाठी तेव्हाचे सर्व विरोधी पक्ष एकत्र आले आणि त्यांनी जनता पक्षाची मोट बांधली होती; ती फार काळ टिकू शकली नाही, हा भाग वेगळा. जनता पक्षाच्या स्थापनेला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी लावलेल्या आणिबाणीचीही पृष्ठभूमी होती. आज पुन्हा एकदा असाच प्रयोग करून पाहणे ही काँग्रेसची राजकीय गरज झाली आहे. त्यामुळे असा प्रयोग नजीकच्या भविष्यात झाला तरी नवल वाटू नये. मुळात देशातील बहुतांश प्रादेशिक पक्ष हे काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या नेत्यांनी स्थापन केले आहेत. त्यामुळे स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी अशा मूळ काँग्रेसी विचारधारेच्या सर्व नेत्यांच्या घरवापसीच्या पर्यायाचा विचार काँग्रेसला करावा लागणार आहे. तृणमूल काँग्रेसने तशी सुरुवात करून दिली आहे, असे म्हणायला हरकत नाही. मात्र, अशी हातमिळवणी पुढे नेताना काँग्रेसलाही आत्मपरीक्षण करावे लागेल. आपले काय चुकले, याचा आढावा घ्यावा लागेल आणि सुधारावे लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशातील जनतेचा विश्वास जिंकावा लागेल. देशातील जनतेचा भाजपावर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास आहे. मोदींच्या हातात देश सुरक्षित आहे आणि मोदींच्या नेतृत्वात देश विकसित भारताचे लक्ष्य गाठू शकतो, याची लोकांना खात्री आहे. जोपर्यंत देशातील जनतेला असे वाटत राहील तोपर्यंत काँग्रेसने असे कितीही वेगवेगळे प्रयोग केले तरी त्याचा फार फायदा होईल, असे वाटत नाही. पण, राजकारण हे अनिश्चिततेचे क्षेत्र आहे. त्यात विचारसरणी वगैरे आता तशी राहिलेली नाही. आता गरज महत्त्वाची असते. अस्तित्व महत्त्वाचे असते. प्रश्न असा की, ममता बॅनर्जींना आज गरज असल्याचे दिसते तशी ती अन्य प्रादेशिक पक्षांना आहे काय आणि ते सोनिया-राहुलबाबा यांच्या नेतृत्वात काम करायला तयार होतील काय? कारण गरजूंच्या आलिंगनांचे कधीच काही खरे नसते. आज गळाभेट करतील तर उद्या नागिन-सपेराचा खेळही खेळतील. इंडिया आघाडीतल्या घटक पक्षांचा कलगीतुरा हा ताजा इतिहास आहे. ■

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# गिटहब : तंत्रज्ञान विश्वाचे खुले विद्यापीठ

जगभरातील लाखो प्रोग्रामर, संशोधक, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान कंपन्या ज्या माध्यमातून एकत्र येऊन सॉफ्टवेअर तयार करतात, त्यात सुधारणा करतात आणि ज्ञानाची देवाणघेवाण करतात. त्या आधुनिक डिजिटल व्यासपीठाचे नाव गिटहब. आजच्या आयटी विद्यार्थ्यांसाठी गिटहब हे केवळ कोड साठवण्याचे साधन राहिलेले नाही, तर ते कौशल्य सिद्ध करणारे, करीअर घडवणारे आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करून देणारे डिजिटल व्यक्तिमत्त्व बनले आहे. गिटहबची सुरुवात २००८ ला झाली. लिनक्स प्रणालीचे निर्माते लिनस टॉर्वाल्ड्स यांनी विकसित केलेल्या 'गिट' या व्हर्जन कंट्रोल प्रणालीवर आधारित हे व्यासपीठ निर्माण करण्यात आले. सॉफ्टवेअर विकसित करताना अनेक विकासक एकाच वेळी काम करतात. कोणत्या व्यक्तीने कोणता बदल केला, जुन्या आवृत्तीकडे कसे परत जायचे, चूक कुठे झाली हे कसे शोधायचे अशा अनेक अडचणी सॉफ्टवेअर उद्योगासमोर होत्या. गिट या तंत्रज्ञानाने या समस्या सोडवल्या आणि गिटहबने त्याला जगभर पोहोचवले. पुढे मायक्रोसॉफ्टने गिटहबचे अधिग्रहण केल्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड आणि आधुनिक विकास साधनांच्या मदतीने त्याची प्रचंड वाढ झाली. गिटहबचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची मुक्त आणि सहकार्यपूर्ण संस्कृती. पूर्वी सॉफ्टवेअर्सचा विकास काही कंपन्या किंवा बंद प्रयोगशाळांपुरता मर्यादित होता. परंतु गिटहबमुळे ज्ञानाचे लोकशाहीकरण झाले. कारण याद्वारे भारतातील एखादा विद्यार्थी अमेरिकेतील, जपानमधील किंवा युरोपमधील विकासकांसोबत एकाच प्रकल्पावर काम करू शकतो. भाषेच्या, देशाच्या आणि अंतराच्या सीमा ओलांडून तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक सहकार्याची नवी संस्कृती गिटहबने निर्माण केली.

आज जगातील अनेक महत्त्वाचे ओपन सोर्स प्रकल्प गिटहबवर विकसित होतात. लिनक्स, पायथन, अँड्रॉईड, टेन्सरफ्लो यांसारख्या तंत्रज्ञानांनी जग बदलले आणि त्यामागे ओपन सोर्स संस्कृतीची मोठी ताकद होती. ओपन सोर्स म्हणजे सर्वांसाठी खुले असलेले तंत्रज्ञान. आता अनेक आयटी कंपन्या विद्यार्थ्यांचे गिटहब प्रोफाईल पाहतात. कारण गिटहबवर विद्यार्थ्यांने केलेले प्रत्यक्ष प्रकल्प, त्याची कोडिंग शैली, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सातत्य स्पष्ट दिसते. एखाद्या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेले संकेतस्थळ, मोबाईल ॲप, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली किंवा सायबर सुरक्षा प्रकल्प गिटहबवर उपलब्ध असल्यास मुलाखतीत त्याचा अधिक प्रभाव पडतो. कंपन्यांना अशा विद्यार्थ्यांचा अधिक विश्वास वाटतो. कारण त्यांनी प्रत्यक्ष काम केलेले असते. गिटहब विद्यार्थ्यांसाठी डिजिटल पोर्टफोलिओचे काम करते. कलाकार, लेखक जसे आपले कौशल्य प्रदर्शित करतात, तसेच प्रोग्रामर आपले कौशल्य गिटहबवर प्रदर्शित करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होते. अनेक वेळा परदेशातील कंपन्या आणि संशोधन संस्था विद्यार्थ्यांचे गिटहब प्रोफाईल पाहून इंटर्नशिप किंवा नोकरीच्या संधी देतात. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गिटहब यांचे नाते दृढ होत आहे. एआय आधारित कोडिंग सहायकांमुळे सॉफ्टवेअर विकासाची पद्धत बदलत आहे. विद्यार्थ्यांना कोड लिहिताना मार्गदर्शन मिळते, चुका कमी होतात आणि नवी भाषा शिकणे सोपे होते. गिटहब वापरताना विद्यार्थ्यांनी काही बाबींची विशेष काळजी घ्यावी. फक्त इंटरनेटवरून कोड कॉपी करून अपलोड करणे हा योग्य मार्ग नाही. स्वतः विचार करून लहान का होईना, पण स्वतंत्र प्रकल्प तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे. सातत्याने नवीन गोष्टी शिकणे, प्रकल्प अद्ययावत ठेवणे आणि तांत्रिक लेखन सुधारणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे योग्य वर्णन, त्याचा उपयोग आणि वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती स्पष्टपणे लिहिल्यास विद्यार्थ्यांची व्यावसायिकता दिसून येते. गिटहब हे विद्यार्थ्यांसाठी डिजिटल पोर्टफोलिओचे काम करते. कलाकार जसा आपली चित्रे दाखवतो, लेखक जसे आपले लेखन प्रकाशित करतो, तसेच प्रोग्रामर आपले कौशल्य गिटहबवर प्रदर्शित करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होते. गिटहब हे करीअरच्या दृष्टीने महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.




गिटहब प्रभावीपणे शिकण्यासाठी आज अनेक प्रशिक्षण पर्याय उपलब्ध आहेत. विविध अभियांत्रिकी महाविद्यालये, आयटी प्रशिक्षण संस्था आणि ऑनलाईन शिक्षण व्यासपीठांवर गिट आणि गिटहबचे विशेष अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी व्हर्जन कंट्रोल, रेपॉझिटरी तयार करणे, कमिट, ब्रँच, मर्ज आणि पुल रिक्वेस्ट यांसारख्या मूलभूत संकल्पना शिकणे आवश्यक असते. त्यानंतर ओपन सोर्स प्रकल्पांमध्ये सहभाग, टीम सहकार्य आणि क्लाऊड आधारित विकास या प्रगत गोष्टी शिकता येतात. आज अनेक जागतिक शिक्षण मंचांवर मोफत तसेच सशुल्क प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. मायक्रोसॉफ्ट, गिटहब आणि क्लाऊड तंत्रज्ञानाशी संबंधित प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांच्या करीअरला अतिरिक्त विश्वासार्हता देतात. काही कंपन्या विद्यार्थ्यांच्या गिटहब योगदानासोबत त्यांची प्रमाणपत्रेही तपासतात. त्यामुळे केवळ सैद्धांतिक शिक्षण न घेता प्रत्यक्ष प्रकल्पांसह प्रमाणित प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गिटहब यांचे नाते अधिक दृढ होत आहे. एआय आधारित कोडिंग सहायकांमुळे सॉफ्टवेअर विकासाची पद्धत बदलत आहे. विद्यार्थ्यांना कोड लिहिताना मार्गदर्शन मिळते, चुका कमी होतात आणि नवीन भाषा शिकणे सोपे होते. भविष्यात एआयच्या मदतीने अधिक वेगवान आणि बुद्धिमान सॉफ्टवेअर विकास होणार आहे.

गिटहब वापरताना विद्यार्थ्यांनी काही गोष्टींची विशेष काळजी घ्यायला हवी. फक्त इंटरनेटवरून कोड कॉपी करून अपलोड करणे हा योग्य मार्ग नाही. स्वतः विचार करून लहान का होईना, स्वतंत्र प्रकल्प तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे. सातत्याने नवीन गोष्टी शिकणे, प्रकल्प अद्ययावत ठेवणे आणि तांत्रिक लेखन सुधारणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे योग्य वर्णन, त्याचा उपयोग आणि वापरलेल्या तंत्रज्ञानाची माहिती स्पष्टपणे लिहिल्यास विद्यार्थ्यांची व्यावसायिकता दिसून येते. भविष्यात गिटहबचे महत्त्व आणखी वाढणार आहे. क्लाऊड आधारित विकास, सायबर सुरक्षा, मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि इंडस्ट्री ५.० या क्षेत्रांमध्ये जागतिक सहकार्य वाढेल. भविष्यात पदवीपेक्षा कौशल्याला अधिक महत्त्व असेल आणि त्या कौशल्याचा पुरावा म्हणजे गिटहब प्रोफाईल असेल. आजचा आयटी विद्यार्थी गिटहब प्रभावीपणे वापरत असेल तर केवळ नोकरी शोधणारा उमेदवार राहत नाही; तर जागतिक तंत्रज्ञान समुदायाचा सक्रिय निर्माता बनतो. ज्ञान, सहकार्य, नवकल्पना आणि सतत शिकण्याची वृत्ती यांचा संगम म्हणजे गिटहब. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने गिटहबकडे केवळ एक संकेतस्थळ म्हणून न पाहता स्वतःच्या डिजिटल भविष्याची प्रयोगशाळा म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# 'तो' शिरविरहित मृतदेह कोणाचा ?

बुलढाणा जिल्ह्यात जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा शिवारात मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एका शिरविरहित महिलेचा मृतदेह आढळला होता. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी एका व्यक्तीला त्याच्या मुलासह हत्येच्या प्रकरणात अटक केली होती. त्या व्यक्तीने त्याच्या मुलीच्या हत्येचा आरोप करण्यात आला होता. मात्र, ज्या मुलीच्या हत्येच्या प्रकरणात त्या बापलेकाला अटक केली होती, ती मुलगी ९-१० दिवसांपूर्वी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात हजर झाली आणि मी जिवंत असताना माझ्या वडील व भावाला माझ्या हत्येच्या आरोपात अटक का केली; त्यांना सोडा, असे पोलिसांना ठणकावून सांगितले. त्यामुळे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच तंतरली. त्यांनी त्या बापलेकाला सोडून दिले. पण, ज्या महिलेचा शिरविरहित मृतदेह आढळला तो कोणाचा? याचे उत्तर आता पोलिस शोधत आहेत. दरम्यान, या प्रकरणी ठाणेदार नितीन पाटील व एलसीबीचे पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांना निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई केवळ काही पोलिस अधिकाऱ्यांवर निलंबनाची अथवा विभागीय चौकशी करण्यापुरतेच याकडे न पाहता संपूर्ण पोलिस यंत्रणेने गंभीर प्रकरणांचा तपास गांभीर्याने व त्रुटीविरहित केला जावा, असा धडा यातून घेतला पाहिजे.

याप्रकरणी तपास यंत्रणेने आज उपलब्ध असलेल्या विविध अत्याधुनिक व वैज्ञानिक पद्धतींचा उपयोग करणे आवश्यक होते. त्या बापलेकाला ताब्यात घेतल्यावर त्या शिरविरहित महिलेचा मृतदेह व त्या बापलेकाची डीएनए चाचणी करणे आवश्यक होते. पण, वरिष्ठांकडून शाबासकी मिळविण्याच्या नादात अतिआत्मविश्वासाने त्या दोघांना अटक करून प्रकरणाची उकल केल्याचे समाधान मानण्यात आले. वैज्ञानिक तपास न केल्याने अनेकदा गुन्हेगार न्यायालयातून सबळ पुराव्याअभावी सुटण्याची शक्यता अधिक असते. तेव्हा, तपास यंत्रणांची प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि पुरावा अत्यंत महत्त्वाचा असतो. गुन्हेगारापर्यंत पोहोचण्याचा मार्ग पुराव्यांच्या साखळीतूनच जातो. गुन्हा सिद्ध होईपर्यंत ती व्यक्ती आरोपी नसते. निर्दोष असते. म्हणून दोषी व्यक्ती सुटू नये, याची संपूर्ण जबाबदारी तपास यंत्रणांची असते. तेव्हा, तपासातील निष्काळजी व हलगर्जीपणा किंवा प्रक्रियात्मक चुका केवळ एखाद्या अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये काळा ठपकाच उमटवित नाही तर संपूर्ण न्यायप्रक्रियेवर परिणामकारक ठरते. अनेकदा पुरावे योग्य प्रकारे जतन न केल्याने किंवा घटनास्थळाचा वैज्ञानिक तपास न झाल्याने गंभीर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयातून निर्दोष सुटतात. त्याचा परिणाम समाजमनावर होतो. याप्रकरणी विभागीय चौकशी केल्यावर संबंधित अधिकार्यांना निलंबित करण्यात आले. त्यावरून या प्रकरणाच्या तपासात गंभीर त्रुटी असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. अधिकाऱ्यांचे निलंबन म्हणजे काही अंतिम शिक्षा नव्हे. पण, जबाबदारी निश्चित करण्याची पहिली पायरी आहे. अधिकारी कितीही मोठा असला तरीही तपासातील चुका दुर्लक्षित केल्या जाऊ शकत नाहीत. अधिकारी जेवढा मोठा असेल तेवढी त्याची जबाबदारी मोठी असते. गुन्हे उघड करण्यासाठी विविध अत्याधुनिक व वैज्ञानिक तपास पद्धती आज उपलब्ध आहेत. यामध्ये डीएनए तपासणी, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक चाचणी आणि सायबर विश्लेषण यामुळे तपासाच्या पद्धती अधिक प्रगत झाल्या आहेत. या सर्व साधनांचा वापर करण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना सातत्याने प्रशिक्षण व अद्ययावत ज्ञानाची गरज आहे. आज ग्रामीण भागातील अनेक पोलिस ठाण्यात मनुष्यबळाची कमतरता, तांत्रिक साधनांचा अभाव आणि कामाचा प्रचंड ताण ही वस्तुस्थिती आहे. पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच समाजाचा विश्वास असतो. तेव्हा, जबाबदारीने केलेला पारदर्शक तपास ही काळाची गरज आहे. या घटनेत विभागीय चौकशीनंतर संबंधित तपास अधिकार्यांचे निलंबन करून जबाबदारी निश्चित करण्यात आली. गुन्ह्याची चौकशी निष्पक्ष व तथ्याधारित असणे महत्त्वाचे आहे. या घटनेतून पोलिस यंत्रणेने धडा घेऊन तपास प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक आहे. तिची कवटी फोरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आली असून त्यावरून तिचा चेहरा तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तेव्हा, तपास यंत्रणेने योग्य दिशेने तपास करणे आवश्यक आहे. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# साफ करा ही 'घाण...!'

ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाबाहेर नुकतीच घडलेली घटना केवळ संतापजनक नाही, तर प्रत्येक सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिकाच्या तळपायाची आग मस्तकात घालणारी आहे. वयाची ८० ओलांडलेल्या एका आजोबांना एका मुजोर कॅबचालकाने भररस्त्यात बेदम मारहाण केली. त्यांची चूक काय होती? तर फक्त 'रस्त्यावर थुंकू नकोस' एवढीच काय ती विनंती त्यांनी त्या रिक्षाचालकाला अत्यंत सामंजस्यपणे केली होती. एखादा शहाणा माणूस असता तर त्याने आपली चूक मान्य करून 'सॉरी' म्हटले असते. मात्र, या मुजोर चालकाने थेट हातात दगड घेतला आणि वृद्धावर जीवघेणा हल्ला चढवला. या अमानुष मारहाणीत त्या वयोवृद्ध आजोबांचा पाय फ्रॅक्चर झाला आणि त्यांना रुग्णालयात शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले. भररस्त्यात पत्नीसमोर तिच्या वृद्ध पतीला रक्तबंबाळ होईपर्यंत मारले जाते, हे दृश्य पाहून कोणत्याही संवेदनशील माणसाचे रक्त खवळेल!

सार्वजनिक ठिकाणे, रस्ते आणि पदपथ म्हणजे जणू आपलीच खाजगी मालमत्ता आहे आणि रस्ते म्हणजे कचराकुंडी आहे, असे समजून वावरणार्या बेशिस्त लोकांची संख्या वाढत आहे. गाडी वाटेल तिथे लावायची, स्टेअरिंगवर पाय ठेवून बसायचं, मोबाईलमध्ये खेळत बसायचं, मोकळा रस्ता दिसला की खुशाल थुंकायचं आणि कोणी जाब विचारला की थेट दादागिरी करायची; हा कसला अरेरावीपणा? जेव्हा अशा छोट्या बेशिस्त वागण्याकडे समाज आणि प्रशासन सुरुवातीलाच डोळेझाक करते, तेव्हा या प्रवृत्तीला खतपाणी मिळते आणि त्यांचे धाडस इतके वाढते की, ते एका ८० वर्षांच्या वृद्धावर दगड उगारण्याइतपत निर्ढावतात. या प्रवृत्तीला वेळीच ठेचले नाही, तर ही 'घाण' संपूर्ण समाजव्यवस्थेला विळखा घालेल.

**मुंबईचं 'स्पिरिट' काय म्हणतं?**

आपण नेहमी संकटात पुन्हा जोमाने उभे राहण्याला 'मुंबईचे स्पिरिट' म्हणतो. पण खऱ्या अर्थाने 'मुंबई स्पिरिट' म्हणजे केवळ अन्याय सहन करून गप्प बसणे नव्हे, तर आपल्या शहराची काळजी घेणे आणि स्वच्छतेसाठी पुढाकार घेणे. त्या वयोवृद्ध आजोबांनी दाखवलेले धाडस हेच खरे मुंबईचे स्पिरिट आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले. या मोहिमेचा मूळ उद्देश केवळ शौचालये बांधणे हा नसून नागरिकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडवणे हा आहे. मात्र, जेव्हा एखादा जागरूक नागरिक या अभियानात खारीचा वाटा उचलतो आणि एका बेशिस्त माणसाला रोखतो, तेव्हा त्याला दगडाचा मार खावा लागतो. जर चांगल्या हेतूने समाजहितासाठी पुढाकार घेणार्याच्या वाट्याला अशी दहशत येणार असेल, तर भविष्यात 'स्वच्छ भारत' किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही मोहिमेत सामान्य नागरिक सहभागी कसा होईल? या घटनेनंतर ते वृद्ध दाम्पत्य इतके घाबरले होते की, ते स्वतःहून पोलिसांत तक्रार देण्यासाठी पुढे येत नव्हते. अखेर तब्बल १४ तासांनंतर राजकीय कार्यकर्त्यांना स्वतः फिर्यादी बनावे लागले, तेव्हा कुठे वर्तकनगर पोलिसांत गुन्हा दाखल झाला. नागरिकांचा सहभाग वाढवायचा असेल, तर त्यांना प्रशासकीय स्तरावर भक्कम सुरक्षा मिळायलाच हवी. मात्र, यावेळी 'स्वच्छतेसाठी पुढाकार घ्या, पण स्वतःचा जीव धोक्यात घालून' असा अघोषित संदेश तर, समाजात जायचा तो गेलाच. मग अशा भयंकर घटनांमुळे चांगल्या प्रवृत्तीची आणि सुसंस्कृत माणसे कायमची गप्प बसतील आणि गुंड प्रवृत्तीचे लोक रस्त्यावर उजळमाथ्याने वावरतील.

या घटनेतील एक महत्त्वाची बाब ही सकारात्मक दिसली. या घटनेनंतर समाजातील एकजूट पाहायला मिळाली. एका मुद्यावरून सर्व राजकीय मतभेद विसरून शिवसेनेचे दोन्ही गटांचे पदाधिकारी, भाजपा-मनसेचे पदाधिकारी एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी या मुजोर चालकाला शोधून काढत चांगलाच चोप दिला आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. या सगळ्यांनी रस्त्यावर उतरून मुजोर ओला-उबर चालकांना धडा शिकवला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अमानुष घटनेची अत्यंत गंभीर दखल घेत, ठाणे पोलिस आयुक्तांना थेट भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (हत्येचा प्रयत्न-जुने कलम ३०७) आणि कलम ३५२ अंतर्गत कठोर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आवर्जून फोनवरून त्या वृद्धाची आपुलकीने विचारपूस केली व तब्येतीची चौकशी करून त्यांना मदतीचा आधार दिला. ही सगळी मंडळी एका मुद्यावर एकविचाराने पुढे गेली, हे चित्र महाराष्ट्राच्या दृष्टीने एक चांगला सकारात्मक संदेश देणारे ठरले असले, तरी सामान्य माणसाला राजकारण्यांच्या मगरीच्या अश्रूंची चांगली समज आहे. त्यामुळे आता गरज आहे ती एका सक्षम आणि सुरक्षित व्यवस्थेची; जिथे चूक दाखवून दिल्यावर मारहाण सहन करावी लागणार नाही. जोपर्यंत नेतेमंडळी या मुद्याचे केवळ राजकारण करण्याऐवजी, प्रशासकीय पातळीवर कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी पावले उचलत नाहीत, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत.

थोडक्यात सांगायचे तर, आजोबांवरील हल्ला हा केवळ एका कॅबचालकाचा माज नाही, तर तो आपल्या राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेचाही मोठा पराभव आहे. यात बदल घडले नाहीत तर, एखादा सच्चा आणि स्वच्छतेची आस असणारा सामान्य मुंबईकर असाच रस्त्यावर मार खात राहील आणि आपले नेते केवळ बघ्याची भूमिका घेत राहतील. हा विषय केवळ एका अटकेपुरता थांबता कामा नये. या मुजोर कॅबचालकावर कायद्याचा असा बडगा उगारला गेला पाहिजे की, इथून पुढे कोणीही महाराष्ट्राच्या रस्त्यावर थुंकताना आणि कोणत्याही नागरिकावर, विशेषतः ज्येष्ठांवर हात उचलताना हजार वेळा विचार करेल. 'स्वच्छ भारत' केवळ रस्त्यावरचा कचरा उचलून होणार नाही, तर समाजातील या अशा 'घाणेरड्या आणि मुजोर' प्रवृत्तींना कायद्याचा धाक दाखवून कायमचे साफ केल्यावरच आपले शहर, राज्य आणि देश खर्या अर्थाने स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित राहील. ■

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### 'राजकारणातील विक्रमादित्य' सर्वंकष आढावा

तरुण भारतचा गुरुवार, ११ जूनमधील 'राजकारणातील विक्रमादित्य' हा श्यामकांत जहागीरदार यांचा 'दिल्ली वार्तापत्र'मधील लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपःपूर्तीच्या विक्रमाची यथायोग्य शब्दांत तपशीलवार दखल घेणारा आहे. मोदी सरकारचे वेगळेपण आहे ते, हमें देखना है, हमें करना है यापेक्षा आधी केले मग सांगितले यात. त्यामुळेच जम्मू-काश्मीरचे ३७० कलम हद्दपार करून तेथे खात्रीशीर रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी भारतीय व विदेशी उद्योगांना कवाडे उघडी करून देणे, लेह-लडाखलाही रस्ते दळणवळणाने देशांतर्गत जोडणी देऊन समृद्धीचा मार्ग खुला करणे, कोरोनासारख्या आपत्तीकाळातही योग्य ती खबरदारी घेऊन अर्थव्यवस्थेचे संतुलन जास्त गळणार नाही हे पाहणे, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी डिजिटल क्रांतीच्या मार्गावर सर्वसामान्य नागरिकांना घेऊन पुढे जाणे, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन रस्ते, लोहमार्ग, हवाई मार्ग सुकर करणे, इत्यादी बाबतीत खूपच जलद प्रगती करून जागतिक पातळीवर देशाला मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. अर्थातच संरक्षण, शिक्षण, भ्रष्टाचार निर्मूलन, प्रदूषणमुक्त शहरे, महिला व बालकल्याण, आरोग्य सुविधा या आघाड्यांवर अधिक जोमाने अजूनही काम करावे लागणार आहे याची जाणीव ठेवून मोदी सरकार अधिक प्रयत्नांचा जोर लावेल अशी आशा या निमित्ताने करायला हरकत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन.

**श्रीपाद कुलकर्णी**/९४२२५१५६४०

* * *

### नियत वाईट असलेल्यांना तुमच्या सावलीतही उभे करू नका

समाज हा सामाजिक संबंध व सामाजिक नात्यांचा समुदाय आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती एक दुसर्याचे सहकार्य, मदत, सामाजिक संबंध व सद्भाव यावर जगत असते. या समाजात विभिन्न मते व विचारांच्या व्यक्ती असतात. काही नकारात्मक तर काही सकारात्मक विचार उराशी बाळगून समाजात वास्तव्य करीत असतात. समाजात जगत असताना बर्याच व्यक्तींवर वाईट प्रसंग व घटना येत असतात, अशा वेळी समाजातील प्रत्येकाने वाईट प्रसंग आलेल्या व्यक्तीला सहकार्य करणे, त्याच्या मदतीला धावून जाणे, त्याचे सुख-दुःख वाटून घेणे, हा सामाजिक धर्म आहे. समाज धर्म प्रत्येकाने पाळायला हवा. समाज धर्म पाळणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य असायला हवे. पण नकारात्मक विचारांच्या किंवा अहित उराशी बाळगून जगणार्या व्यक्ती या नेहमी समाज प्रवाहाच्या विरुद्ध वागत असतात. त्या सदैव अहिताच्या बाजूनेच असतात. समाजाशी किंवा समाजातील लोकांशी त्यांना काही घेणे-देणे नसते. समाजातील ज्या व्यक्ती किंवा कुटुंबावर वाईट प्रसंग किंवा वाईट वेळ आलेली आहे अशा वेळी समाजातील सर्वांनी त्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे, हा समाज धर्म आहे. परंतु समाजातील ज्यांची नियत वाईट असते, ज्याची सदैव नकारात्मक भूमिका असते, अशांना तुमच्या सावलीत सुद्धा उभे करू नका.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

* * *

### तात्यांची डील आणि युद्धाचा फील

'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशी आपल्या मराठीत एक म्हण आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सध्याची परिस्थिती बघून ही म्हण आवर्जून आठवते. इराणवर हल्ला करणे त्यांना चांगलेच अडचणीत आणत आहे. युद्धबंदी जाहीर करून पाकिस्तानमार्फत डील करण्याचे असफल प्रयत्न झालेत. युद्धातून माघार घेतली तर वैयक्तिक आणि देशाची नाचक्की होते. युद्ध सुरू ठेवले तर देशांतर्गत विरोधाला सामोरे जावे लागते. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे जगाचे राजकारण आणि अर्थव्यवस्था संभ्रमावस्थेत आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे अमेरिकेत महागाई वाढली असून ट्रम्प यांनी 'आय लव्ह इन्फ्लेशन' (मला महागाई आवडते) असे वादग्रस्त विधान केले आहे. ट्रम्प यांचे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी इराण युद्धावरून संबंध चांगलेच ताणले गेलेले आहेत. ट्रम्प नेतान्याहू यांना लेबनान आणि इराणवरील हल्ले थांबवायला सांगतात आणि स्वतः अपाचे हेलिकॉप्टर इराणने पाडले असे समजून इराणवर हल्ला करतात. अमेरिका-इराण डील अगदी नजीकच्या टप्प्यात आहे असे सांगायलाही ते विसरत नाहीत. वादग्रस्त विधाने करण्याची आणि अंगावर येताच यू टर्न घेऊन सारवासारव करायची हे नित्याचेच झालेले आहे. त्यांना हवी तशी डील काही होणार नाही आणि जगावरील युद्धाचा फील जाणार नाही. चर्चेच्या माध्यमातून अमेरिका-इराण-इस्त्रायल यांच्यात डील व्हावी आणि जगावरील महायुद्धाचे सावट लवकरात लवकर दूर व्हावे असे सर्वांनाच वाटत आहे. ■

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

* * *

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### महिला उद्योजकता कौशल्य विकास मंडळ कार्यशाळा उत्साहात

**सोलापूर, दि. १२ जून-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे एमएसएसआयडीसीच्या रॅम्प उपक्रमांतर्गत स्किलमॅन इन्फोकॉर्पने येथील एमएसएमईसाठी डिजिटल कर्जावर क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्किलमॅन इन्फोकॉर्प प्रायव्हेट लिमिटेडने राज्य प्रतिनिधी राजश्री ताला यांच्यामार्फत, विद्या सिंगम, समाज सेविका टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या सहकार्याने, शुक्रवारी जिल्ह्यातील ५० एमएसएमईसाठी डिजिटल कर्जावर एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले. यावेळी सिद्धेश्वर गड्डम, अध्यक्ष जयंत आकेन, उपाध्यक्ष टेक्स्टाईल डेव्हलपमेंट फाउंडेशन यांची उपस्थित होती.एमएसएमई उद्योजकांमध्ये डिजिटल कर्जपुरवठा प्रणालींबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्याचा अवलंब करणे या उद्देशाने, हा कार्यक्रम महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या एमएसएमई कामगिरी वाढवणे आणि गती देणे रॅम्प उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. हे प्रशिक्षण शांताराम के. सामल, एक पात्र आणि अनुभवी वित्त व्यावसायिक यांच्याद्वारे देण्यात आले. या सत्रात डिजिटल कर्जपुरवठ्याच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करण्यात आले, ज्यामध्ये कर्ज अर्ज प्रक्रिया, डिजिटल वित्तीय प्लॅटफफॉर्म, पत मूल्यांकन, कागदपत्रांची आवश्यकता, जबाबदार कर्ज घेण्याच्या पद्धती आणि डिजिटल माध्यमांद्वारे औपचारिक पतपुरवठा मिळवणे यांचा समावेश होता. यावेळी सहभागींना डिजिटल कर्ज उत्पादनांचे फायदे, पतपुरवठ्यासाठीची सज्जता सुधारणे, आर्थिक समावेशनासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आणि व्यवसायाच्या वाढीसाठी व विस्तारासाठी सरकारी-समर्थित वित्तपुरवठ्याच्या संधी मिळवणे यांबद्दल जागरूक करण्यात आले.

### कन्यादान योजनेतंर्गत वाढीव अनुदानासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

**सोलापूर दि. १२ जून-**

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत सामुदायिक विवाह सोहळयामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील नव विवाहित दांपत्यासाठी वित्तीय सहाय्य अंतर्गत सोलापूर जिल्हयातील सामुहीक विवाह सोहळयामध्ये विवाह केलेल्या दांपत्याना तसेच विवाह संपन्न केलेल्या संस्थेस कन्यादान योजनेतंर्गत शासन निर्णयामधील वाढीव अनुदान रक्कम रुपये २५ हजार रुपये डिबीटी पध्दतीने लाभार्थ्यांच्या खात्यावर अदा करण्यात येते. तसेच सामुदायिक विवाह सोहळा संपन्न करण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थेस प्रोत्साहनात्मक अनुदान म्हणून प्रति दांपत्य रक्कम रुपये ४ हजार इतके अदा करण्यात येते. सदर योजनेबद्दलचे निकष हे २ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ, ब, क, ड नुसार असतील प्रस्तावाचा नमुना हमीपत्र व प्रतिज्ञापत्र इत्यादी बाबीकरीता सहायक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय चौथा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सात रस्ता सोलापूर) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, अशी माहिती सहायक संचालक गणेश सोनटक्के यांनी दिली आहे.



### बालहक्क जनजागृतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. १२ जून-**

जागतिक बालहक्क कामगार विरोधी दिनानिमित्त कामगार विभागाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते या स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात कामगार विभागाच्या वतीने लावण्यात आलेल्या बालहक्क कामगार विरोधी दिनाच्या फलकाचे फीत कापून उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. सहाय्यक कामगार आयुक्त मंगेश झोले, सरकारी कामगार आधीकारी एस. बी. डोबरीयल, जिल्हा माहिला बाल विकास अधिकारी अविनाश मगर, धनाजी शिगाडे, लि. ट. प्रदीप पखमोडे, बाळासाहेब ठाकूर, राजेश्वर जाधव, गजानन मुंढे आदी उपस्थित होते. यावेळी कामगार विभागाच्या वतीने या मोहिमेद्वारे नागरिकांना बालमजुरी निर्मूलनासाठी बांधिलकी दर्शविण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी पोस्टरवर स्वाक्षरी करून बालमजुरी विरोधी लढ्यात सहभाग नोंदवला. बालमजुरी ही सामाजिक समस्या असून तिचे निर्मूलन करण्यासाठी प्रशासनाबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी व्यक्त केले. शिक्षण हीच खरी ताकद असून प्रत्येक बालकाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रामपंचायतीसाठी १६ वा वित्त आयोग, स्वच्छतेसाठी ५० टक्के निधी राखीव

## नवरत्न थीमची प्रभावी अंमलबजावणी करा : 'यशदा'चे उपमहासंचालक डॉ. कलशेट्टी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जून-**



शाश्वत विकास ध्येय साध्य करणे साठी नवरत्न थीमची प्रभावी अंमलबजावणी केल्यास गाव स्वच्छ व समृध्द होईल. असे प्रतिपादन यशदा चे उप महासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत जिल्हा स्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करणेत आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे हस्ते करणेत आले.

या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, यशदा चे प्रशिक्षक शांतकुमार स्वामी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी , कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रमुख उपस्थित होते. १६ वा वित्त आयोग मधून ८० टक्के बेसिक ग्रॅन्ट मध्ये ५० टक्के स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन व पाण्याचे व्यवस्थापन बंधित निधी साठी खर्च करावा लागणार आहे. अबंधित निधीतून ५० टक्के खर्च करताना पंचायत विकास निर्देशांक नुसार १ किंवा २ थीम संकल्प म्हणून केलेले थीम वर २५ टक्के निधी किमान खर्च केला पाहिजे. रस्ते कामांना २५ टक्के पेक्षा जास्त निधी खर्च करता येणार नाही असेही डॉ. कलशेट्टी यांनी सांगितले. घनकचरा व्यवस्थापन ला लक्ष द्या. सॅनिटरी नॅपकिन व डायपर यांची योग्य विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. प्रत्येक घरात चार डस्टबीन मध्ये कचरा चे विलगीकरण करणे होणे अपेक्षित आहे. हे काम ग्रामपंचायतीने देखील करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाचे योजना ग्रामपंचायतीचे स्वतः चे उत्पन्न व वित्त आयोग असे अभिसरनाद्वारे कामे हाती घेता येईल असे उपसंचालक कलशेट्टी यांनी सांगितले. ग्रामपंचायत विकास आराखडा बनवताना गुणवत्तेस महत्वाचे स्थान दिले आहे. ग्रामसभेत सर्व घटकांची उपस्थिती अत्यावश्यक आहे.

या कार्यशाळेस यशदाचे प्रविण प्रशिक्षक शांतकुमार स्वामी , राजेंद्र वारगड, हनुमंत कांदे, भिमराव तुळजापूरे यांनी मार्गदर्शन केले.

### गावपातळीवर कचरा वर्गीकरण आवश्यक : सीईओ जैन

सीईओ कुशल जैन यांनी जिल्हा व तालुका व गाव स्तरावर आराखडे तयार करून भरताना काळजी घ्या. जेणेकरून पुन्हा बदलाची वेळ येणार नाही याची दक्षता घ्या. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले सुचने नुसार ओला कचरा व सुका कचरा व घातक कचरा साठी डस्टबीन व कचरा चे विलगीकरण करणे आवश्यक असल्याचे सिईओ कुशल जैन यांनी सांगितले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सर्व तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील आराखडे भरणे साठी नियोजन करावे असे आवाहन केले.

## दुचाकी वाहनांसाठी एमएच १३-एफई नवीन मालिका सुरु होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जून-**

दुचाकी वाहनांसाठी एमएच १३-एफई नवीन मालिका सुरु होणार आहे. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी १५ जून २०२६ रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा डीडी, पत्त्याचा पुरावा साक्षांकित प्रत, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा. सदर डीडी फक्त "Dy R.T.O. Solapur" यांच्या नावे असावा. एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी १५ जून २०२६ रोजी दुपारी ५ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी १६ जून रोजी दुपारी २ वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सादर केलेला डीडी रुपये ३००/- पेक्षा कमी रकमेचा नसावा. डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. १६ जून रोजी दुपारी ०४ वाजता प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल.

## ज्येष्ठ साहित्यिका सुरेखा शहा यांना 'स्व. प्रा. बी. ए. चौगुले स्मृती पुरस्कार' जाहीर

### उद्या महावीर सांस्कृतिक भवनात वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जून-**



साहित्य, समाज व संस्कृतीच्या सेवाकार्यास समर्पित व्यक्तिमत्त्व स्व. प्रा. बी. ए. चौगुले यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या श्री श्रमण संस्कृती प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्यातर्फे दिला जाणारा 'स्व. प्रा. बी. ए. चौगुले स्मृती पुरस्कार - २०२६' यंदा ज्येष्ठ साहित्यिका सुरेखा चंद्रगुप्त शहा यांना जाहीर करण्यात आला आहे. साहित्य आणि पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अरुणा बा. चौगुले यांनी केली.

सौ. शहा या मराठी साहित्यविश्वातील बहुआयामी, संवेदनशील आणि अभ्यासू लेखिका म्हणून परिचित आहेत. कथा, कादंबरी, कविता, एकांकिका, नाटक, ललित लेख, बालसाहित्य, प्रवासवर्णन, धार्मिक लेखन अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी विपुल लेखन केले आहे. ११ नोव्हेंबर १९४० रोजी जन्मलेल्या सुरेखाताईंनी अनेक दशकांपासून अखंड साहित्यसेवा केली असून सामाजिक वास्तव, स्त्रीजीवन, संस्कार, अध्यात्म, जलसंवर्धन आणि मानवी मूल्यांचा प्रभावी वेध आपल्या लेखनातून घेतला आहे. त्यांच्या 'जोहड', 'जनमेजय', 'पाणपाखरं', 'यती', 'वळवाच्या धारा', 'मुगलमठी जीवन अबघे', 'वेधस्व पाणी, अनंत आकाश', 'जय यमुने जय जय मां' आणि 'राणी अब्बक्कादेवी' या कादंबऱ्या विशेष गाजल्या आहेत. राजस्थानातील जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांच्या जीवनकार्यावर आधारित 'जोहड' ही त्यांची चरित्रात्मक कादंबरी विशेष लोकप्रिय ठरली असून तिच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, १४ जून रोजी दुपारी ३.३० वाजता, महावीर सांस्कृतिक भवन, शुक्रवार पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे.

## विजापूर रोड गणेशोत्सव मंडळाचा समाजासमोर आदर्श : प्राचार्य कलशेट्टी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ जून-**



विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट व गणेशोत्सव मंडळाने विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वांचा गौरव करुन त्यांचा आदर्श समाजासमोर आणला आहे, असे प्रतिपादन व्ही जी. शिवदारे फार्मसी कॉलेज चे प्राचार्य मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट व उत्सव मंडळ च्या वतीने सोलापुरात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्काराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी, एस.व्ही.सी.एस.चे सचिव शांतय्या स्वामी, पोलीस निरीक्षक संगीता हत्ती, नगरसेवक राजशेखर पाटील, ट्रस्ट अध्यक्ष सुभाष चव्हाण, माजी उत्सव अध्यक्ष अण्णाप्पा सतुबार, संस्थापक सदस्य विजय शाबादी, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, लक्ष्मीकांत पुजारी प्रांजली मोहिकर, प्रीती उडानशिव, डॉ.शृंगारपुरे, अलका गाडेकर, सुरेखा गोब्बुर, माजी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, जॉगर्स क्लबचे संतोष कदम, महेश देवकर, सिदराय्या होर्तीकर, राष्ट्रीय टेनिस खेळाडू संध्याराणी बंडगर आदी उपस्थित होते. ट्रस्ट सचिव विश्वनाथ आमणे यांनी प्रास्ताविक केले. उमेश यळसंगी यांनी सूत्रसंचलन केले.सागर पुकाळे यांनी आभार मानले.

### यांचा झाला सन्मान

आदर्श मुख्याध्यापक विरभद्र यादवाड, कल्लाप्पा आजावडरे, सिद्धाराम गुरव, भीमसिंग राठोड, अमोगसिद्ध म्हेत्रे, परमेश्वर कलशेट्टी तसेच कराटे चॅम्पियनशिप भिमराव बाळगे, शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त हाजी मलंग नदाफ व वृत्तपत्र विक्रेते भीमाशंकर डमामी, संतोष अतनुरे शिवानंद शिवणगी, अरुण सलगर.


### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उपसंचालक, नगर रचना व बांधकाम परवानगी कार्यालय
'इंद्रभुवन', रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
ई-मेल :- adtpsolapurl@gmail.com दुरध्वनी : ०२१७-२७३५२७३

जा.क्र./उसंनर/नर/बा.प.-४२१ दि. १२/०६/२०२५

**जाहीर नोटीस**

मौजे सलगरवाडी सोलापूर येथील सर्व्हे नं १०/१०/१ मधील १२.०० मी व २४.०० मी रुंद डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र २७६१.९५ चौ.मी क्षेत्रापोटी टी.डी.आर. म.न.पा.चे ताब्यात घेऊन त्यापोटी विकास हस्तांतरण हक्क (टी.डी.आर.) मिळणेबाबत सदर जागेचे मालक श्री. अमिरोद्दिन हुसेन साब शेख, सोलापूर यांचे दि. ०५/०२/२०२६ ने प्रस्ताव सादर केलेले आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे सर्व नागरीकांना असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीचे मालकी हक्क अथवा हितसंबंध असल्याचे त्यांनी त्याबाबत तक्रार / हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत खाली नमूद केलेल्या अधिका-यांच्या पत्त्यावर पाठवाव्यात. असे न केल्यास सोलापूर महानगरपालिका रितसर टी.डी.आर. (हस्तांतरणीय विकास हक्क) देणेबाबत पुढील कार्यवाही करील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस दिली

दि. १२/०६/२०२६

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.

**हरकत दाखल करणेचा पत्ता-**
द्वारा मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका करिता.
सहाय्यक संचालक, नगर रचना, सो.म.पा
इंद्रभूवन, आप्पासाहेब वारद पथ. रेल्वे लाईन सोलापूर.



### जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि.।। व सब डि.।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ भद्रावती पेठ येथील कुंचीकोरवी झोपडपट्टी, सोलापूर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या, झोपडपट्टी मधील झोपडी घर नं.७२ क्षेत्र २७० चौ.फुट अशी मिळकत असून यांची म.न.पा. मिळकत क्र.३४३९०८ असा आहे. सदरची मिळकत आमचे अशील श्री. गोविंद शामराव गुंडला यांचे वडिल कै. शामराव किष्टय्या गुंडला यांचे नावावर असून ते दि. १५/११/२०२३ रोजी सोलापूर येथे मयत झालेले आहेत.

सदर ठिकाणी, आमचे अशिलाचे वडिल कै. शामराव किष्टय्या गुंडला यांचे नांवे घर नं. ७२ सोलापूर येथे एकूण दोन खोल्या असून एकूण क्षेत्र २७० स्के. फुट पैकी, दोन खोली व संडास बाथरुम आहेत. सदरच्या खोल्या वीट बांधकाम केलेले आहेत सदरहू घरजागेत आमचे अशील श्री. गोविंद शामराव गुंडला हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरूपी त्यांचे वडिलांचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं. ७२ कुंचीकोरवी झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे वडील कै. शामराव किष्टय्या गुंडला यांचे नांव कमी करून आमचे अशील श्री. गोविंद शामराव गुंडला यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन, त्यांचे नांवे यापुढील कर पावती निरंतर मिळावी, याकरिता आमचे अशील म.न.पा. कडे अर्ज दाखल करणार आहेत. यास आमचे अशिलांचे, सख्खे भाऊ, वारस श्री किष्टया शामराव गुंडला, यांनी आमचे अशील गोविंद शामराव गुंडला यांचे एकट्याचेच नांवे वारस नोंद होण्याकरिता संमती दिलेती आहे.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिता व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाहि कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेत अथवा इतर कोणाचाहि कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध. गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती. बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असत्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर तेखी हरकत नोंदवावी मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशीत त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग. ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसत्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख १३/०६/२०२६

सही/-
ॲड. रमाकांत नागनाथ पिसे
बी.कॉम., एल.एल.बी.,
२७८७, जे. ग्रुप जुना विडी घरकुल,
हैदराबाद रोड, सोलापूर - ४१३००६
मो.नं.८०८०९०३६९४



### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ९१/२०२५
पुढील ने. ता. २३/०७/२०२६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

१) श्रीमती मंदाकिनी चंद्रकांत मोरे, वय-५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आगळगांव रोड, वाणी प्लॉट बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) श्री. सुदर्शन चंद्रकांत मोरे, वय-३१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर
३) सौ. ज्ञानेश्वरी रोहन दाभाडे, वय-३३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. विमल बंगला, आगरकर मळा, रेल्वे स्टेशन जवळ, अहमदनगर. -- अर्जदार
४) श्रीमती भामाबाई वसंत उर्फ वसंतराव मोरे, वय-८२ वर्षे, धंदा-काहीनाही, रा. खंडोबा वेस, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

वि.

कोणीही नाही -- सा.वाला

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ४ यांचा मुलगा चंद्रकांत वसंतराव मोरे हे वाणी प्लॉट, आगळगांव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे राहत्या घरी आजारपणामुळे दि. ०२/०४/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे यातील अर्जदार नं १ ते ४ हेच मयत चंद्रकांत वसंतराव मोरे यांचे कायदेशीर एकमेव व जवळचे वारस आहेत. म्हणून अर्जदार यांना वारस (हेअरशीप) प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. २३/०७/२०२६ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विध्दीज्ञांमार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले असे ता. १२/०६/२०२६

सही/-
कनिष्ठ लिपीक

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मे. सि. ज. ज्यु. डि. सो, बार्शी



### IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तांचे प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सहकर्जदार यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले होते. खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या कर्जाची सुरक्षा म्हणून त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण (मॉर्टगेज) ठेवण्यात आल्या आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून त्यांची कर्ज खाती एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांच्याकडून आयडीएफसी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक** लिमिटेड म्हणून ओळखली जाते) ला येणे असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये दिलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसीनुसार नमूद करण्यात आली आहे आणि या रकमेवर पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते संबंधित तारखेपासून करारातील दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिसी नुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 145807917 | मालमत्तेवर कर्ज | १. प्रविण हरिदास खंडागळे<br>२. भारत हरीदास खंडागळे | 06 May 2026 | INR 7,19,623.05/- |

**मालमत्तेचा पत्ता** : दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि तुकडा, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = १०८९.०० चौ.फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ: १०८९ चौ.फूट. सदर मालमत्ता मौजे सरकोली, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे असून मिळकत क्रमांक ६९४ अन्वये नोंदणीकृत आहे, जी ग्रामपंचायत हद्द सरकोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४ येथे स्थित आहे. आणि सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत:
पूर्व : रस्ता, पश्चिम : दिलीप खंडागळे, उत्तर : तायप्पा वाघमारे, दक्षिण: पिंटू माळी

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येत आहे की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसारची रक्कम, त्यावर लागणारे संबंधित तारखेपासूनचे करारातील व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे जमा करावी, असे करण्यात कसूर केल्यास, बँकेला येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी खालील स्वाक्षरीकार वरील नमूद गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अन्वये कायदेशीर कारवाई सुरू करण्यास बांधील राहतील. याव्यतिरिक्त, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला गहाण ठेवलेली सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास सक्त मनाई आहे.

दिनांक : 13/06/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)



### मध्य रेल्वे

सोलापूर विभाग
**नवीन गॅंग हटची तरतूद**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामासाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करत आहेत: ई-निविदा सूचना क्रमांक: 04-2026-DEN-Tr. कामाचे नाव: लातूर-मिरज (LUR-MRJ) सेक्शनमध्ये नवीन गॅंग हटची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 3,38,41,953.83/-. बयाणा रक्कम (अर्नेस्ट मनी): 6,76,800.00/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 (बारा) महिने. देखभाल कालावधी (मेंटेनन्स पिरियड): 12 (बारा) महिने. निविदा फॉर्मची किंमत: काहीही नाही (शून्य). www.ireps.gov.in या वेबसाईटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 02/07/2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 02/07/2026 रोजी दुपारी 15.30 नंतर. वेबसाईट तपशील: www.ireps.gov.in टीप: संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक (कॉरिजेन्डम) पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाईटला वारंवार भेट द्यावी. वेबसाईट: www.ireps.gov.in

EXP-27 वि.रे.व्य. (कार्य), सोलापूर

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा



### Classifieds

**विकणे आहे**

विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.
--- संपर्क ---
7498948451
9579030937

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



## महत्त्वाचे

### जपानचा कर्णधार वातारू एंडो विश्वचषकातून बाहेर

**टोकियो :** कर्णधार वातारू एंडो पायाच्या दुखापतीमुळे देशाच्या विश्वचषक संघातून बाहेर पडला आहे. त्यानंतर, लिव्हरपूलच्या या मिडफिल्डरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून अनपेक्षितपणे निवृत्ती घोषणा केली, असे जपान फुटबॉल संघटनेने जाहीर केले.



नेदरलँड्सविरुद्ध होणार्या गट एफ मधील पहिल्या सामन्याच्या तीन दिवस आधी, ३३ वर्षीय एंडोने आपल्या एक्स खात्यावर जपानी भाषेत हा निर्णय जाहीर केला. जपानचा संघ सध्या टेनेसीमधील नॅशव्हिल येथे सराव करत आहे. दुखापत झाल्यापासून ते आतापर्यंत मी शक्य ते सर्व प्रयत्न केले आहेत.

# मेक्सिकोची दमदार विजयी सुरुवात

## दक्षिण आफ्रिकेवर २-० ने मात

**मेक्सिको, १२ जून**

इतिहासातील सर्वात मोठ्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत मेक्सिकोने सुरुवातीलाच आपली छाप पाडली. चार वर्षांपूर्वीच्या मोठ्या निराशाजनक कामगिरीनंतर, प्रतिष्ठित 'अझ्टेका स्टेडियम'वर उपस्थित असलेल्या उत्साही प्रेक्षकांना त्यांनी आनंदाचा मोठा डोस दिला.

४८ संघांचा समावेश असलेल्या या पहिल्या विश्वचषक स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात आपल्यावर असलेला प्रचंड दबाव आणि लोकांच्या मोठ्या अपेक्षा याची मेक्सिकोच्या खेळाडूंना जाणीव होती. तरीही, त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली आणि दक्षिण आफ्रिकेचा २-० असा पराभव करत विजयाची नोंद केली; या सामन्यात तीन 'रेड कार्ड्स'चाही समावेश होता.

विश्वचषक आणि मायदेशात होणारा सलामीचा सामना याचे महत्त्व काय असते, हे त्यांना समजावून सांगण्याचा मी प्रयत्न केला; पण ते तरुण आहेत आणि त्यांना तो अनुभव स्वतःच घ्यायचा होता, असे मेक्सिकोचे प्रशिक्षक जेवियर अॅग्युइरे म्हणाले.

१९८६ मध्ये जेव्हा मेक्सिकोने या स्पर्धेचे यजमानपद भूषविले होते, तेव्हा अॅग्युइरे स्वतः संघाचे खेळाडू होते. आता मी मायदेशात विश्वचषक खेळलो आहे याबद्दल बोलू



शकत नाही, कारण तो अनुभव कसा असतो हे त्यांना आता समजले आहे, असे त्यांनी सांगितले.

जुलियन क्विनोनेस आणि राऊल जिमेनेझने मेक्सिकोसाठी गोल केले. मेक्सिको हा देश कॅनडा आणि अमेरिकेसोबत फिफा २०२६ च्या स्पर्धेचे सह-यजमानपद भूषवित आहे.

चार वर्षांपूर्वी कतारमध्ये झालेल्या स्पर्धेत गट-फेरीतूनच बाहेर पडल्यामुळे मेक्सिकोला मोठी निराशा सहन करावी लागली होती; त्यातून त्यांनी आता सावरले आहे. त्याआधी सलग सात वेळा ते अंतिम १६ संघांच्या फेरीपर्यंत पोहोचले होते, पण उपांत्यपूर्व फेरीत न पोहोचल्यामुळे ही कामगिरी त्यांच्यासाठी एका शापासारखी ठरली होती.

पण यावर्षी आशादायक चित्र आहे. मेक्सिको आपल्या इतिहासात दोनदा उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचला आहे आणि दोन्ही वेळा ते यजमान देश होते . १९७० आणि १९८६ मध्ये. १९८६ च्या त्या संघात अॅग्युइरे यांचा समावेश होता.

८०,८२४ प्रेक्षकांच्या उपस्थितीत मेक्सिकोने आक्रमक सुरुवात केली आणि नवव्या मिनिटाला क्विनोनेसने गोल करत आघाडी घेतली. ६६ व्या मिनिटाला जिमेनेझने 'हेडर'द्वारे दुसरा गोल केला; मेक्सिकोसाठीचा हा त्याचा ४६ वा गोल होता, पण तीन विश्वचषक स्पर्धांमधील त्याचा हा पहिलाच गोल ठरला.

आम्ही पूवार्धात फारसा चांगला खेळ केला नाही, पण तरीही आम्ही ३-० अशी विजयीआघाडी घेऊ शकलो असतो, कारण आम्ही प्रतिस्पर्ध्यांपेक्षा खूपच सरस खेळत होतो, असे अॅग्युइरे म्हणाले.

(वृत्तसंस्था)

## फिफा फुटबॉल आजचे सामने

**शनिवार, १३ जून २०२आजचे सामने**

**कतार विरुद्ध स्विझर्लंड**
**वेळ :** शनिवार, मध्य रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** लेव्हीज स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को बे एरिया

**ब्राझील विरुद्ध मोरोक्को**
**वेळ :** शनिवारी पहाटे ३:३०वाजतापासून
**स्थळ :** मेटलाइफ स्टेडियम, न्यू जर्सी

**हैती विरुद्ध स्कॉटलंड**
**वेळ :** रविवार, सकाळी ६:३० वाजतापासून
**स्थळ :** जिलेट स्टेडियम, बॉस्टन

**ऑस्ट्रेलिया विरुद्ध तुर्की**
**वेळ :** रविवारी, सकाळी ९:३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी प्लेस, व्हँकुव्हर

# ऑस्ट्रेलिया-दक्षिण आफ्रिका लढत चुरशीची होणार

**मँचेस्टर, १२ जून**

आयसीसी महिलांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत शनिवारी येथे ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यानचा साखळी सामना रंगणार आहे. विजेतेपदाचा प्रबळ दावेदार असलेला ऑस्ट्रेलिया संघ सलामीच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर वर्चस्व गाजविण्यास उत्सुक आहे.

स्नायूंच्या दुखापतीमुळे कार्डिफमधील दोन सराव सामन्यांना मुकावे लागलेली लिचफील्ड दुखापतीतून सावरली, तर ऑस्ट्रेलियाचा



सोफी मोलिनक्स व लॉरा वॉल्वर्ट्ड

फलंदाजीचा वरचा क्रम निश्चित मानला जात आहे. अॅनाबेल सदरलँडचे अंतिम अकरामध्ये स्थान पक्के आहे, ती कदाचित तळाच्या क्रमांकावर फलंदाजीला येईल व तिच्यासोबत कर्णधार सोफी मोलिनक्सही असेल. सोफीने पाठीच्या दुखापतीतून परतल्यानंतर प्रभावी कामगिरी केली आहे. जर किम गार्थ आणि मेगन शूट वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळणार असतील, तर उर्वरित दोन जागांसाठी ग्रेस हॅरिस, जॉर्जिया वेअरहॅम आणि अलाना किंग यांच्यात चुरस पाहायला मिळू शकते.

दक्षिण आफ्रिकेलाही संघनिवडीबाबत काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील, कारण मारिझान कॅप, शबनिम इस्माईल आणि डॅन व्हॅन निकर्क हे सर्वजण संघात परतले आहेत. वाईट फॉर्ममुळे वरच्या फळीतील फलंदाज टॅझमिन ब्रिट्सवर कदाचित दडपण असू शकते, तर व्हॅन निकर्क तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर खेळू शकते. न्यूझीलंडविरुद्धच्या सराव सामन्यात क्लो ट्रायनने २६ चेंडूत ६१ धावांची धडाकेबाज खेळी केली होती; तसेच अरुंडेल येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध जलद ४५ धावा केल्यामुळे युवा खेळाडू कायला रेनेके देखील मधल्या किंवा खालच्या फळीतील स्थानासाठी दावेदारी सांगत आहे. इस्माईलचे वेगवान गोलंदाजीच्या फळीत थेट पुनरागमन होण्याची शक्यता आहे.

(वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**आयर्लण्ड वि. स्कॉटलंड**
**स्थळ :** मँचेस्टर
**वेळ :** दुपारी ३.०० वाजतापासून

**ऑस्ट्रेलिया वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ :** मँचेस्टर
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**न्यूझीलंड वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ :** साऊदम्पटन
**वेळ :** रात्री ११.०० वाजतापासून
**थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्सवर

# बुरलेवाडी येथील मजुराच्या मुलाची जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्ण झेप

## संतोष मल्हारी ठोंबरे ६५ किलो वजनी गटात प्रथम

**सांगोला, दि. १२ जून-**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, मेहनत आणि संघर्षाच्या जोरावर बुरलेवाडी, मेडशिंगी (ता. सांगोला) येथील युवा कुस्तीपटू संतोष ठोंबरे याने नेपाळ येथे झालेल्या जागतिक कुस्ती स्पर्धेत ६५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल फॅबटेक उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. त्याला रुपनर यांनी आतापर्यंत ५0 हजार रुपयांची आर्थिक मदत केली आहे. यावेळी इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, वडील मल्हारी ठोंबरे उपस्थित होते.

संतोष याचे आई-वडील हे



शेतमजूरी करून उदरनिर्वाह करत आहे. तो कला शाखेतून पदवीचे शिक्षण घेत आहे. आई वडील कष्ट करून मुलाच्या स्वप्नांना बळ देत आहेत. संतोषने कुस्तीच्या आखाड्यात जागतिक स्तरावर आपली ताकद सिद्ध केली आहे. यशाच्या शिखरावर पोहोचलेल्या या खेळाडूला पुढील स्पर्धांसाठी आर्थिक मदतीची गरज असून समाजातील इच्छुक दानशूर व्यक्ती, उद्योगपती, लोकप्रतिनिधी आणि क्रीडाप्रेमींनी मदतीसाठी मो.नं.८७६७४५६६८४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नेमबाज, प्रशिक्षक जसपाल राणा यांचे निधन

**नवी दिल्ली, दि. १२ जून -**



प्रख्यात भारतीय नेमबाजी प्रशिक्षक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील माजी सुवर्णपदक विजेते जसपाल राणा यांचे निधन झाले. ते ४९ वर्षांचे होते. राणा यांच्या पश्चात त्यांची पत्नी रीना राणा, मुलगी देवांशू, मुलगा युवराज, वडील नारायण सिंग राणा आणि बहीण-भाऊ सुषमा सिंग व सुभाष राणा असा परिवार आहे. दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरसह अनेक भारतीय पिस्तुल नेमबाजांना प्रशिक्षण देणारे राणा हे भारतीय पिस्तुल प्रकारांसाठी 'हाय परफॉर्मन्स' प्रशिक्षक म्हणून कार्यरत होते. म्युनिक येथील आयएसएफ विश्वचषकावरून भारतात परतत असताना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. राणा यांच्या निधनाबद्दल नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष कलिकेश नारायण सिंग देव यांनी शोक व्यक्त केला आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या 'योग दिंडी पदयात्रा

**सोलापूर, दि. १२ जून-**

२१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सोलापुरात 'योग दिंडी पदयात्रा' आयोजित करण्यात आली आहे. रविवार, १४ जून रोजी सकाळी ठीक ६:00 वाजता विणकर विभाग, कन्ना चौक येथून या पदयात्रेला सुरुवात होणार आहे. या पदयात्रेला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अमर फुदाले, प्रवीण दर्गोपाटील, नगरसेविक ज्ञानेश्वर म्याकल आणि गीता गवई, बबीता धुम्मा उपस्थित राहणार आहेत. ही पदयात्रा विणकर विभाग येथून निघून साखरपेठ, सोमवार पेठ, कोंतम चौक, कुंभारवेस, जोडभावी पेठ या मार्गाने प्रवास करत पुन्हा कन्ना चौक येथे येऊन समाप्त होईल. कार्यक्रमाचे आयोजन नागेश्वर कन्ना आणि रवि कंटली यांनी केले असून, सोलापूर शहरातील जास्तीत जास्त योगसाधकांनी आणि नागरिकांनी या पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागेश्वर कन्ना (0७३८५५४९७७२) किंवा रवि कंटली (९७३00४२२७३) यांच्याशी संपर्क साधता येईल.

# गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी उद्या ऑनलाईन योग सत्र

### क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १२ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत योगाचा व्यापक प्रसार व जनजागृती करण्यासाठी एका विशेष ऑनलाईन योग सत्राचे आयोजन करण्यात आले असून, याद्वारे 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' प्रस्थापित करण्याचा मानस आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी या ऐतिहासिक उपक्रमात राज्यातील नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी आणि विविध संस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

हे ऑनलाईन योग सत्र रविवारी, १४ जून २०२६ रोजी सकाळी ६:१५ ते ७:१५ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. आयुष मंत्रालय, भारत सरकार आणि 'हॅबिल्ड हेल्थटेक प्रा. लि.' यांच्या संयुक्त विद्यमाने हे सत्र होणार असून, याचे थेट प्रक्षेपण आयुष मंत्रालयाच्या अधिकृत युट्युब चॅनेलवर केले जाईल.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी १८00-३१५-४00८ या टोल फ्री क्रमांकावर मिसड कॉल देऊन आपली पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला मोबाईलवर सत्राची लिंक व आवश्यक सूचना पाठवल्या जातील. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या निकषांनुसार, प्रत्येक सहभागीने स्वतःच्या स्वतंत्र मोबाईल, लॅपटॉप किंवा टॅबलेटवरून सत्रात लॉग-इन करणे बंधनकारक आहे. प्रत्येक स्वतंत्र उपकरणाची नोंदणीच यात ग्राह्य धरली जाणार आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त लोकसहभाग सुनिश्चित करण्यासाठी सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, विभागीय उपसंचालक, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, शाळा, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, नेहरू युवा केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांना सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आरोग्यदायी उपक्रमात आणि जागतिक विक्रमात आपले योगदान द्यावे, असे सहसंचालक मोरे यांनी केले आहे.

# सोलापुरात सोमवारपासून आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

### राज्यातील महिला कर्मचार्‍यांचा सहभाग; तीन दिवस क्रीडा, कला आणि संस्कृतीचा अनोखा संगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त १५ ते १७ जून या कालावधीत आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील विविध ५ विद्यापीठांमधील महिला कर्मचार्‍यांना एकत्र आणत त्यांच्यातील क्रीडा, सांस्कृतिक व कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी दिली.

महिला कर्मचार्‍यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्याबरोबरच परस्पर संवाद, मैत्री आणि संघभावना वृद्धिंगत करण्यासाठी हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तीन दिवस चालणार्‍या या महोत्सवात विविध सांस्कृतिक स्पर्धांसह क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले असून राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील महिला कर्मचारी यामध्ये सहभागी होणार आहेत.





महिला महोत्सवाचे उद्घाटन १५ जून रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या नवीन मुख्य प्रशासकीय इमारतीतील अहिल्या भवन येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे राहणार आहेत. उद्घाटक म्हणून उद्योगवर्धिनी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व ज्येष्ठ समाजसेविका चंद्रिका चौहान व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे यावेळी उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी उद्घाटनानंतर वैयक्तिक गायन, समूह गायन, वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य आणि रांगोळी अशा विविध सांस्कृतिक स्पर्धा पार पडणार आहेत. दुसऱ्या दिवशी १६ जून रोजी रोड रेस, बॅडमिंटन, खो-खो आणि रस्सीखेच अशा क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. महिला कर्मचार्‍यांमधील क्रीडागुण, शारीरिक क्षमता आणि संघभावना यांचे दर्शन या स्पर्धांमधून घडणार आहे. महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा १७ जून रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठ सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर राहणार असून उद्घाटक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून सुप्रसिद्ध कवयित्री व व्याख्यात्या डॉ. स्वाती शिंदे-पवार सहभागी होणार आहेत.

# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला आयपीएलचा दर्जा देणार : उदय सामंत

### लोकनाथ मीडिया चषक स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला भविष्यात आयपीएलचा दर्जा देणार आहे. तसेच टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूला शासकीय नोकरी देण्याचा प्रयत्न करणार असल्याची घोषणा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सोलापुरात केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोलापुरातील सेवालय फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांच्या सहकार्याने पत्रकार बांधवांसाठी १२ ते १४ जून या तीन दिवसात रेल्वे मैदान येथे आयोजित लोकनाथ मीडिया चषक २०२६ चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मंचावर खासदार डॉ. ज्योती वाघमारे, माजी आमदार राजेंद्र राऊत, आरोग्यदूत मंगेश चिवटे, नगरसेवक अमोल शिंदे, प्रियदर्शन साठे, अमर पाटील, महेश साठे, सेवालय फाउंडेशनचे प्रमुख मनीष काळजे, ज्ञानेश्वर सपाटे, राजू आलुरे , सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, डिजिटल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष विजयकुमार बाबर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पल्लवी पवार यांनी केले तर विश्वभूषण लिमये यांनी आभार मानले. या स्पर्धेचे समालोचन शंकर पवार यांनी केले.

**बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय स्पर्धा रत्नागिरीत**

सोलापुरात आयोजित केलेली पत्रकारांसाठीची क्रिकेट स्पर्धा ही कौतुकास्पद आहे, याच धर्तीवर रत्नागिरी येथे बाळशास्त्री जांभेकर मीडिया क्रिकेट स्पर्धा आयोजित





करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यभरातील पत्रकारांचे क्रिकेट संघ सहभागी व्हावे, असे आवाहन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सोलापूरच्या रेल्वे मैदानावर राजकीय नेत्यांच्या गोलंदाजीवर अत्यंत सुरेख अशी फटकेबाजी केली. त्यांची फटकेबाजी पाहून उपस्थित खेळाडूंनी टाळ्यांची दाद दिली. प्रत्येकांच्या गोलंदाजीवर त्यांनी चौकार आणि षटकार खेचले. प्रारंभी सकाळच्या सत्रात मैदानाचे पूजन नगरसेवक मनीष केत, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दिगंबर इप्पलपलली यांच्या उपस्थिती झाले. सूत्रसंचालन आप्पासाहेब पाटील तर आभार प्रदर्शन विक्रांत कालेकर यांनी मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





## कारचोरी करणाऱ्या आंतरराज्य चोरट्याला तेलंगणा राज्यातून अटक

**चोरीच्या २५ लाखाच्या ४ कार हस्तगत**

**फौजदार चावडी पोलिसांची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पथकाने सोलापूरसह राज्यात कारचोरी करणाऱ्या एका आंतरराज्य गुन्हेगारास तेलंगणा राज्यातून अटक करून एकूण ५ कार चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत . पोलिसांनी या चोरट्याकडून २५ लाख रुपये किमतीच्या चोरीच्या ४ कार हस्तगत केल्या आहेत.

समद मेहमूद शेख (वय ३२, रा. निझामाबाद, तेलंगणा) असे अटक करण्यात आलेल्या त्या कार चोराचे नाव आहे. दि. २० मे रोजी पहाटेच्या वेळी सुर्यभान पाटील (रा.अवंती नगर, सोलापूर ) यांची स्विफ्ट डिझायर कार (एम.एच. १३ डी.ई. ३०८४) चोरीला गेली होती. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांनी या गुन्ह्याचा जलद तपास करण्याच्या सूचना सहा. पोलिस निरीक्षक संजय क्षीरसागर यांना दिल्या होत्या. त्या अनुशंगाने क्षीरसागर यांच्या पथकाने तपास सुरु केला. गुन्हा घडला त्यावेळी पहाटे एक लाल रंगाची स्विफ्ट कार लांब थांबली आणि त्यातून आलेल्या आरोपींनी कार चोरल्याचे स्पष्ट झाले. ही कार उमरग्याकडे गेल्याचे सीसीटीव्हीत दिसले. त्यांनी प्रत्येक टोल नाका चुकवून आणि गाडीचा नंबर प्लेट बदलून चलाखीने कार नेल्याचे दिसून आले. तेथून पोलिसांचे पथक तेलंगणा येथील बोगन गावात पोहचले. आरोपीने त्या कारचा मूळ नंबर लावून कार नेल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन पोलिसांनी निझामाबाद येथून वरील आरोपीला ताब्यात घेतले. त्यांनी हजरत खान (रा. कुर्ला, मुंबई) याच्यासोबत मिळून कार चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून सोलापूर, धाराशिव, अकोला, यवतमाळ, अकोला सूरत हायवे येथून चारचाकी गाडया चोरल्याचे पाच गुन्हे उघडकीस आले. त्याच्याकडून चोरीच्या तीन व चोरी करण्यासाठी वापरलेली एक अशा २५ लाख रुपये किमतीच्या चोरीच्या ४ कार हस्तगत करण्यात आल्या. कारच्या दरवाजाची काच स्क्रू ड्रायव्हरच्या सहाय्याने फोडून हजरत खान याच्याकडे असलेल्या डिव्हाईसच्या सहाय्याने कार सुरु करुन कारची चोरी करीत होते. दुसरा आरोपी हजरत खान याचा शोध घेण्यासाठी एक पोलीस पथक रवाना करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर, सहा. पोलिस आयुक्त प्रताप पोमण, फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर, पोलीस अमलदार भाऊ कसबे, अमोल खरटमल, रवि धेंडे, कृष्णात बडुरे, विनोद पुजारी, विनोद व्हटकर, कुमार शेळके, शशिकांत दराडे, शिवानंद भिमदे, सुर्यकांत दराडे, अतिष पाटील, विनायक जाधव, अजय चव्हाण, ज्ञानेश्वर गायकवाड, पंकज घाडगे, अयाज बागलकोटे, सौरभ पाटील, मचछिंद्र राठोड, नितीन मोरे, दत्तात्रय कोळवले यांनी पार पाडली आहे.

## दुःखद प्रसंगात चिंता परिवाराचा नेत्रदानाचा आदर्श निर्णय; दोन अंध व्यक्तींना नवदृष्टी

**सोलापूर, दि. १२ जून-**

येथील रहिवासी बालाजी चिंता (वय ४९) यांचे ११ जून रोजी निधन झाले. निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांनी समाजाप्रती बांधिलकी जपत नेत्रदानाचा प्रेरणादायी निर्णय घेतला. तेरापंथ युवक परिषद यांच्या सहकार्याने आणि श्रीमती मिश्रीबाई गुलाबचंद तोष्णीवाल आय बँक ट्रस्ट अँड रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रदानाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. या कार्यासाठी चेतन सुराणा यांनी समन्वयाची भूमिका बजावली. चिंता यांच्या पश्चात पत्नी संगीता, पुत्र प्रथम, वडील इरय्या तसेच मोठा परिवार आहे. कुटुंबियांनी दुःखाच्या प्रसंगातही घेतलेल्या या निर्णयामुळे दोन अंध व्यक्तींना नवदृष्टी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. नेत्रदान हे मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणारे श्रेष्ठ दान मानले जाते. चिंता परिवाराच्या या सामाजिक कार्याचे विविध सामाजिक, धार्मिक व सेवाभावी संस्थांकडून कौतुक करण्यात येत आहे. मृत्यूनंतरही दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरण्याचे कार्य बालाजी चिंता यांच्या नेत्रदानातून घडले आहे. हा समाजासाठी प्रेरणादायी आदर्श असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.



## निधन वृत्त...

### किसनराव देशमुख

**बार्शी, दि. १२ जून**



बार्शी उत्तर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार कृष्णराव उर्फ किसनराव नानासाहेब देशमुख (वय ९५) यांचे आज निधन झाले. शनिवार दि. १३ जून रोजी सकाळी ९ वाजता निबूंत, ता. बारामती येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन जावई व नातवंडे असा परिवार आहे. किसनराव देशमुख हे १९७८ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी झाले होते. त्यांनी पन्नालाल सुराणायांचा पराभव केला होता. देशमुख यांनी बार्शी तालुका पंचायत समितीचे सभापती तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून हे काम पाहिले होते.

### डॉ. मंजुश्री कुलकर्णी

**सोलापूर, दि. १२ जून-**



प्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या माजी अध्यक्षा डॉ. मंजुश्री कुलकर्णी यांचे शुक्रवारी (दि. १२ जून) वयाच्या ७७ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. डॉ. कुलकर्णी यांनी वैद्यकीय क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावताना फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, रोटरी क्लब, ऋऋऋइखआणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सोलापूर शाखेत विविध पदांवर कार्य केले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

## स्कुटीच्या डिकीतून दागिन्यांसह रक्कम लंपास

**बार्शी शहरात धक्कादायक चोरी**

**१५ तोळे सोने, पावणे पाच लाख रुपयांची रोख रक्कम**




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १२ जून**

बार्शी शहरातील वाहतूक पोलिस शाखेसमोरील वसुंधरा हॉटेल परिसरात स्कुटीच्या डिक्कीत ठेवलेली सोन्याचे दागिने आणि लाखो रुपयांची रोकड असलेली बॅग चोरट्याने लंपास केली. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अर्जुन नलवडे (वय ४३, रा. ढगे मळा, बार्शी) यांचे मार्केट यार्ड, तुळजापूर रोड येथे किराणा दुकान आहे. व्यवसायासाठी घेतलेले १० लाख रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी त्यांनी स्वतःचे, पत्नीचे व मुलांचे सोन्याचे दागिने तारण ठेवून कर्ज काढण्याचा निर्णय घेतला होता. गुरुवार दि. ११ जून रोजी दुपारी ते सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन बारामती सहकारी बँकेच्या बार्शी शाखेत गेले होते. मात्र तारण कर्जाचे काम पूर्ण न झाल्याने त्यांनी सोन्याचे मूल्यांकन करण्यासाठी सराफ दुकानात भेट दिली. तेथून परतल्यानंतर सर्व दागिने व रोख रक्कम असलेली बॅग स्कुटीच्या डिकीत ठेवून ते आपल्या दुकानात गेले.

रात्री ८.३७ वाजता घरी जात असताना वसुंधरा हॉटेलजवळ ते पापडी खरेदी करण्यासाठी थांबले. यावेळी त्यांनी स्कुटी चुकून चावीसह उभी करुन दुकानात प्रवेश केला. काही वेळाने परत आल्यानंतर डिकी उघडून पाहिली असता त्यामधील बॅग गायब झाल्याचे निदर्शनास आले. घटनेनंतर धक्का बसल्याने तक्रारदाराची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे तत्काळ तक्रार दाखल न करता उपचार घेतल्यानंतर शुक्रवार दि. १२ जून रोजी त्यांनी बार्शी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली आहे.

**चोरीस गेलेल्या मालाचे स्वरुप**

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, चोरीस गेलेल्या मालामध्ये सोन्याचा हार, गंठण, कर्णफुले, ब्रेसलेट, गोफ, चेन, अंगठ्यांसह एकूण १५ तोळे सोन्याचे दागिने तसेच दुकानातील आणि वैयक्तिक मिळून सुमारे ४ लाख ८० हजार रुपयांची रोकड होती.

## प्रवाशाच्या हत्येप्रकरणी आरोपींना पोलिस कोठडी

**सोलापूर बसस्थानकात दोन दिवसांपुर्वी झालेली हत्या**

**सोलापूर दि. १२ जून -**

पेन्शन आणि पी.पी.एफ.च्या कामासाठी साताऱ्याला निघालेल्या एका वृद्ध प्रवाशाची अज्ञात व्यक्तीने डोक्यात वार करून निर्घृण हत्या केली. ही घटना पांजरापोळ चौक येथील एसटी बसस्थानक येथे बुधवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी आरोपींना न्यायालयाने ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. कृष्णप्रसाद व्ही. (वय ६३, रा. कोईम्बतूर, तमिळनाडू) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. त्यांची मुलगी प्रकृती (वय २९, रा. तमिळनाडू) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार खुनाचा गुन्हा दाखल केला होता. कृष्णप्रसाद हे मूळचे तामिळनाडूतील कोईम्बतूरचे रहिवासी आहेत. ते साताऱ्यातील एका खाजगी कंपनीत नोकरी करत होते. आपल्या पेन्शन आणि पी.पी.एफ. च्या कामासाठी ते ९ जून रोजी संध्याकाळी हैदराबादहून सोलापूरमार्गे साताऱ्याला जाण्यासाठी निघाले होते. १० जून रोजी मध्यरात्री ३ वाजण्याच्या सुमारास सोलापूर बसस्थानकातील फलाट क्रमांक २३ च्या बाजूला असलेल्या नाथजल पाणी बॉटल दुकानासमोर ते जखमी अवस्थेत आढळून आले होते. पोलिसांनी त्यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील यांनी केला. गुरुवार दि.११ जून रोजी कुणाल किसन कांबळे (वय-२१) आणि अमन सुधाकर जेटीथोर (वय-२१,दोघे रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर ) यांना अटक केली . एका विधीसंघर्षग्रस्त बालकासही ताब्यात घेतले. दरम्यान अटक केलेल्या वरील दोघा आरोपींना आज शुक्रवारी दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.तर अल्पवयीन आरोपीस बाल सुधारगृहात ठेवण्यात आले आहे.






## बोगस डॉक्टरच्या उपचारानंतर वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

**मुलाचा आरोप; बोगस डॉक्टरवर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ जून-**

तालुक्यातील उपळाई (ठों) येथे वैद्यकीय परवाना व शैक्षणिक पात्रता नसतानाही उपचार करणाऱ्या कथित बोगस डॉक्टरच्या निष्काळजीपणामुळे एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी मृताच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीनूसार बार्शी तालुका पोलिस ठाण्यात बोगस डॉक्टर शंकर पाठकविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी गोविंद सुतार (वय २८, रा. विश्वासनगर, उपळाई ठों.) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन, त्यांचे वडील तानाजी सुतार (वय ६०) यांना कंबरेत वेदना होत असल्याने २६ एप्रिल रोजी रात्री गावातील शंकर मनोहर पाठक यांच्याकडे उपचारासाठी नेले होते. तक्रारीनुसार, संबंधिताने कंबरेत इंजेक्शन देऊन औषधे दिली. मात्र दुसऱ्या दिवशी इंजेक्शन दिलेल्या ठिकाणी गाठ निर्माण झाली. त्यानंतर २ मे रोजी तानाजी सुतार यांना बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तपासणीदरम्यान गाठ गंभीर स्वरुपाची असल्याचे डॉक्टरांनी सांगत शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. मात्र उपचार सुरु असतानाच ४ मे रोजी त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी बार्शी तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली होती. दरम्यान, मृत्यूचे कारण निश्चित करण्यासाठी संबंधित वैद्यकीय कागदपत्रे व शवविच्छेदन अहवाल जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडे पाठवला होता. परंतु अहवाल मिळण्यास विलंब होत असल्याने फिर्यादी गोविंद सुतार यांनी आरोप केला आहे की, संबंधित शंकर पाठककडे कोणतीही मान्यता प्राप्त वैद्यकीय पदवी, प्रशिक्षण किंवा उपचाराचा परवाना नसतानाही तो अनेक वर्षांपासून गावात रुग्णांवर उपचार करीत आहेत. त्यांनी दिलेल्या इंजेक्शनमुळेच माझ्या वडिलांचा मृत्यू झाला. वडिलांच्या मृत्यू शंकर पाठक जबाबदार असल्याचे आरोप तक्रारीत केला आहे. याप्रकरणी पोलिस तपास करीत असून वैद्यकीय अभिप्राय व तपास अहवालानंतर पुढील कायदेशीर कारवाई होणार असल्याचे सांगितले.

## पारंपरिक वज्रलेपनाचाच वारकरी संप्रदायाचा आग्रह

**जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर पुढील कामावर लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१२ जून-**

वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी व पारंपारिक आयुर्वेद वज्रलेपन तज्ज्ञांकडून गुरुवारी (दि.११) श्रीविठ्ठल मुर्ती परिक्षणानंतर पारंपरिक वज्रलेपनाचाच वारकरी संप्रदायाचा आग्रह करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय घेण्याबाबत सांगितले. जिल्हाधिकारी कोणती पध्दती अवलंबितात याकडे लक्ष आहे.

वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी व पारंपारिक आयुर्वेद वज्रलेपन तज्ज्ञ यांच्याकडून श्री विठ्ठल मुर्तीचे गुरुवारी परिक्षण केले. पाहणीनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. वारकरी संप्रदाय पाईक संघातर्फे विशेष आमंत्रित पारंपरिक वज्रलेपन तज्ज्ञ आशीर्वाद ऐरानी (ललीत नंदन) विकास सावंत, इंद्रजित घोरपडे, वारकरी संप्रदाय पाईक संघ व वारकरी फडकरी समाज युवा संघाचे पदाधिकारी होते.

पुरातत्व खात्याने विलास वाहने यांच्या नेतृत्वाखाली त्यांची रासायनिक लेपन प्रक्रियेची मांडणी केली. विशेष आमंत्रित तज्ज्ञांनी पारंपरिक वज्रलेपनाची पद्धत, परंपरा आदींची माहिती दिली. पारंपरिक आयुर्वेदिक वज्रलेपनासाठी परवानगी द्यावी अशी आग्रही मागणी केली. याच मागणीचा पुनरुच्चार व आग्रह वारकरी संप्रदायाने केला.

बैठकीस जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, सहअध्यक्ष औसेकर महाराज, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके विठ्ठल महाराज नामदास, रघुनाथ महाराज कबीर, नागेश महाराज बागडे, मयुर महाराज बडवे, श्रीकांत महाराज टेंभूकर, बापुसाहेब महाराज उखळीकर, चंद्रशेखर महाराज ठाकुर व देविदास महाराज ढवळीकर, मंदिर महासंघ पदाधिकारी आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.



**पुरातत्व विभाग लेखी हमी देईल का?**

पारंपरिक वज्रलेपनाची पद्धत व त्यातील घटक हे शासनमान्य संस्थेद्वारे प्रमाणित नाहीत याचा अर्थ ते चुकीचे आहेत असा कसा होतो? पुरातत्व खाते रासायनिक वज्रलेपन पद्धत अवलंबली तर कधीच मुर्ती खराब होणार नाही असे लेखी देऊ शकते का? असे अनेक गंभीर प्रश्न वारकरी संप्रदायाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांसमोर उपस्थित केले. प्रशासनाने रासायनिक लेपन रेटण्याचा प्रयत्न केला तर वारकरी संप्रदायातील जेष्ठ मंडळींशी चर्चा करुन प्रशासनाच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचा इशारा वारकरी संप्रदाय पाईक संघाने दिला आहे.

शासकीय व्यवस्थेने श्रद्धेच्या पलिकडे जाऊन मुर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया अवलंबल्यास आम्हाला प्रचंड वेदना होतील. जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक योग्य निर्णय करावा.

**- रामकृष्ण महाराज वीर,**
**प्रवक्ते वारकरी संप्रदाय पाईक संघ.**

## गुरुभक्तीसाठी पैसा नाही तर अंतःकरणात निष्ठा महत्त्वाची

**गहिनीनाथ महाराज औसेकर; कीर्तन महोत्सव**

सोलापूर - कलियुगात भगवंतांच्या नामाशिवाय तरणोपाय नाही. गुरुभक्ती ही पैशाने मोजता येत नाही, त्यासाठी अंत: करणात निष्ठा आणि समर्पण लागते. संतांचे विचार आचरणात आणून संसारिक जीवनात राहून परमेश्वर प्राप्ती आणि परमार्थ करणे शक्य असल्याचे विचार श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे अध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मांडले.

ह.भ.प.माऊली महाराज बचुटे - सवाळकर शिष्य - मित्र परिवारातर्फे दमानी नगरातील गड दर्शन समाज मंदिरात आयोजित कीर्तन महोत्सवात ते बोलत होते. गुरुवारी रात्री झालेल्या कीर्तनात गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी विवेचन करताना जीवनात गुरूला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे सांगितले. सद्गुरूंच्या कृपेशिवाय आत्मज्ञान आणि भक्तीचा मार्ग सापडत नाही. संतांनी सांगितलेला भागवत धर्म अतिशय सोपा आणि सरळ असून तो आचरणच आणल्यास जीवन आनंदी बनते असे सांगितले .

कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमतेवर महाराजांनी मार्मिक प्रहार केला. संत विचार आणि गुरुभक्तीवर औसेकर महाराजांनी आपले परखड मत मांडले सुमधुर आवाजातील अभंग आणि ओघवत्या भाषेचा वापर करत औसेकर महाराजांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले. वारकरी संप्रदायाची मूल्ये वारीचे महत्त्व आणि संस्कृतीचे जतन याविषयी सुद्धा त्यांनी श्रोत्यांना मार्गदर्शन केले. संसारिक जीवनात वावरताना सुद्धा भगवंताचे नाम आवश्यक असल्याचे औसेकर महाराजांनी सांगितले. अहंकार सोडा, गर्व करू नका, आपण गेल्यावर जग चालेल की नाही ? याची चिंता सोडा, पदाच्या अपेक्षेने काम करू नका, नामस्मरणात आपल्याला गुंतवून ठेवा,असे सांगतानाच माणसाने मन तृप्त ठेवले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत देहू येथील श्री.गाथा मंदिराचे अध्यक्ष ह .भ.प.श्री.पांडुरंगबाबा महाराज घुले यांचे किर्तन होणार आहे, असे आयोजकांनी सांगितले.




**आईवडिलांना डांबून एकादशी करणाऱ्याकडे ...**

गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, एकादशी करणाऱ्यांनी डामडौल आणि गाजावाजा करू नये. एकादशी हे तीन दिवसांचे व्रत आहे. एकादशी ज्याला जमते त्याने निरंकार करावी... पाणी पिऊन, नाही तर दूध किंवा चहा कॉफी, नाहीतर फळ, मग त्यानंतर फराळ करायचा... असे सांगताच एकाच हशा पिकला. एकादशीचा संकल्प करा असे आवाहन करतानाच आई वडिलांना घरात डांबून एकादशी करणाऱ्याकडे पांडुरंग ढुंकूनही पाहत नाही, असेही ते म्हणाले.

**भिकारी झालो तरी चालेल ...**

पंढरीसारखे क्षेत्र अगोदर झाले नाही आणि पुढे होणारही नाही. पंढरपूरला गेलात तरी मोक्ष मिळतो. पंढरपूर माणसाने निर्माण केलेले नाही तर देवाने निर्माण केले आहे. तुकोबाराय म्हणतात, भिकारी झालो तरी चालेल मात्र पंढरीचा वारकरी होईन. पंढरीची वारी, संतांचे मार्ग आणि विठ्ठल भक्ती यांचा प्रचार आणि प्रसार गहिनीनाथ औसेकर महाराजांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून करण्याची परंपरा कायमच ठेवली आहे.

## करमाळ्यात विकासकामांना ब्रेक; उपअभियंता पद रिक्तच

**सेवानिवृत्तीनंतर ११ दिवस उलटले तरी नियुक्ती नाही**

**रश्मी बागल यांच्या पत्रालाही प्रशासनाची दखल नसल्याची चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून**

करमाळा पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील उपअभियंता पद रिक्त राहिल्यामुळे विकासकामांच्या अंमलबजावणीवर परिणाम होत असल्याचे चित्र समोर आले आहे. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त होणार असल्याची माहिती आधीपासून असतानाही पर्यायी नियुक्ती वेळेत करण्यात न आल्याने अनेक प्रशासकीय प्रस्ताव आणि विकासकामे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, विद्यमान बांधकाम उपअभियंता यांच्या सेवानिवृत्तीपूर्वीच नवीन अधिकाऱ्याची नियुक्ती व्हावी यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दहा दिवस आधी प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविला होता. मात्र, सेवानिवृत्तीला तब्बल अकरा दिवस उलटूनही नव्या उपअभियंत्याची नियुक्ती झालेली नाही.

या रिक्त पदाचा परिणाम पंचायत समितीच्या विविध विकासकामांवर होत असल्याची चर्चा आहे. तांत्रिक मंजुरी, अंदाजपत्रके, मोजमापे तसेच विविध बांधकाम प्रस्तावांच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याने ग्रामपंचायतींसह ठेकेदार आणि लाभार्थ्यांनाही प्रतीक्षा करावी लागत आहे.

विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या पक्षनेत्या रश्मी बागल यांनी या पदावर तातडीने नियुक्ती करण्याबाबत प्रशासनाला लेखी पत्र दिले होते. मात्र, त्यानंतरही कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. लोकप्रतिनिधींच्या सूचनेकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे.

**तो आमचा निर्णय**

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांना याबाबत विचारले असता या प्रकरणात काय निर्णय घ्यायचा तो घेतला जाईल. हा प्रशासनिक प्रश्न आहे. असे सांगून मुद्दा मिटविला.

दरम्यान, पंचायत समिती प्रशासन आणि गटविकास अधिकाऱ्यांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. विकासकामांची गती कायम ठेवण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक असताना करमाळा पंचायत समितीतील हे महत्त्वाचे पद रिक्त राहिल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालुक्यातील प्रलंबित कामे आणि रखडलेले प्रस्ताव यांचा विचार करता, नवीन उपअभियंत्याची नियुक्ती कधी होणार याकडे लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायती आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## मैत्री ढाबा ते लक्ष्मी मंदिर रस्ता करण्याची मागणी

**सोलापूर :** सोलापूर शहरातील विजापूर रोड परिसरातील अनंत स्मार्ट सिटी ते जवळील महालक्ष्मी मंदिरापर्यंतचा रस्ता कच्चा असून तो डांबरी पक्का रस्ता करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old Name **ABEDABI AHMAD SHEKH** has Bee changed to New Name **ABIDA SALIM SHEKH** and residing at A/p. 4061 mangde Chawl, Tuljapur road, barshi,dist. solapur kindly note the same.
**Affi No: 265264246126850105 0961**
**Date : 11/06/2026**

# पाणीप्रश्नावर बोलल्याने नोटिसा; पोलिसांची भूमिका संशयास्पद

**बार्शी तालुका आणि जिल्ह्यातील इतर तालुक्यात दुजाभाव का?**

**मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी जमले होते नागरिक**

**कृष्णराज बारबोले यांचा नगरपरिषदेत मटका फोडून निषेध**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१२ जून-**

पाणीपुरवठ्याचा प्रश्न हा प्रशासन आणि नगरपरिषदेचा विषय आहे. जर नोटिसा देऊन पाणी प्रश्नावर आंदोलने रोखली जात असतील तर मग शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची जबाबदारीही पोलिसांनीच घ्यावी. जिल्ह्यात आचारसंहिता व जमाबंदी असतानाही पंढरपूर, माढा, माळशिरस याठिकाणी अनेक प्रश्नांवर आंदोलने सुरु आहेत. बार्शीकरांनी जीवनमरणाचा पाणी प्रश्नावरुन आंदोलन केले असता देण्यात आलेल्या नोटिसीकडे लक्ष वेधताना बार्शी तालुका आणि इतर तालुक्यात दुजाभाव का? असा संतप्त सवाल उपस्थित करत पोलिसांची भूमिका संशयास्पद असल्याचे बार्शीकरांतून सांगण्यात येते.

बार्शी शहराला मागील नऊ वर्षांपासून सतावत असलेल्या पाणीटंचाईच्या प्रश्नाने पुन्हा एकदा तीव्र रुप धारण केले असून मागील तीन महिन्यांपासून विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी शहरातील अनेक भागांमध्ये तब्बल १६ व्या दिवशीही पाणीपुरवठा झाला नसल्याने नागरिकांचा संताप व रोष उफाळून आला. सोशल मीडियावर सत्ताधारी-विरोधक यांच्यावर राग व्यक्त होऊ लागला.

या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षाचे प्रतोद तथा माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले यांनी आपल्या सहकाऱ्यांसह नगरपरिषदेत जाऊन मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी नगरसेविका सायरा मुल्ला, माजी नगरसेवक शंकर देवकर, अजय भानवसे, प्रशांत जाधव, बबन नायकोजी, विनोद भुसारे, आर्यन पाचपुते हे नगरपरिषद परिसरात जमा होऊ लागले होते.

याची माहिती मिळताच बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे पोलीस बंदोबस्तासह नगरपरिषदेत पोहोचले. आचारसंहिता व प्रतिबंधात्मक आदेश लागू असल्याचे सांगत पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये कृष्णराज बारबोले व त्यांच्या सहकाऱ्यांना नोटिसा बजावल्या. तसेच जमावबंदीचे कारण देत कोणत्याही प्रकारचे आंदोलन अथवा गर्दी करण्यास मज्जाव करण्यात आला. कृष्णराज बारबोले यांनी नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारावर मटका फोडून पाणीटंचाई विरोधातील संताप व्यक्त केला.

### प्रत्येकवेळी पाईपलाईन व वीज गळतीचे कारण

प्रत्येक वेळी पाईपलाईन गळती आणि वीज गळती हीच कारणे पुढे केली जातात. मात्र गेली नऊ वर्षे जलदाय अभियंता अजय होनखांबे व सत्ताधारी यांच्याकडून हीच कारणे सांगून त्यावर कायमस्वरुपी उपाययोजना का करण्यात आली नाही? गल्लीपासून दिल्लीपर्यंत यांचीच सत्ता असतानाही नऊ वर्षे बार्शीचा पाणी प्रश्न सुटत नसेल तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल कृष्णराज बारबोले यांनी यावेळी उपस्थित केला. दरम्यान, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांची भेट घेऊन शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली.

## महत्वाचे...



### 'स्किलमॅन'च्या वतीने क्षमता बांधणी प्रशिक्षण शिबीर

**सोलापूर, दि.१२ जून-**

एमएसएसआयडीसीच्या रॅम्प उपक्रमांतर्गत स्किलमॅन इन्फोकॉर्पच्या वतीने सोलापूरमधील एमएसएमईंसाठी डिजिटल कर्जावर क्षमता बांधणीविषयी दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या सहकार्याने स्किलमॅन इन्फोकॉर्पच्या राज्य प्रतिनिधी राजश्री ताला, समाजसेविका विद्या सिंगम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या शिबीरात सुमारे ५० जणांनी सहभाग नोंदविला होता. एमएसएमई उद्योजकांमध्ये डिजिटल कर्जपुरवठा प्रणालींबद्दल जागरुकता वाढवणे आणि त्याचा अवलंब करणे या उद्देशाने महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या अधिपत्याखाली या शिबीराचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. डिजीटल कर्जपुरवठ्याच्या अनुषंगाने अर्ज प्रक्रिया, वित्तीय प्लॅटफॉर्म, पत मूल्यांकन, कागदपत्रांची आवश्यकता, कर्ज घेण्याच्या पध्दती, औपचारिक पतपुरवठा आदींविषयींची सविस्तर माहिती शांताराम सामल यांनी दिली. राजश्री ताला यांनी एमएसएमईसाठी डिजिटल वित्तीय साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे अध्यक्ष सिध्देश्वर गड्डम, उपाध्यक्ष जयंत आकेन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

### सराईत गुन्हेगार अटकेत; दोन घरफोड्या उघडकीस; सव्वा लाखाचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर, दि. १२ जून-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने सोलापुरात दिवसा व रात्री घरफोडी करणाऱ्या रेकॉर्डवरील एका सराईत गुन्हेगारास अटक करून सव्वा लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. दीपक वैकुंठ श्रीगण (वय-२३, रा.भारत नगर, जुना विडी घरकुल, सोलापुर) असे अटक केलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. मार्च महिन्यामध्ये जुना विडी घरकुल येथे दोन चोऱ्या झाल्या होत्या. अंबादास मधुकर पल्ली यांच्या बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरण्यात आली होती. तसेच दुसऱ्या एका घराचे कुलूप तोडून लॅपटॉपची चोरी झाली होती. याबाबत एमआयडीसी पोलिसात गुन्हे दाखल आहेत. शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठपोलिस निरीक्षक अरविंद माने यांनी या गुन्ह्याचा अधिक तपास करण्यासाठी सपोनि शैलेश खेडकर यांना सूचना केल्या होत्या. त्यानुसार तपास करताना या पथकातील पोलिस आबाजी सावळे यांना माहिती मिळाली की, घरफोडी करणारा सराईत आरोपी दीपक श्रीगण हा शास्त्री नगर येथील बसस्टॅण्डजवळ चोरीचे सोने विक्री करण्यासाठी थांबला आहे. याबाबत खात्री करुन खेडकर व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणी जावून दीपक श्रीगण याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता घरकुल येथील दोन्ही घरफोडी त्यानेच केल्याचे कबूल केले. त्याच्याकडून १ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

### जिल्हाधिकारी कार्यालयातील खनिकर्म शाखेत ३ लाख ९२ हजारांची फसवणूक

**सोलापूर, दि.१२ जून-**

जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज (खनिकर्म) शाखेचे बनावट धनादेश तयार करून शासनाची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी निखिल कुमार आणि सव्वीक चॅटर्जी (दोघांचा पूर्ण पत्ता माहीत नाही) यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अमरनाथ स्वामीनाथ भिंगे (वय-४२, रा.गुलमोहर सोसायटी, वसंत विहार, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यात आरोपीने दिलेला ३ लाख ९२ हजारांचा पहिला चेक वटला दुसरा ८ लाख ५५ हजारांचा चेक दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आला. मंगळवार ९ जून रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी नीलिमा जाधव यांच्या मोबाईलवर स्टेट बँक ऑफ इंडियातील कर्मचाऱ्याने फोन करून तुमच्या कार्यालयाचा ८ लाख ५५ हजारांचा आरोपी सव्वीक चॅटर्जी यांना वटवून द्यायचा आहे का? अशी विचारणा केली. यावर खनिकर्म अधिकारी जाधव यांनी असा कोणताही धनादेश कोणालाही दिला नसल्याचे स्पष्ट केले. कार्यालयाच्या ई-मेल आयडीची तपासणी केली असता, बँकेच्या अधिकृत मेल आयडीसारख्या दिसणाऱ्या संशयास्पद आयडीवरून मेल आलेले दिसले. फिर्यादी अमरनाथ भिंगे आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी नीलिमा जाधव यांनी तातडीने ट्रेझरी शाखेत जाऊन चौकशी केली. तेव्हा आरोपी निखिल कुमार याने खनिकर्म कार्यालयाचा हुबेहूब बनावट धनादेश तयार करून पटना, बिहार येथून ३ लाख ९२ हजाराची रक्कम आधीच काढून घेतली होती. तर दुसरा आरोपी सव्वीक चॅटर्जी याने ८ लाख ५५ हजाराचा दुसरा बनावट धनादेश वटवण्याचा प्रयत्न केला, मात्र बँकेच्या सतर्कतेमुळे आणि खनिकर्म अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे हा प्रयत्न फसला. सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय जाधव हे पुढील तपास करत आहेत.

# शहरातील दोन्ही उड्डाणपुल संदर्भात पोस्ट, रेल्वे, बीएसएनएल व रायफल ग्राउंडचे भूसंपादन बाकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपुल संदर्भात केंद्र शासनाच्या पोस्ट, रेल्वे, बीएसएनएल व रायफल ग्राउंडचे भूसंपादन बाकी आहे. केंद्र व राज्य शासनाच्या जागेच्या संपादनाची प्रक्रिया सर्व संबंधित विभागाने तातडीने करून घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांनी दिले. उड्डाणपूल भूसंपादन प्रक्रिया आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त वृष्टी जैन, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, भूसंपादन अधिकारी प्रदीप बास्तेवाड, राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता स्वप्नील पवार, महेश येमूल, सिटी सर्व्हे अधिकारी गजानन पोळ उपस्थित होते.

सर्व शासकीय व खाजगी जागांच्या मिळकतीचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावेत. केंद्र शासनाच्या पोस्ट मध्य रेल्वे, बी एस एन एल व ग्राउंड जागेसाठी सोलापूर महापालिका रेडीरेकनर दराप्रमाणे शुल्क देणार आहे. तसेच या जागेतून दुसऱ्या जागा साहित्य इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी येणारा खर्चही महापालिका देईल. त्यामुळे संबंधित विभागाने त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून जागा हस्तांतरित करण्याबाबतचे मान्यता घेऊन त्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करावेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनीही मार्गदर्शन केले.

सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत दोन महत्त्वाचे उड्डाणपुल प्रस्तावित आहेत. यात सेक्शन १ जुना पुना नाका ते पत्रकार चौक (५.४५ कि.मी.) व सेक्शन २ जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला (५.०० कि.मी.) या मार्गांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने नगरोत्थान योजनेतून रु.२९९ कोटींची मंजुरी दिली असून शासन हिस्सा ७०% व महापालिका हिस्सा ३०% असा वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या सुधारीत आराखड्यानुसार भूसंपादनाचा खर्च रु.१४५.११ कोटी इतका आहे, असे यावेळी सांगण्यात आले.




### शासनाकडून आतापर्यंत ८४.४३८ कोटी रुपये प्राप्त

शासनाकडून आतापर्यंत ८४.४३८ कोटी रुपये प्राप्त झाले असून १७.१३९ कोटी उर्वरित आहेत, तर महापालिकेच्या हिस्स्यातील रु.२५.५५ कोटी जमा झाले आहेत. या प्रकल्पासाठी एकूण १०.५५ हे.आर.क्षेत्राचे संपादन होणार आहे. यात खाजगी व शासकीय मिळकतींचा समावेश आहे. सेक्शन १ मध्ये १३७ मिळकतींपैकी १०० खाजगी व ३७ शासकीय तर सेक्शन २ मध्ये १०० मिळकतींपैकी ८७ खाजगी व १३ शासकीय मिळकती आहेत. आतापर्यंत सेक्शन १ मधील ६१ खाजगी मिळकतींचा ताबा घेण्यात आला असून सेक्शन २ मधील ताबा प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्य रेल्वे, बीएसएनएल, पोलिस विभाग व वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागा बाधित झाल्या आहेत.

# झेडपी कर्मचाऱ्यांसाठी एसबीआय 'सॅलरी पॅकेज' सामंजस्य करार

**एक कोटीपर्यंत विमा संरक्षणासह विविध लाभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

जिल्हा परिषद कर्मचार्यांना वेतन खात्यांतर्गत मिळणाऱ्या विविध लाभांसंदर्भात स्टेट बँक ऑफ इंडियासोबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत जिल्हा परिषद कर्मचार्यांना एक कोटी रुपयाच्या विमा संरक्षणासह विविध लाभ मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन होते. प्रारंभी मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी प्रास्ताविक करून सॅलरी पॅकेज योजनेचे महत्त्व विशद केले.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक आनंदकुमार पाटकर यांनी एसजीएसपी/एमओयू सॅलरी पॅकेजबाबत सविस्तर माहिती देताना कर्मचार्यांच्या हिताच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या विविध सुविधांची माहिती दिली.

या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू लाभ, कायमस्वरूपी अपंगत्व लाभ, अंशतः अपंगत्व लाभ, वैद्यकीय खर्चासाठी विमा संरक्षण, वैयक्तिक विमा तसेच विविध बँकिंग सुविधा उपलब्ध होतात. या योजनेत पात्र कर्मचार्यांना एक कोटी रुपयांपर्यंत विमा संरक्षणाचा लाभ मिळू शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी जैन म्हणाले, प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले एसबीआय वेतन खाते या योजनेत समाविष्ट आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. खाते या योजनेत समाविष्ट नसल्यास संबंधित एसबीआय शाखेशी संपर्क साधून ते तातडीने सॅलरी पॅकेजमध्ये रुपांतरित करून घ्यावे. नामनिर्देशन अद्ययावत असल्याची खात्री करुन घ्यावी.

प्राथमिक टप्प्यात एसबीआय खातेदार कर्मचार्यांसाठी या सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून, त्यानंतर इतर बँकांच्या खातेदार कर्मचार्यांसाठीही अशाच सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही जैन यांनी सांगितले. सूत्रसंचालन सहाय्यक लेखाधिकारी उमाकांत राजगुरू यांनी केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी मिनाक्षी वाकडे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक आनंदकुमार पाटकर आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य मान्य खासगी प्राथमिक शिक्षक महासंघाच्या वतीने आंदोलन

**सोलापूर, दि.१२ जून-**

शिक्षण वाचवा, देश वाचवा... टीईटी परीक्षेतून शिक्षकांना मुक्त करा... यांसह अन्य मागण्यांसंदर्भात अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य मान्य खासगी प्राथमिक शिक्षक महासंघाच्या सोलापूर शाखेच्या वतीने जिल्हा परिषद येथे आंदोलन करण्यात आले.

माजी आमदार भगवान साळुंके यांच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षक महासंघाचे राज्य संघटन मंत्री कृष्णा हिरेमठ, सोलापूर जिल्हा सचिव विश्वजीत माणिकशेट्टी, शहर सचिव सुरेश पाटील, उपाध्यक्ष रमेश बेडगे, महिला आघाडी अध्यक्षा शुभांगी बुट्टे, राज्य उपाध्यक्षा राजश्री तडकासे आदींनी याबाबत निवेदन सादर केले. या आंदोलनात रेणुका हिरेमठ, अशोक होळीकट्टी, अरुणा हणमगाव, चितली यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, बालवाडी शिक्षिका, सेविका, पालक व संस्था चालक आदींनी सहभाग नोंदविला होता.



# पद्मशाली पुरोहित संघम्च्या वतीने श्री विष्णू यागास प्रारंभ

**सोलापूर, दि.१२ जून-**

पद्मशाली पुरोहित संघ वेदपाठशाळेच्यावतीने लोककल्याणार्थ आयोजित तीन दिवसीय श्री विष्णु यागास शुक्रवारी प्रारंभ करण्यात आला. शुक्रवारी सुप्रभात, गरुड ध्वजारोहण, अखंड दीपाराधना, गणेश पूजा, पुण्याहवाचन, पुण्याहवाचन, नक्षत्र नवग्रह, विष्णु पंचायतन, सप्तमातृका, षोडषमातृका, सर्वतोभद्रमंडल पूजन, लक्ष्मीनारायण मंडल आदी विधी करण्यात आले. लक्ष्मण सिध्दूल यांनी मुख्य यजमानपद स्वीकारले होते.

शनिवार दि.१३ जून रोजी श्री विघ्नेश्वर पूजा, श्री विष्णुपंचायतन पूजा, श्री विष्णुयाग हवन विधी, आरती, तीर्थप्रसाद तर रविवार, दि.१४ जून रोजी श्री विघ्नेश्वर पूजा, श्री विष्णुपंचायतन पूजा, श्री विष्णुयाग हवन विधी, यज्ञ महापूर्णाहुती, आरती, तीर्थप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत, असे सांगण्यात आले. यावेळी मनोहर जडल, भानुचंद्र चिप्पा, रवींद्र श्रीपती, वेंकटेश जिल्ला, नरसय्या अल्ली, नरेंद्र श्रीमल, श्रीनिवास गाजूल, देवीदास अन्नलदास, वेणूगोपाळ म्याना, विष्णू दासरी, श्रीनिवास म्याडम, आत्माराम चिप्पा, अविनाश श्रीमल, राजू कोडम, सतीश पोला आदी उपस्थित होते.



# विजयसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा; शुभेच्छांचा वर्षाव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१२ जून-**

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सोलापूर शहर-जिल्ह्यासह राज्यभरातील विविध पक्षसंघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध संस्था, संघटनांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा जणू वर्षाव करण्यात आला. अनेकांनी हजारो वह्या, विविध झाडांची रोपे देऊन शुभेच्छा दिल्या.

शिवरत्न बंगला येथे सकाळपासूनच राज्यातून आलेल्या कार्यकर्त्यांची मोठी रेलचेल सुरु होती. सकाळी विजयसिंह मोहिते-पाटील यांना कुटुंबातील महिलांनी औक्षण केले. त्यानंतर त्यांनी सकाळी शिवरत्न बंगल्यावर असणाऱ्या सहकार महर्षींच्या समाधीचे दर्शन घेतले व अकलूजचे ग्रामदैवत श्री अकलाई देवी यांचेही दर्शन घेऊन कार्यकर्त्यांच्या शुभेच्छा स्वीकारण्यासाठी ते उपस्थित झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणातील आजी-माजी मंत्री, आजी-माजी खासदार, आमदार, विविध पक्षाचे प्रमुख, विविध क्षेत्रातील मान्यवर आदींनी विजयसिंह मोहिते-पाटील यांना भ्रमणध्वनीवरुन शुभेच्छा दिल्या. राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून त्यांना शुभेच्छा दिल्या. मोहिते पाटील परिवारातील सर्व सदस्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळ शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघाचे चेअरमन, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व सर्व संचालक मंडळ सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग श्री शंकर सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ तसेच शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज नगर परिषद शिवरत्न शिक्षण संस्था, श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टचे ट्रस्टी चंद्रकांत कुंभार, श्रीकांत राऊत नितीन खराडे, भीमराव काळे ग्रीन फिंगर स्कूलचे सर्व संचालक व शिक्षक वर्ग माळशिरस तालुका ज्येष्ठ नागरिक संघटना त्याचबरोबर दादांसोबत काम केलेले नांदेड, बीड, मुंबई, पुणे येथील सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकारी यांनीही उपस्थित राहून दादांना शुभेच्छा दिल्या.

ग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल यांच्या वतीने विजयसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर मोफत आरोग्य तपासणी शिबिरात एक्स-रे, सोनोग्राफी, पंचकर्म व सर्व सामान्य तपासण्या यामध्ये एकूण १८० रुग्णांनी सहभाग घेतला.



हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | शनिवार, १३ जून २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# ‘आंदोलन’द्वारे ‘इव्हेंटबाजी’चे घडले दर्शन; बारामती, पुणे येथून आयात केलेल्यांची गर्दी

- आमदार रोहित पवार यांचे अन्नत्याग आंदोलन
- वाहतुकीचे कारण पुढे करत देण्यात आली नोटीस
- जिल्ह्यातील नेतेमंडळी, पदाधिकाऱ्यांनी फिरवली पाठ






**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ जून-**

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफी संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे शुक्रवार, दि.१२ जून पासून अन्नत्याग आंदोलनास बसले आहेत. या आंदोलनाच्या निमित्ताने सर्वत्र करण्यात आलेली बॅनरबाजी आणि बाराम ती, पुणे येथून आयात केलेले ‘राष्ट्रवादी’चे पदाधिकारी-कार्यकर्ते यामुळे ‘आंदोलन’द्वारे ‘इव्हेंटबाजी’चे दर्शन घडल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले.

राज्य शासनाने शेतकऱ्यांना कोणत्याही अटी, शर्थीशिवाय सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी; या मागणीसाठी आमदार रोहित पवार येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अन्नत्याग आंदोलनास्त्र उगारले आहेत. दरम्यान, वाहतुकीला अडथळा होईल हे कारण पुढे करीत प्रशासनाकडून आ.रोहित पवार यांना उपोषणापूर्वीच उपोषणस्थळी येवून नोटीस देण्यात आली. परंतु त्यांनी आंदोलन करण्यावर ठाम राहिले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपोषणस्थळावरील सर्व तयारी करुन ठेवली होती. आ.रोहित पवार यांचे शुक्रवारी सकाळी श्रीक्षेत्र पंढरपुरात आगमन झाले. संत गाडगेबाबा यांच्यासह शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन, नामदेव पायरीचे दर्शन, मंदिराला प्रदक्षिणा करुन ते आंदोलनस्थळी जाऊन अन्नत्याग आंदोलनास प्रारंभ केला. अन्नत्याग आंदोलन हे कोणत्या एका पक्षाचे नाही. हे केवळ बळीराजासाठीचे आंदोलन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबद्दल ज्यांना ज्यांना काळजी आहे ते सर्वजण या आंदोलनात सहभागी होवू शकतात, असे आवाहन आमदार रोहित पवार यांनी यांनी आधीच केले होते. व्यासपीठावर आमदारद्वय अभिजीत पाटील, राजू खरे यांच्यासह अन्य मान्यवर प्रमुख उपस्थित होते. मात्र, जिल्ह्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रमुख नेतेमंडळी, पदाधिकारी यांनी याकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले.

### भाविकांना त्रास; वाहतुकीची कोंडी

अधिक मासानिमित्त पंढरपूर येथे भाविकांची गर्दी वाढत आहे. अशा परिस्थितीत आ.रोहित पवार यांनी पुकारलेल्या आंदोलनच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्त्यांवर लावण्यात आलेले बॅरेकेडिंग, आंदोलनासाठी आलेल्या बाहेरगावच्या पदाधिकाऱ्यांची वाहनांची गर्दी यामुळे भाविकांसह पंढरपूरकरांना कमालीचा त्रास सहन करावा लागला. नगरपालिकेकडून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे येणारा रस्ता, सावरकर चौकातून शिवाजी चौकाकडे येणारा रस्ता, संतपेठ भागातील रस्ते अशा शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी झाली होती.

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांची चंगळ

आमदार रोहित पवारांकडून अन्नत्याग आंदोलन छेडण्यात आले आहे. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसाठी येथील मठामध्ये चहा, नाश्ता, थंडगार पाण्याच्या बाटल्यांची सोय करण्यात आली होती. त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मात्र चंगळ होत असल्याचे दिसून आले.

### या आहेत प्रमुख मागण्या

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील मर्यादा रद्द करुन सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात यावी. एकवेळ समझोता (OT>S>) योजनेतील अन्यायकारक अटी रद्द करुन सर्व शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा. २ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठीही सवलतीच्या अटींसह कर्जमाफी लागू करावी. प्रोत्साहनपर अनुदानासाठी नियमित कर्जफेडीची दोन वर्षांची अट रद्द करावी. २०१७ च्या कर्जमाफीस पात्र असूनही केवळ कागदपत्रांच्या त्रुटींमुळे वंचित राहिलेल्या लाखो शेतकऱ्यांना तातडीने लाभ द्यावा. शेतकरी विरोधी अटी रद्द करुन १ रुपयात पीकविमा योजना पुन्हा प्रभावीपणे लागू करावी. पेरणीपूर्वी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांचे पुनर्गठन करुन त्यांच्या खात्यात आवश्यक रक्कम उपलब्ध करुन द्यावी.

## खासगी रुग्णालयांतील बोगस नर्स; तपासणी करण्याचे आदेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

शहर-जिल्ह्यातील खासगी रुग्णालयांमध्ये अप्रशिक्षित व अपात्र महिलांना नर्स म्हणून कामावर ठेवून रुग्णांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याची तक्रार राष्ट्रीय छावा संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड.योगेश पवार यांनी केल्यानंतर जिल्हा आरोग्य प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे यांनी संबंधितांना बोगस नर्ससंदर्भात तपासणी करण्याचे आदेश जारी केले आहेत.

अनेक खासगी रुग्णालयांम ध्ये कोणतेही नर्सिंग शिक्षण नसलेल्या महिलांकडून इंजेक्शन देणे, सलाईन लावणे, ड्रेसिंग करणे यांसारखी धोकादायक वैद्यकीय कामे करुन घेतली जात असल्याचा आरोप करण्यात आला होता. खासगी रुग्णालयांमध्ये नर्सिंग स्टाफची शैक्षणिक पात्रता, नर्सिंग कौन्सिल नोंदणी, नियमानुसार कर्मचाऱ्यांची उपलब्धता याची पडताळणी करण्यात यावी. वर्षातून किमान दोन वेळा तपासणी करुन अहवाल सादर करण्यात यावा, असे आदेशात म्हटले आहे.

## टिकेकरवाडी येथील पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाचे काम पूर्ण

**सुरक्षितता, क्षमता आणि परिचालन कार्यक्षमता वाढवली**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने नुकत्याच पार पडलेल्या ट्रॅफिक ब्लॉक्सच्या माध्यमातून टिकेकरवाडी स्टेशनवरील यार्डच्या पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले. ज्यामुळे पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण आणि क्षमता वाढीच्या दिशेने आणखी एक म हत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. या आधुनिकीकरणामुळे स्टेशन यार्ड अधिक सुरक्षित, अधिक कार्यक्षम आणि भविष्यासाठी सज्ज अशा रेल्वे सुविधेत रूपांतरित झाले आहे, जे वाढत्या प्रवासी आणि मालवाहतुकीची म ागणी हाताळण्यास सक्षम आहे.

या कामांच्या अंम लबजावणीदरम्यान आधुनिक रेल्वे उपकरणे आणि यंत्रसामग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. यामध्ये युनिमॅट ट्रॅक टॅम्पिंग मशीन्स, रेल क्रेन, हायड्रॉलिक ट्रॅक जॅक आणि स्ल्यूइंग उपकरणे, रेल कटिंग आणि ड्रिलिंग मशीन्स, ईआरसी क्लिप बसवणारी आणि काढणारी उपकरणे, टॉवर वॅगन्स, ओएचई कामांसाठी क्रिम्पिंग टूल्स, तसेच पोर्टेबल जनरेटर्स आणि लाइटिंग टॉवर्स यांचा समावेश होता. ’ब्लॉक’ कालावधीत वॉकी-टॉकी, क्रँक हँडल्स, क्लॅम्प्स आणि पॅडलॉक्सच्या वापरामुळे परिचालन सुरक्षा आणि समन्वय अधिक बळकट करण्यात आला.

श्रेणीसुधारणेचे काम सोलापूर विभागाच्या विविध विभागांच्या समन्वयाने पूर्ण करण्यात आले. या कामासाठी एकूण ३६८ हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये परिचालन, अभियांत्रिकी, सिग्नलिंग आणि दूरसंचार, ट्रॅक्शन आणि वितरण व विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचा सम ावेश होता. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे नियोजित ’ब्लॉक’ कालावधीत हे श्रेणीसुधारणेचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाले.

### प्रमुख सुधारणा आणि हे असतील फायदे

स्टेशनवर आधुनिक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. यामुळे गाड्यांची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करून सुरक्षितता वाढवते. मार्गाची क्षमता वाढेल, गर्दी कमी होईल आणि रेल्वे वाहतुकीच्या वाढत्या मागणीला आधार मिळेल. गाड्यांचा विलंब कमी होईल आणि वेळेवर येण्याच्या दरात सुधारणा अपेक्षित आहे. स्टेशन यार्डमधील गाड्यांची हालचाल अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करता येईल. रेल्वेचे संचालन अधिक सुरळीत होईल आणि कार्यान्वयनातील बिघाडाची शक्यता कमी होईल. माल आणि रेल्वे साहित्याची जलद हालचाल आणि हाताळणी शक्य होईल. सुरक्षितता वाढेल आणि भविष्यातील विस्तार व वाढत्या रेल्वे वाहतुकीसाठी क्षमता निर्माण होईल.

### ⏩ महत्वाचे...

#### शेतीच्या वादातून लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.१२ जून-**

शेतीच्या वादातून एकाच कुटुंबीयातील तिघांना लोखंडी कडा व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथे घडली. शिवानंद आप्पाशा लोहार (वय-३२) उमाबाई आप्पाच्या लोहार (वय-६५) आणि दत्तात्रय आप्पा लोहार (वय-४५, तिघेही रा.हंजगी) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत. गुरुवारी दुपारी ते सर्वजण शेतामध्ये असताना शेतीच्या वादातून अशोक बिराजदार व इतर तीन ते चार जणांनी मिळून ही मारहाण केली. अक्कलकोट येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारार्थ ते स्वतः दाखल झाले.

#### शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने मारहाण


**सोलापूर, दि.१२ जून-**

घराजवळ शिव्या दिल्याचा जाब विचारल्याने एका तरुणाला लोखंडी रॉड व लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी करण्यात आल्याची घटना करमाळा येथे घडली. आकाश सोमनाथ अगरे (वय-३३, रा.करमाळा) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. गुरुवारी रात्री ११ वाजता राहत्या घराजवळ शिव्या दिल्याचा जाब विचारला म्हणून त्याला टिलू चौतम ास आणि रजनी आकाश कांबळे यांनी मारहाण केली. करमाळा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून पत्नी गौरी हिने सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

#### जिल्हा परिषद पत्रकार समन्वयकपदी महताब शेख

**सोलापूर, दि. १२ जून-**

जिल्हा परिषद प्रशासन आणि प्रसारमाध्यमांम धील संवाद अधिक प्रभावी व सुसूत्र ठेवण्यासाठी



पत्रकार समन्वयाची जबाबदारी महाताब शेख यांच्याकडेच कायम ठेवण्यात आली आहे. त्यांची नियुक्ती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून नसून पत्रकार समन्वयक म्हणून करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अलीकडे काही स्तरांवर शेख यांची नियुक्ती सीईओंचे पीआरओ म्हणून झाल्याची चर्चा रंगली होती.

## मुल्लाबाबा टेकडीवरील अतिक्रमणांवर कोर्टाचा हातोडा

**२४ वर्षानंतर न्यायालयीन वादाचा निकाल**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

सोलापूर शहरातील पंचकट्टा परिसरातील श्री मार्कंडेय देवस्थानालगत असलेल्या मुल्लाबाबा टेकडी भागात दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली.

दोन जेसीबीच्या सहाय्याने पत्र्याची पाच मोठी दुकाने व चार पत्र्याची घरे हटविण्यात आली. ५० हून अधिक पोलिस कर्मचारी व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या जागेसंदर्भात श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे ट्रस्टी विरुध्द हाजी हसनसाहेब वस्ताद (मयत) यांचे वारस व इतर सहा जण यांच्यात सन २००२ पासून दिवाणी न्यायालयात वाद सुरू होता.

तब्बल २४ वर्षे न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहिल्यानंतर न्यायालयाने संबंधित जागा श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीच्या ताब्यात देण्याचे आदेश दिले. सिद्धेश्वर पेठेतील सिटी सर्व्हे क्रमांक ६०५४ (गड्डा प्लॉट) मधील ही जागा पूर्वी कडबागाड्या विक्रीसाठी वापरली जात होती.

सदर जागेतील कबरस्थानकडील ५२ बाय २२ फूट, श्री मार्कंडेय मंदिराच्या बाजूची १८ बाय १३ फूट, त्याला लागून असलेली २४ बाय १४ फूट जागेवरील पत्र्याची शेड हटवून ती जागा श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीच्या ताब्यात देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.


त्या अनुषंगाने दिवाणी न्यायालयाचे चार बेलिफ यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष जागेवर कारवाई करण्यात आली. कारवाई सुरू होताच काही रहिवासी व संबंधितांकडून आक्षेप नोंदविण्यात आल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली.

## हप्ता खात्यात जमा पण वाळूचा प्रश्न कायम; घरकुल लाभार्थ्यांची अडचण


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जून-**

ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर शासनाकडून घरकुल योजनेचे हप्ते जमा होत असले, तरी घरबांधणीसाठी आवश्यक असलेल्या मोफत वाळूच्या पुरवठ्याचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. शासनाच्या धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्याची तरतूद असतानाही प्रत्यक्षात ती मिळत नसल्याच्या तक्रारी दक्षिण सोलापूरसह मोहोळ तालुक्यात वाढत आहेत.

घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर योजनेचे हप्ते नियमित जमा होत आहेत. मात्र मोफत वाळूवितरणासंदर्भातील तक्रारींची तालुकास्तरावर माहिती घेण्यात येईल. गटविकास अधिकाऱ्यांकडून



सविस्तर अहवाल मागवून आवश्यक ती पुढील कार्यवाही केली जाईल, असे जिल्हा परिषदेचे सीईओ कुशल जैन यांनी सांगितले.



ग्रामीण भागात अनेक लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर झाल्यानंतर बांधकाम सुरु केले आहे. आर्थिक मदतीचा हप्ता मिळत असला तरी वाळू उपलब्ध न झाल्याने बांधकामाचा वेग मंदावल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून होत आहे. काही ठिकाणी वाळू खरेदीसाठी अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याने घरकुलाचे अंदाजपत्रक कोलमडत असल्याचेही सांगितले जात आहे.

शासनाची घरकुल योजना ही केवळ आर्थिक मदत देण्यापुरती मर्यादित नसून लाभार्थ्याला प्रत्यक्षात घर उभे राहणे हा तिचा मुख्य उद्देश आहे. हप्त्यांसोबतच बांधकामासाठी आवश्यक साहित्य उपलब्धतेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा मानला जात आहे. जिल्हा परिषद प्रशासनाकडून तालुकानिहाय वस्तुस्थितीचा आढावा घेतला जाणार असल्याने मोफत वाळू वितरणातील अडथळे दूर होतात का? याकडे घरकुल लाभार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

### योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांच्या पक्क्या घराच्या स्वप्नांना अखेर नवसंजीवनी मिळाली आहे. तांत्रिक अडचणींमुळे गेल्या दोन म हिन्यांपासून रखडलेले पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गतचे अनुदान वितरण पुन्हा सुरू झाले असून जिल्ह्यातील ७,७५६ लाभार्थ्यांच्या खात्यावर ३३ कोटी ४८ लाख रुपयांचा निधी जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे अपूर्ण राहिलेल्या घरकुल बांधकामांना आता वेग मिळणार आहे. तालुकास्तरावर मोफत वाळू वितरण संबंधी माहिती घेतली जाईल. त्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे सीईओ कुशल जैन यांनी सांगितले.

### कोणत्या तालुक्याला किती निधी?

अनुदान वितरणात अक्कलकोट आणि करमाळा तालुके आघाडीवर असून अक्कलकोटला ५.६१ कोटी रुपये तर करमाळ्याला ४.६५ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. त्यापाठोपाठ माढा, मंगळवेढा, बार्शी, मोहोळ, माळशिरस, दक्षिण सोलापूर, पंढरपूर, सांगोला आणि उत्तर सोलापूर तालुक्यांतील लाभार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणावर निधी वितरित करण्यात आला आहे.

### घरकुल लाभाचे टप्पे

घरकुल योजनेअंतर्गत अनुदान चार टप्प्यांमध्ये दिले जाते. यामध्ये पहिल्या टप्प्यात ३४० लाभार्थ्यांना ५१ लाख रुपये, दुसऱ्या टप्प्यात ३,१५९ लाभार्थ्यांना २२.११ कोटी रुपये, तिसऱ्या टप्प्यात ३,४९४ लाभार्थ्यांना १०.४८ कोटी रुपये तर अंतिम टप्प्यात ७६३ लाभार्थ्यांना ३८.१५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १४७०

**अर्जुना हें जाण । मुळबंधाचें लक्षण ।**
**वज्रासन गौण । नाम यासी ।**

योगाभ्यासासाठी स्थळ कसे असावे, स्थळ निवडल्या नंतर बसण्याची जागा कशी असावी, त्या जागेवर आसन कसे घालावे याबद्दल भगवंतानी अर्जुनाला सविस्तर सांगीतले. सदगुरु स्मरण करुन, त्याच ऐक्य बोधाने त्या आसनावर बसल्यानंतर शरीर आपोआप सावरते, प्राणवायू एकवट होत आहे अशी अनुभवाची स्पष्ट जाणीव होऊ लागते. अशा अवस्थेत प्रवृत्ती पराडब:मुख होते, चित्ताची एकाग्रता अलीकडे येते, आणि योगाभ्यासाचे साधन घडते. आसनमुद्रा कशी असावी हे श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला सांगत आहेत. दोन्ही मांडया पोट-यांना चिकटून घालाव्यात. याला पदमासन म्हणतात. दोन्ही तळपाय वाकडे करुन, आधार चक्राच्या तळाशी (गुदस्थानावर) दोन्ही पावले नीट घट्ट बसवावीत. भद्रासन म्हणतात. उजव्या पायाची टांच तळाशी ठेवून तिने गुदद्वाराची शिवण मध्यभागी दाबावी, मग डावा तळपाय सहज वर बसतो. (म्हणजे उजव्या तळपायावर येतो.) गुद आणि वृषण यामधील बरोबर जी चार बोटे जागा आहे, त्यापैकी दीड बोट खाली व दिड बोट वरची जागा सोडून मध्यभागी जी एकबोट जागा उरते त्या स्थानाला खालून डाव्या पायाच्या टांचेच्या वरच्या भागाने शरीर तोलून धरले जाईल अशा रितीने नेटाने रेटावे. अंग उचलले आहे की नाही हयाची कळत नकळत जाणीव होईल अशा बेताने पाठीचा कणा किंचित उचलावा, आणि तेवढाच प्रमाणात पायाचे बोटे उचलून धरावित. मग टाचेच्या माथ्यावर संपुर्ण शरीरीचा डोलारा स्वयंभु होतो. याला वज्रासन म्हणतात. हे मूळबंध आसनाचे लक्षण असते. हे सांगतांना भगवंत म्हणाले,



**अर्जुना हें जाण । मुळबंधाचें लक्षण ।वज्रासन गौण । नाम यासी ।**

अशा बसण्याने आधारचक्रावर वज्रासनाची मुद्रा पडते, त्यामुळे गुदाशयातून बाहेर पडण्याचा खालचा मार्ग बंद पडतो. तेव्हा आतडयात संचार करणारा अपानवायू आतल्या बाजुला मागे सरकु लागतो असे झाल्यावर द्रोणाकार होऊन हाताचे तळवे डाव्या पायावर सहजच टेकतात आणि खांदे उंचावलेले दिसु लागतात. अशा उंचावलेल्या खांदयात मस्तक रुतून बसते, मग डोळयाच्या पापण्या आपोआप मिटू लागतात. वरची पापणी ढळत नाही. खालच्या पापण्या खालीच राहातात. त्यामुळे अर्धे उघडे, अर्धे बंद अशी डोळयाची स्थिती होते. डोळयांची दृष्टी बाहेर पडलीच तर ती नाकाच्या शेंडयावर स्थिर होते. मान आंकुचित होते, आणि हनुवटी गळया खालच्या खळगीत रुतुन बसते व ती बळकट होऊन छातीवर दाब देते. कंठमणी लोप पावतो. अशा प्रकारे जो बंध पडतो, त्याला जालंधर बंध म्हणतात. बेंबी वर फुगते, पोट खपाटीला जाते आणि हदयकमल आतमध्ये विकसीत होते. लिंगमुळाच्या वरच्या काठावर, बेंबीच्या खालच्या भागावर जो बंध निर्माण होतो, त्याला ओढियाणबंध म्हणतात. योगाभ्यासाच्या क्षेत्रातील अत्यंत महत्वाच्या टप्प्याचे सविस्तर वर्णन चालू असल्याने आपण वाचकांनी काळजीपुर्वक हे भाग लक्षात घेतले पाहिजेत. पदम ासन, भद्रासन, वज्रासन, मुळबंध, जालंधरबंध, ओढियाणबंध इत्यादी आसन व बंध कठिण असले तरी आभ्यासाअंती ते साध्य होण्यासारखे आहेत. ही विविध आसने व बंध आत्मसुखाचा हा भाग असल्याने आत्मीक भावनेतुन या लेखांशी एकरुप होणे गरजेचे आहे. अनुभवी व्यक्तीच्या मार्गदर्शनाख्याली हे करणे आवश्यक असते. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. १३ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. त्रयोदशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- कृतिका (२५.१७)**
**योग - सुकर्मा (१७.२८)**
**करण - विष्टी (२६.१५)**
**राहू काल : शनिवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : शिवरात्री.**
**१९९७: अमेरिकेतील केंटकी येथे 'लॉन्चिंग इन द डार्क' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान भीषण आग लागली.**
**२०००: ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद यांनी स्पेनमधील माद्रिद येथे एकाच वेळी १५ स्पर्धकांविरुद्ध खेळताना १२ लढती जिंकल्या.**
**२००७: इराकच्या अल अस्कारी मशिदीवर (सॅमरा) पुन्हा एकदा बॉम्बस्फोट होऊन नुकसान झाले.**

# सोलापूरला मिळणारे पाणी पूर्णपणे सुरक्षित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

उजनी जलाशयाच्या पाण्यामुळे कॅन्सरसारखे गंभीर आजार होतात, अशा अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या संदेशांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर मान्यताप्राप्त प्रयोगशाळांकडून करण्यात आलेल्या तपासणीत सोलापूरला पुरवठा होणारे पाणी हे पूर्णपणे सुरक्षित, शुद्ध व पिण्यास योग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे सोलापूर महानगरपालिकेने शहरवासीयांना दिलासा दिला आहे.

सोलापूर शहराला उजनी जलाशय योजना, भीमा नदी पाणीपुरवठा योजना तसेच एकरुख उपसा सिंचन योजनेद्वारे पाणीपुरवठा केला जातो. शहरातील नागरिकांना दर्जेदार पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाकणी येथील जलशुद्धीकरण केंद्रात अत्याधुनिक पद्धतीने पाणी शुद्धीकरण प्रक्रिया राबविण्यात येते. गाळणीकरण, निर्जंतुकीकरण आणि गुणवत्ता नियंत्रणाच्या विविध टप्प्यांनंतरच पाणी शहरात वितरित केले जाते.

महापालिकेच्या वतीने कच्चे तसेच शुद्धीकरणानंतरचे पाणी नियमित तपासणीसाठी पाठविले जाते. याच अनुषंगाने पुण्यातील एनएबीएल मान्यताप्राप्त एफएचएचएल प्रा. लि. या संस्थेकडून पाण्याच्या नमुन्यांची सखोल तपासणी करण्यात आली. या अहवालानुसार शुद्धीकरणानंतरचे पाणी भारतीय मानक संस्थाच्या १०५००:२०१२ या पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्ताविषयक निकषांनुसार निर्धारित स्वीकारार्ह मर्यादेत आढळले आहे, अशी माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

यापूर्वीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात आली होती. त्या तपासणीतही पाणी गुणवत्तेबाबत कोणतीही धोकादायक बाब अथवा आरोग्यास अपायकारक घटक आढळून आले नव्हते.

अलीकडे काही माध्यमे व सामाजिक माध्यमांवर उजनीच्या पाण्यामुळे कॅन्सर होतो, अशा आशयाचे संदेश प्रसारित होत आहेत. मात्र अधिकृत प्रयोगशाळा अहवालांमध्ये किंवा मान्यताप्राप्त संस्थांच्या तपासण्यांमध्ये पाण्यात कोणताही कॅन्सरजन्य धोका आढळून आलेला नसल्याचे व्यंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले आहे.

### दर्जेदार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर महापालिका कटिबद्ध

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर किंवा अप्रमाणित माहितींवर विश्वास ठेवू नये. शहराला सुरक्षित व दर्जेदार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून पाणी गुणवत्तेची नियमित तपासणी, देखरेख आणि आवश्यक उपाययोजना सातत्याने सुरू असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. नागरिकांनी केवळ अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहनही व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.



- एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेच्या अहवालातून शिक्कामोर्तब
- नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये
- उजनीच्या पाण्याबाबत पसरणाऱ्या अफवा निराधार

## दोन दुचाकींच्या धडकेतील जखमी इसमाचा अखेर मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

दोन दुचाकींच्या धडकेत जखमी झालेल्या एका दुचाकी स्वाराचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी सायंकाळी ७ वा. मृत्यू झाला.

बसवेश्वर अण्णाप्पा रामपुरे (व ४१ वर्ष, रा. होनमुर्गी ,द सोलापूर) असे त्या मयत दुचाकी स्वाराचे नाव असून ते दोन जून रोजी सायंकाळी गावाकडून सोलापूरकडे दुचाकीवरून येत असताना विजापूर रोडवरील हॉटेल वेरनासमोर समोरून येणाऱ्या दुसऱ्या एका दुचाकी ने त्यांना धडक दिली होती. यात मार लागून जखमी झाल्याने त्यांना दोन खासगी दवाखान्यात उपचार करून शेवटी येथील शासकीय रुग्णालयात नऊ जून रोजी सायंकाळी भाऊ गंगाधर यांनी बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान ११ जून रोजी सायंकाळी मृत्यू झाला.

## पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लस मात्रांचे वाटप सुरू

### मोहीम गतिमान करा : पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था,पुणे येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत. गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी. या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

लंपी चर्मरोगासारख्या संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय क्षेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालकांनीही विभागास सहकार्य करावे. असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

## इंडियन आर्मी अग्निवीरसाठी हर्षल लिंगराज यांची निवड

### महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

इंडियन आर्मीच्या अग्निवीर भरती प्रक्रियेत सोलापूरचे चिरंजीव हर्षल सूर्यकांत लिंगराज यांची निवड झाली आहे. निवडीबद्दल त्यांचा महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महापौरांनी हर्षल यांचे अभिनंदन करत देशसेवेच्या पवित्र कार्यासाठी निवड झाल्याबद्दल कौतुक केले.



महापौर कोंड्याल यांनी हर्षल लिंगराज यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना, युवकांनी सैन्य दलात प्रवेश करून राष्ट्रसेवेसाठी योगदान देणे ही अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशामुळे इतर युवकांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी हर्षल यांचे वडील तथा सोलापूर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागातील कर्मचारी सूर्यकांत लिंगराज उपस्थित होते.

# "प्रेम झाडावर करा, झाडाखाली नको"

## सोलापूर विद्यापीठ 'रासेयो'चा प्रेरणादायी प्रवास

सोलापूर हे बहुभाषिक आणि गिरणी कामगारांचा ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर. देशातले पहिले स्वतंत्र शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहराच्या शैक्षणिक प्रगतीला गती देण्यासाठी २००४मध्ये सोलापूर विद्यापीठाची (आताचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) स्थापना झाली. स्थापनेनंतर सुरुवातीची काही वर्षे राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागाची कामगिरी नगण्य होती. परंतु, जसजशी विद्यापीठाची धुरा अभ्यासू कुलगुरूंच्या हातात आली, तसतसा रासेयो विभाग विद्यापीठाला प्रगतीपथावर घेऊन गेला.

### आगामी काळात संचालकांपुढील प्रमुख आव्हाने

- आत्तापर्यंत झालेल्या वृक्ष लागवडीची जोपासना करून ५ लाखांचे उद्दिष्ट पूर्ण करणे.
- सोलापूर जिल्ह्यातील व राज्यातील आपत्ती निवारणासाठी राज्यस्तरीय आव्हान शिबिराचे आयोजन.
- उत्कर्ष सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धेत मिळालेले सर्वसाधारण विजेतेपद आगामी काळातही कायम ठेवणे.
- सामाजिक क्षेत्रात काम करणारी तरुण पिढी वैचारिक आणि कौशल्याच्या दृष्टीने सक्षम करणे.
- सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी बौद्धिक व्याख्यानमाला आणि विविध प्रबोधनात्मक स्पर्धांचे आयोजन.
- रक्तदान, नेत्रदान, श्रमदान आणि विशेष श्रमसंस्कार शिबिरांचे सातत्याने आयोजन.
- देशाच्या सर्वोच्च सभागृहात (संसदेत) सोलापूर विद्यापीठाचा युवक जावा, या दृष्टीने दर्जेदार युवा संसदेचे आयोजन



**हरित क्रांतीचा संकल्प आणि वनीकरण पुरस्कार**

विद्यापीठाचा ४८२ एकरांचा परिसर जागतिक दर्जाचे पर्यटन क्षेत्र व्हावा, या दृष्टीने २००८ मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ. बाबासाहेब बंडगर यांच्या नेतृत्वाखाली आणि डॉ. तुकाराम शिंदे यांच्या प्रयत्नातून कंटूर मार्किंग पद्धतीने वृक्ष लागवडीला सुरुवात झाली. रासेयोच्या युवकांच्या मदतीने विद्यापीठात स्वतःची नर्सरी उभारण्यात आली. या वृक्ष लागवडीच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यापीठाने २००८ सालचा महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवाजी महाराज वनीकरण पुरस्कार पटकावला. २०१३ पर्यंत हा हरित संकल्प उत्साहाने पुढे नेण्यात आला. त्यानंतर वृक्ष लागवडीचा केलेला संकल्प आणि सुंदर तयार केलेली नर्सरी उध्वस्त झाली. २०१३ ते २०२१ या कालावधीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागांने जेमतेम स्वरूपामध्ये कामगिरी केली.

**डॉ. राजेंद्र वडजे यांचा सुवर्णकाळ आणि ५ लाख वृक्ष लागवडीचे ध्येय**

त्यानंतर वृक्ष लागवड करणार आणि "मी माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी" या एकाच ध्येयाने प्रेरित झालेलं एक सुंदर व्यक्तिमत्व राष्ट्रीय सेवा योजना संचालक पदावर विराजमान झालं ते म्हणजे डॉ. राजेंद्र वडजे. तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडवणीस यांनी त्यांना या पदाची संधी दिली. त्यानंतर आलेल्या निसर्गप्रेमी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यापीठाच्या माळरानावर ५ लाख वृक्ष लागवडीचा भव्य संकल्प सोडला. "प्रेम झाडावरती करा, झाडाखाली नको" हे ध्येय उराशी बाळगून संचालक डॉ. वडजे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०२३ ते २०२६ या कालावधीत अथक परिश्रम घेतले. परिणामी, आजपर्यंत तब्बल १ लाख ८९ हजार ७१२ वृक्ष लागवड यशस्वीपणे पूर्ण झाली. यामध्ये आंबा, पेरू, नारळ, बांबू, साग, महोगनी, सिताफळ, काजू, संत्री, मोसंबी, चिंच, वड, पिंपळ, कापूर, चेरी आणि रुद्राक्ष यांसारख्या विविध प्रकारच्या झाडांचा समावेश आहे. नुकताच डॉ. वडजे यांचा संचालक पदाचा कार्यकाळ संपल्यामुळे, "हा ५ लाखांचा संकल्प आगामी संचालक पूर्ण करणार का आणि या लावलेल्या झाडांचे पुढे काय होणार?" असा प्रश्न आता स्वयंसेवकांना सतावणार आहे.




**राष्ट्रीय व राज्य क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी**

गेल्या काही वर्षांत सोलापूर विद्यापीठाच्या रासेयो विभागाने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात आपले वेगळे वलय निर्माण केले. विद्यार्थ्यांनी राज्य प्रजासत्ताक दिन संचलन (एस.आर.डी.), राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन (एन.आर.डी.) आणि राष्ट्रीय एकात्मता शिबिर (एन.आय.सी.) यांसारख्या सर्वोच्च शिबिरांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. रासेयोचा युवक राष्ट्रीय युवा संसदेतही पोहोचला. डॉ. वडजे यांच्या काळात २०२२-२३ मध्ये राज्य एस.आर.डी./एन.आर.डी. शिबिराचे यशस्वी आयोजन झाले. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने २०२३-२४ मध्ये प्रेरणा राज्यस्तरीय शिबिराची जबाबदारी विद्यापीठाला दिली, ज्याचे राज्यभरातून कौतुक झाले. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला उत्कर्ष राज्य सामाजिक-सांस्कृतिक स्पर्धेच्या (२०२५-२६) आयोजनाची संधी दिली. या स्पर्धेत विद्यापीठाचा आलेख चढता राहिला. २०२२-२३ (जळगाव) आणि २०२४-२५ (पुणे) येथे उपविजेतेपद मिळवल्यानंतर, २०२५-२६ मध्ये विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावून इतिहास रचला.

**माजी स्वयंसेवकांचे योगदान**

विद्यापीठाला या शिखरावर नेण्यात माजी स्वयंसेवकांचा मोठा वाटा आहे. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार विजेते प्रा. पंकज पवार यांच्यासह पत्रकार लखन अदाठे, आफताब शेख, प्रशासकीय अधिकारी प्रशांत शिंदे, कोंडीबा देवकते, पूजा सुपाते, निशिगंधा कापरे, विशाल चव्हाण आणि ॲड. शितल धनवटे यांसारखे अनेक शिलेदार "मी माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी" या भावनेने देश उभारणीचे कार्य करत आहेत.

वाढते औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे ढासळणारा पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल, तर ही रासेयोची चळवळ अधिक भक्कम करणे गरजेचे आहे.

# पेसा क्षेत्रातील भरतीला येणार गती

- आदिवासी विकास विभागाचा ऐतिहासिक निर्णय
- पवित्र पोर्टलद्वारे आश्रमशाळांमध्ये शिक्षक भरती; जवळपास दोन हजार पदे भरणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**


राज्यातील आश्रमशाळांमधील रिक्त शिक्षकपदांची माहिती संबंधित विभागांकडून पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध.केली जाईल. त्यानंतर पात्र उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत. या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून भरतीची कार्यपद्धतीही निश्चित करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक भरती आता पवित्र पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच ही भरती प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची निवड केली जाईल. या भरती प्रक्रियेत मुलाखत घेतली जाणार नाही. उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार उपलब्ध असलेल्या विविध शाळा व पदांसाठी प्राधान्यक्रम देता येणार आहेत. निवड झाल्यानंतर. उमेदवारांच्या शैक्षणिक, व्यावसायिक जात आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास नियुक्तीपत्र देण्यात येईल. शासनाने भरती प्रक्रियेसाठी वेळापत्रकही निश्चित केले आहे. जाहिरात मंजुरीपासून नियुक्तीपर्यंतची सर्व प्रक्रिया ऑनलाइन प्रणालीद्वारे पार पडणार असल्याने भरती अधिक जलद आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा आहे.

### रिक्तपदांची जाहिरात देऊन त्यांना तात्काळ नियुक्ती द्यावी

राज्यात सध्या ४९९ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. यामध्ये नाशिक विभागात २१४, ठाणे विभागात १२७, अमरावती विभागात ८३ आणि नागपूर विभागात ७५ आश्रमशाळांचा समावेश आहेत. भरती प्रक्रिया सुरू करताना काही पदासंदर्भात आराखडा तयार केला पाहिजे. पारदर्शक आणि गतिमान परीक्षा पार पडली पाहिजे, पात्रताधारक उमेदवारांना न्याय मिळाला पाहिजे.वंचित, दुर्लक्षित घटकांतील पाल्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून पवित्र पोर्टल माध्यमातून शिक्षक भरती करणे अत्यंत कौतुकास्पद निर्णय असून, आता शिक्षक भरतीच्या पहिल्या टप्प्यात विभागाच्या रिक्त असलेल्या सर्व पदांची जाहिरात देऊन त्यांना तात्काळ नियुक्ती द्यावी.

**- प्रशांत शिरगूर राज्य उपाध्यक्ष,**
स्पर्धा परीक्षा तथा पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना.




### आश्रमशाळांची सद्य:स्थिती

एकूण मंजूर आश्रमशाळा-५५३
समायोजित शाळा-४८
बंद शाळा - ०६
सध्या कार्यरत आश्रमशाळा-४९९

# १८ दिवसांच्या संघर्षाला तात्पुरता विराम

## ऊसबिलासाठी आशेचा किरण

### जि.प. आवारातील मुक्काम शेतकऱ्यांनी हलवला; आ. कल्याणशेट्टींच्या मध्यस्थीने तोडगा; सोमवारी रक्कम न आल्यास पुन्हा आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

गोकूळ शुगरकडे प्रलंबित तब्बल ५८ कोटी रुपयांच्या ऊसबिलासाठी १८ दिवसांपासून सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला अखेर तात्पुरता दिलासा मिळाला आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकाराने झालेल्या चर्चेनंतर शेतकऱ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र सोमवारी खात्यावर रक्कम जमा न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. मात्र सध्या तरी तात्पुरत्या काळासाठी का होईना? शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेसमोर मारलेला मुक्काम हलवला आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकूळ साखर कारखान्याकडे धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांची सुमारे ५८ कोटी रुपयांची ऊसबिलाची थकबाकी आहे. थकीत रकमेच्यामागणीसाठीशेतकरी,जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करत होते. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी अर्धनग्न, जलसमाधी यांसारखे लक्षवेधी आंदोलनात्मक उपक्रम राबवत प्रशासन आणि कारखाना व्यवस्थापनाचे लक्ष वेधले होते. आंदोलनाची तीव्रता वाढत असताना जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक झाली. बैठकीला जिल्हाधिकारी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, तहसीलदार किरण जमदाडे आणि शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत थकीत ऊसबिले अदा करण्याबाबत तोडगा निघाल्याची माहिती शेतकरी नेते अमोल पाटील यांनी दिली.

**शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे माझे लक्ष**

मी आंदोलकांशी संवाद साधला. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे माझे पहिल्या दिवसापासून लक्ष होते. पुढील आठवड्यात ऊस उत्पादकांच्या खात्यावर रक्कम जमा व्हावी यासाठी मी शंभर टक्के प्रयत्न करीत आहे.

- सचिन कल्याणशेट्टी,
आमदार अक्कलकोट.

**कारखान्याच्या विश्वासार्हतेची मोठी कसोटी**

दरम्यान, आंदोलन स्थगित झाले असले तरी शेतकरी आता प्रत्यक्ष खात्यात रक्कम जमा होण्याची वाट पाहत आहेत. सोमवारी आश्वासनाची पूर्तता झाली तर संघर्षाला यश मिळेल; अन्यथा बुधवारपासून पुन्हा एकदा आंदोलनाचे रणशिंग फुंकले जाणार असल्याने प्रशासन आणि कारखाना व्यवस्थापनासमोर विश्वासार्हतेची मोठी कसोटी उभी राहणार आहे.

महत्वाचे...



## नाथपंथी डवरी गोसावी संस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १२ जून-**

नाथपंथी डवरी गोसावी समाज बहुउद्देशीय संस्था सोलापूर मार्फत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र देवगन यांनी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व रेवणनाथ चव्हाण व सौदागर देवगन यांनी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांच्या हस्ते श्री काळभैरवनाथ महाराजांची महाआरती करण्यात आली. उपस्थित सर्व नात बांधवांना अल्प उपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी नाथ संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र देवघन, रेवणनाथ चव्हाण, सौदागर चव्हाण, महेश पवार, सौदागर देवघन, विजय वंजारी, विजय भंडारी, वैजनाथ देवघन, अशोक क्षीरसागर, अमोल पवार, दीनानाथ देवगन,जनार्दन देवघन, अतुल पवार, आकाश पवार, रवी चव्हाण, प्रणव चव्हाण उपस्थित होते.



## वटवृक्ष स्वामी देवस्थानमध्ये अनारसे प्रसादाचे वाटप

**अक्कलकोट, दि. १२ जून-**

अधिक मासाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आलेल्या हजारो भाविकांना आज श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे अधिक मासातील शेवटच्या गुरूवारी अनारसे प्रसाद वाटप करण्यात आले. सोलापूर येथील स्वामी भक्त स्वप्निल गायकवाड व आशिष सातपुते मित्र परिवार कडून उपस्थित भाविकांना आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मातोश्री सुरेखा कल्याणशेट्टी व गौरी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते या अनारसे प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, शांताबाई टाके आत्या, स्वप्निल गायकवाड, आशिष सातपुते, अविनाश अंधारे, अजय कदम, अविनाश अंधारे, अजय कदम, महेश पाटील, आदित्य जगधने व मित्रपरिवार, रमेश शिंदे, बाळासाहेब कटकधोंड, विपूल जाधव उपस्थित होते.



## साने गुरुजींचा वारसा पुढे चालवण्यासाठी कटिबध्द राहू या : आरती काळे

**सोलापूर, दि. १२ जून-**

साने गुरुजींनी गोष्टी सांगितल्या. गाणी म्हटली. संस्कारक्षम साहित्य लिहिले. त्यांचा हा वारसा पुढे चालवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू या, असे विचार सोलापूर कथामालेच्या अध्यक्षा आरती काळे यांनी व्यक्त केले. त्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरुन बोलत होत्या. कथामाला आणि आंतरभारती यांच्या संयुक्त विद्यमाने साने गुरुजींचा शहाहत्तरावा स्मृति-दिन साजरा करण्यात आला. यावेळी आंतरभारती संस्थेचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष डॉ. उमाकांत चनशेट्टी, आंतरभारती सोलापूरचे अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री, अशोक खानापुरे यांनीही मार्गदर्शन केले. पाहुण्यांच्या हस्ते गुरुजींच्या छायाचित्राचे पूजन केल्यानंतर सहकार्यवाह अरुण धुमाळ यांनी साने गुरुजींची विविध भाषेतील प्रार्थना सादर केली. डॉ.रामचंद्र धर्मसाले यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रसिद्धी प्रमुख श्रीमंत बनसोडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास उपाध्यक्ष गुरुनाथ राजमाने, सरस्वती बताले, शोभना सागर, अविनाश आलदर, हरी राठोड, धीरज कोळी उपस्थित होते.



## महापौर कोंड्याल यांच्याकडून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे सोलापुरात स्वागत

**सोलापूर, दि. १२ जून-**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे सोलापूर दौऱ्यानिमित्त आगमन झाल्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. स्वागत प्रसंगी राज्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, विक्रम देशमुख, नगरसेवक अक्षय आजीखाने, नागेश खरात यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रदेशाध्यक्षांच्या स्वागतानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्याशी संवाद साधत सोलापूर शहर-जिल्ह्यातील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेतला.



## मेहता शाळेत माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

मेहता शाळेत माजी विद्यार्थ्यांचा तिसरा स्नेहमेळावा संपन्न झाला. सन २०१३ ते सन २०१६ या वर्षांतील माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील आठवणी जागवणाऱ्या व्हिडिओ क्लिप्स सादर करण्यात आल्या. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांना स्वतःची ओळख करून देत आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी आपल्या भाषणातून मार्गदर्शन करत शाळेच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचलन व आभार शिक्षक अमित कोर्टीकर यांनी मानले.

## ...तर कोळेगाव 'दारुड्यांचे गाव' म्हणून घोषित करा




### कोळेगावच्या ८७० महिलांच्या सह्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१२ जून-**

माळशिरस तालुक्यातील कोळेगांव येथे मोठ्या प्रमाणात अवैध दारू धंदे, हातभट्टी, मटका, गांजा आणि परमिट रूम बिअर बार तेजीत सुरू आहेत. नागरिकांना त्रास होत असून ही दारूची अनधिकृत दुकाने व इतर अवैध धंदे तातडीने बंद करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी सावंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

निवेदनावर गावातील ८७० संतप्त महिलांनी सह्या करून प्रशासनाकडे दाद मागितली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात गावात वाढलेल्या वैध-अवैध दारू धंद्यांमुळे कायदा, सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. महिला व मुलींना जीव मुठीत धरून फिरावे लागत आहे. शैक्षणिक संस्थांच्या जवळच दारूचे अड्डे चालत असल्याने शालेय मुला-मुलींवर वाईट परिणाम होत असल्याचा आरोप केला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तरुण पिढी या व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे जीवन उद्ध्वस्त करून घेत आहे. जर प्रशासनाने गावातील हे वैध व अवैध दारू धंदे आणि परमिट रूम त्वरित बंद केले नाहीत, तर भविष्यात या गावाला 'दारुड्यांचे गाव' म्हणून घोषित करावे लागेल,' असा उद्विग्न इशारा महिलांनी प्रशासनाला दिला आहे. गावाची शांतता, सुव्यवस्था आणि संस्कृती टिकवण्यासाठी प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. आता यावर जिल्हाधिकारी प्रशासन काय पाऊल उचलणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

कोळेगाव पूर्णपणे दारूमुक्त करण्यासाठी गावात विशेष मतदान प्रक्रिया (दारू बंदीसाठीचे मतदान) घेण्यात यावी. परवानाधारक तसेच अवैध दारू धंद्यांना कायमचा लगाम घालावा.

**- अश्विनी सावंत,**
सामाजिक कार्यकर्त्या.

## जिव्हाळा विद्यामंदिरात वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १२ जून-**

ज्ञान, विज्ञान व सुसंस्कारासाठी शिक्षण प्रसार हे ब्रीद घेऊन जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ कुर्डूवाडी, संचलित जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी विद्यालयाचा २३ वा वर्धापन दिन संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

१० जून २००४ रोजी संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ व सचिव अजित वायचळ यांनी या संस्थेची स्थापना केली.



प्रारंभी संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. २३ वर्षातील गुणवत्तेचा आढावा , विद्यालयाने केली उत्तुंग कामगिरी नाविन्यपूर्ण उपक्रम, डटअअक्र बाह्य मूल्यांकनात अ+ गुणांकन घेत विद्यालयाचे नाव पहिल्या ४० शाळांच्या यादीत संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचले. हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारे जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर हे सोलापूर जिल्ह्यातील एकमेव आहे. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## चाकूने मारून घेतल्याने विवाहिता जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

घरगुती वादातून तरुणीने स्वतः हातावर मारून घेतले. बोरामणी येथे आज शुक्रवारी सकाळी नऊ वाजता ही घटना घडली.

वर्षा अक्षय चव्हाण (वय २४, रा. बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर ) असे त्या विवाहितेचे नाव आहे. आज घरामध्ये घरगुती वाद झाल्याच्या कारणावरून तिने रागाच्या भरात स्वतःच्या हातावर चाकूने मारून घेतले.

यात जखमी झाल्याने तिला उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दीर नितेश चव्हाण यांनी दाखल केले.

## ॲट्रॉसिटी अंतर्गत खून प्रकरणातील वारस शोध मोहीम

### १५ दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय २० नोव्हेंबर २०२५ अन्वये ॲट्रॉसिटी अधिनियमांतर्गत खून व मृत्यू झालेल्या पीडितांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत आहे. दिवंगत दत्ता लक्ष्मण खंदारे यांचा खून झाल्याने अक्कलकोट एमआयडीसी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हयाची नोंद अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत करण्यात आलेली आहे. या प्रकरणी पात्र वारसदारांचा शोध घेण्यात येत आहे; मात्र चौकशीनुसार वारसदारांची माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे दिवंगत दत्ता खंदारे यांची पत्नी, अपत्य वा अन्य कायदेशीर वारसदार असल्यास त्यांनी या जाहीर प्रकटनाच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसांच्या आत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तिसरा मजला, सात रस्ता, सोलापूर या कार्यालयास संपर्क साधून आपले वारसत्व सिद्ध करणारी कागदपत्रे सादर करावीत. निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत, दावा अथवा वारसत्वाबाबतची माहिती प्राप्त न झाल्यास उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

## तुषार जाधव यांची शिवसेना सोशल मीडिया जिल्हाप्रमुखपदी निवड

**जेऊर, दि. ११ जून-**



हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सोशल मीडिया जिल्हाप्रमुखपदी (कार्यक्षेत्र: माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी) तुषार जाधव यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व शिवसेना सोशल मीडिया राज्यप्रमुख प्रतीक दादा शर्मा व पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख महादेव सरवदे तसेच शिवसेना सोशल मीडिया सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अमित पाटील यांच्या नेतृत्वाखाली नियुक्ती करण्यात आली आहे.

## मंगळवेढ्यात तुकाराम मुंढेंच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

### तीन वर्षे बदली न करण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जून-**

औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभर भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, गुटखा विक्री आणि दूध भेसळ प्रकरणांवर सुरू केलेल्या धडक कारवाईच्या समर्थनार्थ मंगळवेढा येथे त्यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी मुंडे यांची किमान तीन वर्षे बदली करू नये अशी जोरदार मागणी करण्यात आली.

गेल्या काही महिन्यांपासून तुकाराम मुंडे यांनी राज्यभर भेसळखोर, गुटखा माफिया आणि बनावट औषधांच्या रॅकेटविरोधात कठोर भूमिका घेत कारवाईचा धडाका लावला आहे. त्यांच्या या धाडसी आणि प्रामाणिक कार्यशैलीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून मंगळवेढा परिसरातील नागरिकांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबविला. यावेळी उपस्थितांनी मंगळवेढा परिसरात वाढत चाललेली भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री, निकृष्ट दर्जाच्या वस्तू, अवैध धंदे तसेच नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रवृत्तींविरोधात अधिक कठोर कारवाईची मागणी केली. प्रशासनातील प्रामाणिक अधिकारी निर्भयपणे काम करत असतील तर समाजाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे, या भावनेतून दुग्धाभिषेक करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. मुंडे यांनी जनतेसाठी समर्पित सेवा, पारदर्शक कारभार, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई या मूल्यांचे सातत्याने पालन केले आहे. अशा अधिकाऱ्यांच्या कार्याला समाजाचा पाठिंबा मिळणे ही काळाची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

## अधिक मासानिमित्त अकलूजमध्ये काशी जगद्गुरुंची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १२ जून-**

जेष्ठ अधिक मासनिमित्त अकलूज येथे श्रीमदब ज्ञानसिंहासनाधिश्वर श्री.श्री. श्री.१००८ काशी पिठाचे जेष्ठ जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्यसानिध्यात श्री.ष.ब्र.१०८ राजगुरु सिद्धलिंग शिवाचार्य महाराज (शिखर-शिंगणापूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि श्री.ष.ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महाराज (वेळापूरकर) यांच्या नेतृत्वामध्ये जेष्ठ अधिक मासानिमित्त मिरवणुक, मार्ग हा मुक्तीचा ग्रंथदिंडी, आशिर्वचन व धर्मजागृती यात्रा कार्यक्रम संपन्न झाला.

काशी जगद्गुरू व उपस्थित शिवाचार्य यांची तसेच मार्ग हा मुक्तीचा ग्रंथदिंडी भव्य मिरवणूक गांधी चौक ते महादेव मंदिर बसवेश्वर चौक या मार्गावरून काढण्यात आली. महादेव देवालय बसवेश्वर चौक येथे जगद्गुरू व शिवाचार्य यांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. त्यानंतर जगद्गुरू, शिवाचार्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते



दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. श्री.श्री.श्री.१००८ काशी पिठाचे जेष्ठ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची पाद्यपूजा सौ.हेमलता व श्री.प्रकाश सिद्राम डिकोळे या मानकरी दांपत्याच्या हस्ते संपन्न झाली. नंतर वीरशैव लिंगायत समाज यांच्यावतीने काशी जगद्गुरू व उपस्थित शिवाचार्य यांचा सन्मान वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष व पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. श्री.ष.ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महाराज यांनी अधिक मासानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी व धर्मयात्रा या संदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर काशी जगद्गुरू यांनी उपस्थित सर्व सद्भक्तांना 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाचे महत्व तसेच अधिक मासानिमित्त व हिंदू वीरशैव लिंगायत संस्कृती याबद्दल आशिर्वचन दिले.

जगद्गुरूंचे आशिर्वचन झाल्यानंतर उपस्थित महिलांनी जगद्गुरू व शिवाचार्य यांना धोंडेदान करून मनोभावे दर्शन घेतले. यावेळी अकलूज वीरशैव लिंगायत समाज्यातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, बंधु-भगिनी व परिसरातील सद्भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाळू वाहतूक प्रकरणातील आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १२ जून-**
करमाळा पोलिस ठाणे गुन्हा क्र. ३८३/२०२६ मध्ये पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम ९ व १५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) अंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपी जयवर्धन हनुमंत दैन यास अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बार्शी यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

सदर प्रकरणात आरोपीच्यावतीने न्यायालयासमोर असा युक्तिवाद केला की, संबंधित वाहन व मुद्देमाल शासनाने आधीच जप्त केला आहे. तपासासाठी आरोपीची कोठडी आवश्यक नाही. तसेच आरोपी तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याचे न्यायालयास निदर्शनास आणून दिले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. शिवाजी क्षीरसागर, ॲड. पवन क्षीरसागर आणि ॲड. अक्षय बिडबाग यांनी काम पाहिले.



## महत्त्वाचे...

### माचणूर येथे बेकायदा दारु अड्ड्यावर छापा

**मंगळवेढा, दि. १२ जून -**
माचणूर येथे बेकायदा दारु विक्री करणाऱ्या अड्ड्यावर बोराळे बीटच्या पोलिसांनी छापा टाकून ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. देवाप्पा हरी मुढे (रा.ब्रह्मपुरी) याच्याविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी पोलिस अंमलदार सिध्देश्वर शिंदे, पोलिस हवालदार मनोज खंडागळे, पोलिस हवालदार नवले, पोलिस हवालदार पवार आदी बोराळे बीटमध्ये पेट्रोलिंग करीत असताना माचणूर हद्दीत बेगमपूरला जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस किनारा हॉटेल शेजारी देवाप्पा मोरे हा बेकायदेशीरपणे देशी दारुची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. सदर ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून ८०० रुपये किंमतीच्या दहा देशी दारु संत्रा बाटल्या मिळून आल्या. याची फिर्याद पोलिस अंमलदार सिध्देश्वर शिंदे यांनी दिल्यावर देवाप्पा मोरे याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

---

### कारची जेसीबीला धडक; दोघांचा मृत्यू, दोघे जखमी

**मंगळवेढा दि. १२ जून -**

**मयत कारचालकाविरूध्द गुन्हा**

मंगळवेढा -सांगोला रस्त्यावर आंधळगाव हद्दीत रस्त्यावरून निघालेल्या एका जेसीबीला वेगाने आलेल्या कारने पाठीमागून जोराची धडक दिली. अपघातात कार चालक सुरज पाटील, अर्चना पाटील यांचा मृत्यू झाला. तर अशोक पाटील, आयुष पाटील (रा.शेणवे जि.सांगली) जखमी झाले. याप्रकरणी मयत कारचालक सुरज पाटील याच्याविरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी अनिल तानगावडे रा.गणेशवाडी हे जेसीबी चालक असून जेसीबी क्र. एम एच १३, ई एस-९५६८ घेवून दि.८ रोजी सायंकाळी ६.१५ वा ते राष्ट्रीय महामार्गाने डाव्या बाजूचे लेनमधून जात असताना धरणवाडी येथे पाठीमागून वेगात आलेल्या कार क्र. एम एच ५०, यु.५१२१ ने पाठीमागून जेसीबीला जोराची धडक दिली. अपघातात कारचालक व कारमधील तिघे बेशुध्द पडले. जखमी प्रवाशांचा आक्रोश ऐकून परिसरातील लोकांनी त्यांना गाडीतून बाहेर काढले. यामध्ये कारचालक सुरज पाटील, अर्चना पाटील हे काही वेळानंतर मयत झाले. अपघातामध्ये कारचालकाने निष्काळजीपणे व अतीवेगाने वाहन चालवून अपघात करून जेसीबीचे व कारचे नुकसान केल्याप्रकरणी सदर कार चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

---

### सासुरे येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या; घटनेचे कारण अस्पष्ट

**वैराग, दि. १२ जून -**



बार्शी तालुक्यातील सासुरे येथे ४० वर्षीय तरुणाने राहत्या घराजवळील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. अविनाश बनसोडे (वय ४०) असे त्याचे नाव आहे. अविनाश बनसोडे यांनी शुक्रवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास कोणत्यातरी अज्ञात कारणावरून टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी राहत्या घराच्या पाठीमागील शेतात असलेल्या चिंचेच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास लावून घेतला. हा प्रकार काही वेळानंतर आजूबाजूच्या लोकांच्या व कुटुंबीयांच्या निदर्शनास आला. अविनाश यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेबाबत गणेश हणुमंत बनसोडे यांनी तातडीने वैराग पोलीस ठाण्यात जाऊन माहिती दिली. त्यांच्या खबरीवरून वैराग पोलिसांनी याप्रकरणी 'आकस्मिक मृत्यू' (मयत) म्हणून नोंद केली आहे. घटनेचा तपास वैराग पोलीस करत असून, आत्महत्येचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# बार्शी-सोलापूर मार्गावरील एसटी प्रवास 'रामभरोसे'

## अनेक बस खिळखिळ्या; दिवसाला ४ ते ५ बस पडताहेत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १२ जून -**
बार्शी-वैराग-सोलापूर या मुख्य राज्यमार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा जीव सध्या अक्षरशः मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसची अवस्था इतकी भयानक झाली आहे की, दिवसाला किमान चार ते पाच बस या रस्त्यावर कुठे ना कुठेतरी बंद पडलेल्या पाहायला मिळत आहेत. नकृष्ट आणि तोडक्या-मोडक्या अवस्थेतील या बस प्रवाशांच्या सेवेसाठी सोडल्या जात असल्याने, एसटीचा हा प्रवास आता पूर्णपणे 'रामभरोसे' झाला आहे.



सध्या उन्हाळ्याचे दिवस असून उन्हाचा तडाखा आहे. अशा कडक उन्हात भर रस्त्यात बस कधी आणि कुठे बंद पडेल, याचा काहीच नेम राहिलेला नाही. दिवसातून तीन-चार बस रस्त्याच्या कडेला बंद अवस्थेत उभी असलेली रोजच पाहायला मिळत आहेत. बस अचानक बंद पडल्यामुळे प्रवाशांना भर उन्हात ताटकळत राहावे लागते. त्यानंतर येणारी दुसरी बस आधीच हाऊसफुल्ल असल्याने त्यात वृद्ध, महिला, गरोदर माता, लहान मुले आणि विद्यार्थ्यांना उभे राहून किंवा लोंबकळत प्रवास करावा लागतो. एखाद्याला रुग्णालयात उपचारासाठी जायचे असल्यास किंवा काही तातडीचे काम असल्यास, बस बंद पडल्यामुळे त्यांची कामे खोळंबत आहेत. प्रवाशांना विनाकारण मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**योजनांपेक्षा बसची दुरुस्ती अन टापटीपपणा महत्त्वाचा**

एसटी महामंडळाने ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास आणि महिलांना अर्धे तिकीटसारख्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. मात्र, प्रवाशांचे म्हणणे आहे की, सध्या अशा फुकट किंवा सवलतीच्या योजना देण्यापेक्षा बस चांगल्या दर्जाच्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**चांगल्या बसची जोरदार मागणी**

एसटी महामंडळ प्रशासनाने आणि परिवहन मंत्र्यांनी या गंभीर समस्येची तात्काळ दखल घ्यावी. बार्शी-वैराग-सोलापूर मार्गावरील या बाद बस तात्काळ बदलून त्याऐवजी सुव्यवस्थित, टापटिप आणि चांगल्या बस उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी प्रवाशांमधून होत आहे.

अनेक बसची दुरवस्था पाहता, एसटी महामंडळ प्रशासन आणि राज्याचे परिवहन मंत्री नेमकं काय करत आहेत? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. खिळखिळ्या बसमुळे यापूर्वीही काही अपघात व दुर्घटना घडल्या आहेत. तरीही प्रशासन जागे का होत नाही, असा प्रश्न विचारला जात आहे.

## जिल्हा परिषदेला मिळणार ९९ नवे केंद्रप्रमुख

### आज नियुक्ती व समायोजन; शाळांच्या गुणवत्ता वृद्धीस चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जून-**
जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण व्यवस्थेला बळकटी देणारा महत्त्वाचा निर्णय प्रत्यक्षात आला आहे. सरळसेवा भरती प्रक्रियेतून सोलापूर जिल्हा परिषदेला तब्बल ९९ नवे केंद्रप्रमुख मिळणार आहेत. या नव्या केंद्रप्रमुखांचे समायोजन करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या उपस्थितीत आज शनिवारी नियुक्ती व समायोजन करण्यात येणार आहे.



नव्याने निवड झालेले केंद्रप्रमुख जिल्हा परिषदेत दाखल झाले आहेत. त्यांच्या कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. परिणामी नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रशासकीय देखरेखीला नवी ऊर्जा मिळणार आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या केंद्रप्रमुखांची कागदपत्रे तपासण्याचे काम झाल्यानंतर आज त्यांना नियुक्ती देण्यात येणार आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे अधिकारी आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणार आहेत. विशेष म्हणजे शाळा सुरू झाल्यानंतर केंद्रप्रमुख प्रत्यक्ष क्षेत्रात कार्यरत झाल्याने शाळांना नियमित भेटी, शैक्षणिक निरीक्षण आणि गुणवत्ता वाढीच्या उपक्रमांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

जिल्हा परिषदेच्या शैक्षणिक व्यवस्थेत केंद्रप्रमुखांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या माध्यमातून शाळांच्या कामकाजावर देखरेख, शैक्षणिक मार्गदर्शन होते. शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली जाते. त्यामुळे दीर्घकाळ रिक्त पदांवर नियुक्ती झाल्याने ग्रामीण शिक्षण क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच मनुष्यबळाची ही भर पडत असल्याने जिल्ह्यातील शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तावृद्धी, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा आणि शालेय व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

**शाळा सुरू झाल्यानंतर केंद्रप्रमुखांचे नियमित कामकाज**

संबंधित शाळा सुरू होण्याअगोदर केंद्रप्रमुखांची नियुक्ती करणे महत्त्वाचे आहे. शाळा सुरू झाल्यानंतर केंद्रप्रमुखांचे कामकाज नित्य नियमाने सुरू होणार आहे. त्यासाठी आषाढी वारी अगोदर त्यांचे सामायोजन करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार आज केंद्रप्रमुखांचे समायोजन केले जाणार आहे.
**- कुशल जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी.**

## नंदूर येथील ग्रामसेवकाविरोधात सीईओंकडे तक्रार

- **शेतातील घरजागेची नोंद करण्यास टाळाटाळ**
- **कर्तव्यात कसूर केल्याबद्दल निलंबनाची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जून -**
नंदूर येथील शेत गट नं.२६६/३ मधील घर जागेची नोंद करण्यास २०२४ पासून ते आजतागायत ग्रामसेवक म्हेत्रे हे टाळाटाळ करीत असल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे भारत भोजने यांनी लेखी तक्रारीद्वारे केली आहे.

भारत भोजने यांची नंदूर येथे गट नं.२६६/३ मध्ये शेती आहे. या गटातच घर असल्याने याची ग्रामपंचायती दप्तरी नोंद व्हावी यासाठी ग्रामपंचायतीकडे ग्राम सेवकाच्या नावे दि.२४/९/२०२४ रोजी अर्ज दाखल केला होता. घटनेला दोन वर्षे होत आली असून अद्यापही त्या घरजागेची ग्रामपंचायत दप्तरी नोंद ग्रामसेवक म्हेत्रे यांनी केली नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

भोजने यांनी वारंवार ग्रामसेवकाकडे मागणी करुनही चालढकल करत कर्तव्यात कसूर केल्याचे उघड झाले आहे.

कर्तव्यात कसूर केल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे भोजने यांनी केली आहे. ग्रामसेवकांना शासकीय काम करण्याऐवजी राजकारणातच रस असल्याचा आरोपही केला आहे. घटनेची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करण्याची मागणी केली आहे.

ग्रामसेवक म्हेत्रे हे घरजागेची ग्रामपंचायत दप्तरी नोंद करण्यास दीड वर्षे टाळाटाळ करीत आहेत. त्यांनी शासकीय कर्तव्यात कसूर केली असल्याने त्यांना निलंबित करण्यात यावे.
**-भारत भोजने (तक्रारदार),नंदूर**

## लवकरच जनता दरबार सुरु करणार

### आ. डॉ. बाबासाहेब देशमुख; शेकापच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ जून-**
थोड्याच दिवसात लोकांच्या समस्यांचा निपटारा करण्यासाठी जनता दरबार सुरू करणार असल्याचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी जाहीर केले. ते गणपतरावजी देशमुख सहकारी सुत गिरणी, सांगोला येथे आयोजित शेकाप व पुरोगामी युवक संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी उपस्थित लोकांनी या निर्णयाचे स्वागत केले.



येणाऱ्या काळात नागरिकांनी सौर उर्जेचा वापर करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासन अनुदानही देत आहे. त्याचा लाभ नागरिकांनी घेणे गरजेचे आहे. सध्या पावसाळा सुरु झालेला आहे. पाऊस काळ लांबला अथवा कमी प्रमाणात पडला तर मात्र येणारे पुढचे वर्ष अडचणीचे ठरु शकते. याचा विचार करुन शेतकऱ्यांनी कोणती पिके घ्यावी व ती कधी घ्यावी याबाबत तज्ज्ञांशी चर्चा करुन पिके घ्यावीत, असा सल्ला आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिला. बैठकीत पक्ष संघटना व मतदारसंघातील अनेक प्रश्नांवर तसेच होऊ घातलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकाबाबत चर्चा करण्यात आली असल्याची माहिती प्रसिद्धीप्रमुख चंद्रकांत सरतापे यांनी दिली.

### मार्डी येथे कोल्ह्याच्या हल्ल्यात दोघे जखमी

**सोलापूर, दि. १२ जून-**
शेतामध्ये काम करताना अचानक कोल्ह्याने हल्ला केल्याने दोघेजण जखमी झाले. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथे आज शुक्रवारी सकाळी घडली. पहिल्या घटनेत संग्राम हजारे ( वय १४) हा सकाळी शेतामध्ये काम करीत असताना कोल्ह्याने हल्ला करून पायाला चावा घेतला. त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात वडील दुर्योधन यांनी दाखल केले. दुसऱ्या घटनेत दीपक भड (वय ३२, धामणगाव, ता. बार्शी) हा मार्डीतील शेतामध्ये काम करीत असताना कोल्ह्याने उजव्या पायाचा चावा घेतला.

## अकलुजमध्ये १४ जोडपी अडकली विवाहबंधनात

### बागवान सहारा फाउंडेशनचा द्वितीय सामुदायिक विवाह सोहळा थाटामाटात

- **वर-वधूंना २५ हजारांचे रुखवत भेट**
- **राजकीय, सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांसह सोलापूरच्या शाहीन फाउंडेशनची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज, दि. १२ जून -**
येथील बागवान सहारा फाउंडेशनच्या वतीने आयोजित दुसरा भव्य सामुदायिक विवाह सोहळा अत्यंत थाटामाटात झाला. आनंद नगर येथील आनंदी गणेश मंदिराच्या भव्य हॉलमध्ये ७ जून २०२६ रोजी गोरज मुहूर्तावर हा सोहळा पार पडला. यावर्षी एकूण १४ वधू-वरांनी हजारो लोकांच्या साक्षीने संसाराची सुरुवात केली.

बागवान समाजातील युवकांनी दोन वर्षांपूर्वी सामाजिक जाणिवेतून बागवान सहारा फाउंडेशनची स्थापना केली होती. संस्थेने पहिल्याच वर्षी ५ वधू-वरांचे विवाह यशस्वीपणे लावून देऊन सर्वच समाज घटकांचे लक्ष वेधून घेतले होते. यंदाच्या दुसऱ्या वर्षी ही संख्या १४ वर पोहोचली असून, संस्थेने अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करत या सोहळ्याचे भव्य दिव्य आयोजन केले.



सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नवदाम्पत्यांना शुभाशीर्वाद दिले. यामध्ये विधान परिषदेचे माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, शितलदेवी मोहित पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, जीवन जानकर, नगराध्यक्ष रेश्मा अडगळे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक नाम वंत व्यक्ती उपस्थित होत्या. विशेष म्हणजे, या विवाह सोहळ्याचे कौतुक करण्यासाठी मुंबईपासून ते थेट कर्नाटक राज्यापर्यंतचे पाहुणे आणि मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विधान परिषद निवडणुकीत व्यस्त असल्याने खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी बागवान सहारा फाउंडेशन या संस्थेला भ्रमणध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या होत्या. मात्र शीतलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांनी समक्ष हजर राहत या सामुदायिक विवाह सोहळ्यातील वधू आणि वरांना शुभेच्छा दिल्या.

**नियोजन आणि परिश्रम**

सोहळ्यातील सर्व वधू-वरांच्या कागदपत्रांची पडताळणी आणि विवाह रजिस्टर नोंदींची महत्त्वाची जबाबदारी शुकुर बागवान आणि म गौस शब्बीर बागवान यांनी पार पाडली. सोहळ्यासाठी बागवान सहारा फाउंडेशनचे अध्यक्ष - तोहीद चौधरी, उपाध्यक्ष- नाजीर मोहोळकर, सचिव-तनवीर तांबोळी, जावेद बागवान, खजिनदार- नाझीम खान, दिलदार मोहोळकर, अलीम बागवान, अखिल बागवान, रफिक तांबोळी, जुबेर बागवान, साहिल बागवान यांच्यासह अकलूज शहर बागवान जमातीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**शाहीन फाउंडेशनची उपस्थिती**

अनेक वर्षांपासून सोलापूरमध्ये विवाह सोहळ्यांचे यशस्वी आयोजन करणारे आणि 'निकाह को आसान करो' हे ब्रीद वाक्य घेऊन चालणाऱ्या सोलापूरच्या प्रसिद्ध शाहीन फाउंडेशनचे अध्यक्ष उमर बागवान यांनी आपल्या संपूर्ण टीमसह या सोहळ्याला हजेरी लावली. अकलूजच्या तरुणांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## लमाण हाऊसिंग सोसायटी प्रकरण तापले

### मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही कार्यवाही नाही

**२० जूनपर्यंत निर्णय न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १२ जून -**
मंद्रूप येथील सेवालाल लमाण हाऊसिंग सोसायटी रद्द झाल्यानंतर भोगवटदारांच्या नावांची मालक सदरी नोंद करण्यासाठी केलेल्या अर्जांवर ग्रामपंचायत प्रशासनाने अद्याप कार्यवाही न केल्याने संबंधित सदस्यांमध्ये नाराजी आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले असतानाही मंद्रूप ग्रामपंचायतीकडून या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप आर.के. फाउंडेशनचे उपाध्यक्ष सावन चव्हाण यांनी केला आहे.

सावन चव्हाण यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. संबंधित प्रकरणात जबाबदार सरपंच, ग्रामसेवक व प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. मंद्रूप येथील सेवालाल लमाण हाऊसिंग सोसायटी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २१(अ) अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर यांच्या ३० मार्च २००७ रोजीच्या आदेशानुसार रद्द केली होती. त्यानंतर संबंधित जागांवरील भोगवटदार सदस्यांची नावे मालक सदरी नोंदविण्यासाठी सदस्यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत अर्ज सादर केला होता.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, या अर्जाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मंद्रूप ग्रामपंचायतीला संबंधित प्रकरणात त्वरित कार्यवाहीचे लेखी आदेश दिले होते. मात्र, आदेशानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. प्रकरण जाणूनबुजून रखडविले जात असल्याचा आरोप केला आहे. यामुळे अनेक वर्षांपासून संबंधित जागांचा भोगवटा असलेल्या सदस्यांना मालकी हक्काच्या नोंदीअभावी विविध शासकीय व आर्थिक व्यवहारांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान, मंद्रूप ग्रामपंचायतीने या प्रकरणाचे २० जून २०२६ पर्यंत निराकरण न केल्यास सर्व संबंधित सदस्यांना सोबत घेऊन पंचायत समिती, दक्षिण सोलापूर कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.